रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २५३ । पृष्ठे १० ▌RGD/016/2026-28 www.krushival.in

## नामकरणासाठी आझाद मैदानावर

**उरण :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होऊन पाच महिने उलटले तरी विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत केंद्र सरकारकडून कोणताही निर्णय जाहीर करण्यात आलेला नाही. या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय नामकरण कृती समितीच्या वतीने सोमवारी, २३ फेब्रुवारीपासून आझाद मैदान येथे ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी दिली. ८ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विमानतळाचे पान २ वर

रायगड, शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

## ट्रान्सपोर्ट युनियनचा आक्रमक पवित्रा

**रसायनी :** पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील रिक्षा चालकांवरील जाचक दंडात्मक कारवाई आणि प्रलंबित समस्यांबाबत ऑल इंडिया ट्रान्सपोर्ट, माथाडी ॲण्ड जनरल कामगार युनियनने घेतलेल्या आक्रमक भूमिकेला प्रशासनाने नमते घेतले आहे. युनियनच्या निवेदनाची तत्काळ दखल घेत, आरटीओ प्रशासनाने येत्या २३ तारखेला एका विशेष संयुक्त बैठकीचे आयोजन केले आहे. या निर्णयामुळे रिक्षा चालकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, युनियनच्या संघर्षाचा पान २ वर

# शिवगर्जनेतून महाराजांना मुजरा


(छायाचित्र : समीर मालोदे)

- जिल्ह्यात ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी
- सांस्कृतिक कार्यक्रमांसह उपक्रमांतून महाराजांच्या प्रतापाची महती

### दुचाकी रॅलीतून मानवंदना

अलिबाग तालुक्यासह रायगड जिल्हयातील वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. ठिकठिकाणी पोवाडे लावण्यात आले. काही ठिकाणी सकाळी तर काही ठिकाणी सायंकाळी दुचाकी रॅली वेगवेगळ्या संस्था, संघटनाच्या वतीने काढण्यात आली. या रॅलीच्या माध्यमातून महाराजांना मानवंदना देण्यात आली. महाराजांचे विचार घराघरात पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात आला.

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी गुरुवारी (दि.१९) जयंती साजरी करण्यात आली. जिल्ह्यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांसह वेगवेगळ्या उपक्रमांतून महाराजांच्या प्रतापाची महती सांगण्यात आली. यावेळी शिवगर्जनेतून महाराजांना मुजरा करीत शिवजयंती जल्लोषात साजरी करण्यात आली. एक वेगळा उत्साह या निमित्ताने जिल्ह्यात दिसून आला.

अलिबाग नगरपरिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. नगराध्यक्ष अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्यासह अनेक मान्यवरांच्या हस्ते महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी नगरसेवक प्रदिप नाईक, अनिल चोपडा, ॲड.अश्विनी ठोसर, ॲड. निवेदिता वाघमारे, मुख्याधिकारी सागर साळुंखे आदी मान्यवरांसह वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळी, शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगरपरिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिव जन्मोत्सव ते छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या अफजल खान वधाची कथा नृत्यातून सादर केली. यावेळी प्रेक्षकांकडून प्रतिसाद मिळाला. अलिबागसह रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी शिवजयंती साजरी करण्यात आली.

काही संस्था, संघटनेच्या वतीने बाईक रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये हजारो शिवभक्त सहभागी झाले होते. जय शिवाजी, जय भवानी असा जयघोषाने संपूर्ण जिल्हा दुमदूमून गेला. अनेकांनी पारंपारीक पेहराव करीत, हातात भगवा झेंडा पान २ वर

## वेधक

### हळदी समारंभात तिघांची हत्या

**धुळे :** येथे एका लग्नसमारंभाच्या आनंदावर विरजण पडले असून, हळदीच्या कार्यक्रमात झालेल्या तुंबळ हाणामारीत तिघांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. नवरदेवाच्या बाजूकडील लोकांनी केलेल्या मारहाणीत नवरीकडील तीन व्यक्तींना आपला जीव गमवावा लागला. पिंपळनेर येथे गोसावी समाजाचा विवाह सोहळा सुरू होता. हळदीचा कार्यक्रम सुरू असताना नवरदेव आणि नवरीकडील पाहुण्यांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. या वादाचे रूपांतर हिंसक हाणामारीत झाले. नवरदेवाच्या बाजूने आलेल्या काही तरुणांनी नवरीकडील मंडळींवर जीवघेणा हल्ला चढवला.


### ब्रिटनच्या राजपुत्राला अटक

**लंडन :** ब्रिटिश राजघराण्याला हादरवून सोडणारी एक मोठी बातमी समोर आली आहे. किंग चार्ल्स यांचे धाकटे बंधू आणि ब्रिटनचे माजी प्रिन्स अँड्र्यू यांना अटक करण्यात आली आहे. मएपस्टीन फाईल्सफ मधील धक्कादायक खुलाशानंतर ही कारवाई करण्यात आल्याचे समजते. अँड्र्यू यांच्यावर सार्वजनिक पदाचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोप ठेवण्यात आला आहे. महत्वाचे म्हणजे आज अँड्र्यू यांचा ६६ वा वाढदिवस होता. अमेरिकन लैंगिक गुन्हेगार जेफ्री एपस्टीन याच्याशी संबंधित गोपनीय दस्तऐवज सार्वजनिक झाल्यापासून प्रिन्स अँड्र्यू यांच्या अडचणीत वाढ झाली होती. या फाईल्समध्ये प्रिन्स अँड्र्यू यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले होते.

### दहशतवादी कट उधळला

**अहिल्यानगर :** फुटबॉलपटूंच्या आडून दहशतवादी कारवाया करण्याचा मोठा कट एटीएसने उधळून लावला आहे. दहशतवाद विरोधी पथकाच्या सर्तकतेमुळे दहशतवादी नेटवर्क उभं राहण्या आधीच मोठा पर्दाफाश झाला आहे. यवतमाळ, पुसद आणि उमरखेडमधील फुटबॉलपटू दहशतवादी संघटनांच्या रडारवर होते. यवतमाळमध्ये एटीएसने सर्च ऑपरेशन केलं. स्पोर्ट्समध्ये रुची असणाऱ्या अनेकांना दहशतवादी कारवाईत सक्रिय करण्यासाठी प्रयत्न केल्याचं उघड झालं आहे. एटीएसच मागील काही महिन्यांपासून सर्व हालचालींवर लक्ष आहे. एटीएसने २१ ठिकाणी सर्च ऑपरेशन राबवलेलं होतं.

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी





**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर पुन्हा एकदा वाहतूक कोंडी झाल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. खंडाळा बोगद्याआधी तसेच बोगद्याजवळ दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर बोगद्याजवळ वाहने संथगतीने पुढे सरकत असून काही ठिकाणी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाल्याचे चित्र होते. त्याचप्रमाणे मुंबईहून पुण्याकडे येणाऱ्या मार्गावरही मोठ्या प्रमाणात कोंडी झाली होती. त्यामुळे दोन्ही दिशांनी प्रवाशांना विलंब सहन करावा लागला.

दरम्यान, अवघ्या आठ दिवसांपूर्वी याच मार्गावर तब्बल ३२ तास वाहतूक कोंडी झाल्याची घटना घडली होती. त्या वेळी हजारो वाहनचालक आणि प्रवासी महामार्गावर अडकून पडले होते. अन्न-पाण्याची टंचाई, इंधन संपण्याची भीती आणि लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या कुटुंबांची मोठी गैरसोय झाली होती.

सध्या झालेल्या कोंडीमुळे पुन्हा एकदा प्रशासनाच्या नियोजनाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. वाहतूक पोलिसांकडून कोंडी सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू असून वाहनचालकांनी संयम बाळगून पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

लोणावळा आणि खंडाळा घाट परिसरात वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांत नाराजी व्यक्त होत आहे. येत्या सुट्टीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक नियंत्रणासाठी अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

मुंबई-बंगळूर महामार्गावर कात्रज नवीन बोगद्यातून बाहेर पडल्यानंतर भरधाव खडी-क्रशर वाहतूक करणाऱ्या डंपरने एकामागोमाग आठ मोटारींना धडक दिली. बुधवारी सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास हा अपघात झाला. यात जीवितहानी टळली असून, चार ते पाचजण किरकोळ जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, नवीन कात्रज बोगद्यातून बाहेर पडताच भरधाव डंपरने इंडियन ऑइल पंपासमोर पाच वाहनांना धडक दिली. डंपरचालक वाहन न थांबवता सुसाट पुढे निघाला. पान २ वर

## आजपासून दहावीची परीक्षा




- ३७ हजार ५७९ विद्यार्थी बसणार परीक्षेला
- २४ पथकामार्फत राहणार नजर
- कॉपीमुक्त अभियानातून संशयीत हालचालीवर लक्ष

**। रायगड। जिल्हा प्रतिनिधी ।**

बारावीच्या परीक्षेनंतर आता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत दहावीची लेखी परीक्षा शुक्रवारी (दि.२०)पासून घेण्यात येणार आहेत. परीक्षेच्यावेळी गैरप्रकार घडू नये, म्हणून जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. जिल्ह्यामध्ये कॉपीमुक्त अभियान प्रशासनामार्फत राबविण्यात आले आहे. या अभियानातून जिल्ह्यामध्ये २४ पथकामार्फत विद्यार्थ्यांच्या प्रत्येक संशयीत हालचालीवर लक्ष ठेवले जाणार आहे.

जिल्ह्यामध्ये दहावीची लेखी परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरु होणार असून १८ मार्चपर्यंत परीक्षा असणार आहे. या परीक्षेसाठी ३७ हजार ५७९ विद्यार्थी बसणार आहे. ७५ केंद्रामध्ये परीक्षा घेतल्या जाणार आहेत. जिल्ह्यामध्ये कॉपीमुक्त अभियान राबविले जाणार आहे. परीक्षेला येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची झडती घेतली जाणार आहे.त्यासाठी जिल्हा स्तरासह तालुका स्तरावर २४ भरारी पथके नेमण्यात आले आहेत. प्रत्येक तालुक्यामध्ये एक असे एकूण १५ तसेच जिल्हा स्तरावर भरारी पथक असणार आहेत. प्रत्येक केंद्रामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहे. याचे नियंत्रण जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे असणार आहे. जिल्ह्यात बैठक पथकदेखील तयार केले आहे. या पथकामार्फत सीसीटीव्हीची पाहणी केली जाणार आहे. काही गैरप्रकार दिसून आल्यास तात्काळ हे बैठक पथक घटनास्थळी दाखल होऊन कारवाई करणार आहे. कॉपी करणाऱ्यांसह कॉपी करण्यास प्रोत्साहन देणाऱ्यांविरोधात कडक कारवाई केली जाणार आहे. त्या केंद्रावरील मान्यता रद्द केली जाणार आहे.

शुक्रवारपासून सुरु होणाऱ्या दहावीच्या परीक्षेत जिल्ह्यातील पंधरा तालुक्यांपैकी पनवेल तालुक्यामध्ये १३ हजार ४२७, तर तळा तालुक्यात २२७ विद्यार्थी परीक्षेला बसणार आहे. अन्य तालुक्यांमध्ये पावणे पाचशेपासून साडेतीन हजारपर्यंत विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

### परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

दहावीच्या परीक्षा २० फेब्रुवारीपासून घेतल्या जाणार आहे. परीक्षा केंद्राच्या परिसरात पोलिसांचा कडेकोट पहारा असणार आहे.परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश काढले जाणार आहे. या परिसरातील झेरॉक्स दुकानासह अन्य दुकाने बंद केली जाणार आहेत. तसेच ड्रोन कॅमेरादेखील या परिसरात असणार आहे. त्यामुळे परीक्षा केंद्राच्या परिसरातील व केंद्रातील संशयीत हालचालीवर लक्ष ठेवले जाणार आहे.

## सहाय्यक निबंधक कार्यालय दलालांच्या विळख्यात

- सर्वसामान्य नागरिकांची भरमसाठ लूट
- तात्काळ कारवाई करण्याची मागणी

उदय सावंत

**। महाड ।**

महाड तहसील कार्यालयातील सहाय्यक निबंधक यांचे दालन सध्या दलालांच्या विळख्यात सापडले असून, सर्वसामान्य नागरिकांची भरमसाठ लूट होत आहे. प्रत्येक नोंदणीमागे पाच ते दहा हजार रुपये तर काही वेळा एकरी दहा हजार अशा दराने पैसे उकळले जात असून याप्रकरणी अधिकारी व दलाल एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत आहेत.

याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी विशेष लक्ष घालून सर्वसामान्य नागरिकांची होणारी ही भरमसाठ लूट त्वरित थांबवावी, अशी आता मागणी होऊ लागली आहे.

कोकणात जमीन घेण्याचे फॅड प्रचंड वाढले असून, मुंबई-पुणे तसेच गुजरात व राजस्थानमधील परप्रांतीय मोठ्या प्रमाणावर कोकणात जागा खरेदी करीत आहेत. ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व असलेल्या व औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या महाड तालुक्यात देखील जमिनींचे खरेदी-विक्रीचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. खरेदी-विक्री प्रमाणेच गहाणखत व इतर नोंदणीचा देखील यामध्ये समावेश होत असतो. ही सर्व नोंदणी महाड तहसील कार्यालयातील सहाय्यक निबंधक सूर्यवंशी यांच्या कार्यालयामध्ये होत असते. शासकीय यंत्रणेप्रमाणे या कार्यालयात कामकाज होणे अपेक्षित असताना दलाल या कार्यालयामध्ये ठाण मांडून बसलेले आहेत. या दलालांची टोळी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात सक्रिय असून प्रत्येक दस्त नोंदणीच्या नावाखाली पान २ वर

## टेम्पोची कारला धडक

**उरण :** उरणमध्ये रात्री अपरात्री तसेच दिवसा कधीही वाहनांचे अपघात होत असून यात अनेकांना जीव गमवावे लागले आहेत. तर काही जणांचे अवयव निकामी झाले आहेत. वाहनाच्या अपघातामुळे वेगवेगळ्या मालमत्तेचे आर्थिक नुकसानही होत आहेत. अशा घटनांना वेळीच लगाम घालण्याची गरज निर्माण झाली आहे. राजेंद्र गणपत घरत यांची हुंडाई वेणु कार दुपारी ४ वाजताच्या सुमारास त्यांच्या नवीन शेवा येथील राहत्या घराच्या समोर पार्किंगमध्ये पार्क करून ठेवली होती. टेम्पो चालकाने राजन घरत यांच्या कारला जोरदार धडक देऊन अपघात केला. यामुळे राजन घरत यांच्या कारचे नुकसान झाले आहे. सुदैवाने यात पान २ वर

## अंतराच्या अटीमुळे आरटीई प्रवेश ठरणार मृगजळ

**। रायगड । प्रतिनिधी ।**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या मोफत प्रवेशासाठी तीन व पाच किलोमीटर अंतराची अट कमी केली आहे. यावरुन योजनातर राबवायची आहे; पण गरजूंना लाभही द्यायचा नाही, अशाच प्रकारचे धोरण शिक्षण विभागाने अवलंबल्याचे दिसून येत आहे.

आता केवळ एक किलोमीटर अंतराच्या आतील विद्यार्थीच आरटीई प्रवेशासाठी पात्र ठरणार आहेत. परिणामी, आरटीई प्रवेश मृगजळ ठरणार आहेत. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा व विना अनुदानित शाळांत मोफत प्रवेश दिला जातो.या शाळांना एकूण पटसंख्येच्या २५ टक्के या विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास घटक, एचआयव्हीबाधित, अनाथ, दिव्यांग, कोविड प्रभावित बालकांचा वंचित घटकात समावेश होतो. पालकांचे उत्पन्न एक लाखापेक्षा कमी असणारी बालकेही दुर्बल घटकातून प्रवेशासाठी पात्र ठरतात. प्रवेशासाठी शाळेपासून विद्यार्थ्यांच्या घरापर्यंतच्या अंतराची अट आहे. यापूर्वी हवाई अंतरासाठी एक किलोमीटर, तीन किलोमीटर व पाच किलोमीटर असे तीन टप्पे होते. प्राधान्याने कमी अंतरातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जात होते. मात्र, यंदा यात मोठा बदल करण्यात आला आहे.

तीन व पाच किलोमीटरचे टप्पे काढून टाकण्यात आले आहेत. याचाच अर्थ पान २ वर

शाळांनी प्रवेश नाकारल्यास पालकांना ऑनलाइन तक्रार दाखल करता येईल. प्रवेश नाकारणाऱ्या शाळांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार गटशिक्षणाधिकारी यांना असतील. विद्यार्थ्यांच्या आधार कार्डवरील तपशील शाळेने आरटीई संकेतस्थळ, सरल प्रणालीत नोंदवणे आवश्यक आहे. शुल्क प्रतिपूर्ती झाल्याचा लघुसंदेश पालकांना पाठवला जाणे, शाळेच्या शुल्काचा तपशील नोंदवण्याची सुविधा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**रायगड जिल्हा परिषदेचा स्तूत्य उपक्रम** | **निरामय आरोग्य विमा काढण्यासाठी ११४ मुलांना अनुदान**

## दिव्यांग मुलांना विमा कवच



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

दिव्यांग मुलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने एक नाविन्य उपक्रम हाती घेतला आहे. दिव्यांग कल्याणाच्या पाच टक्के निधीमधून निरामय आरोग्य विमा काढण्यासाठी १४४ मुलांना अनुदान जिल्हा परिषदेच्या मार्फत देण्यात आले. जिल्ह्यातील ऑटिझम, सेरेबल पॅल्सी, बौद्धिक अपंगत्व आणि बहुविकलांगता या प्रवर्गातील मुलांसाठी विमा कवच देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या अनुदानाचे पत्र प्रातिनिधिक स्वरूपात ९ मुलांना बुधवारी (दि.१८) मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते अलिबाग येथे वाटप करण्यात आले. २०२४-२५मध्ये १०५ लाभार्थ्यांना हे अनुदान देण्यात आले होते.

राष्ट्रीय न्यास, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विभाग भारत सरकार यांनी ऑटिझम, सेरेब्रल पॅल्सी, बौद्धिक अपंगत्व आणि बहुविकलांगता असलेल्या व्यक्तींसाठी सुरू केलेली निरामय आरोग्य विमा योजना वार्षिक एक लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य कव्हर देते. या योजनेचा मुख्य उद्देश दिव्यांग व्यक्तींना वैद्यकीय उपचारांसाठी आर्थिक मदत मिळवून देणे आणि त्यांचे जीवनमान सुधारणे हा आहे. या योजनेसाठी आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा परिषद कार्यालयात संपर्क साधून नावनोंदणी करता येते. अनेक वेळा दिव्यांग व्यक्तींना अथवा दिव्यांग मुलांच्या पालकांना विमा योजनेसाठी रक्कम भरणे शक्य नसते. त्यामुळे रायगड जिल्हा परिषदेने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवित आहे. वाटप कार्यक्रमासाठी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाचे सहाय्यक सल्लागार साईनाथ पवार यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

निरामय आरोग्य विमा योजनेमध्ये शस्त्रक्रिया रू. ५५ हजार, ओपीडी (नियमित वैद्यकीय तपासणी) रू.१५ हजार, दंतचिकित्सेसाठी रू.४ हजार, थेरपीसाठी रू. २० हजार, पर्यायी औषधांसाठी रू.४ हजार आणि आपत्कालीन वाहन खर्च रू. २ हजार असे एकूण वार्षिक १ लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा देण्यात येतो. या योजनेसाठी लाभार्थ्यांकडे युडीआयडी कार्ड, आधारकार्ड, बँक खाते असणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ देशभरातील कोणत्याही प्रकारच्या रूग्णालयात घेता येतो अशी माहिती जिल्हा परिषद प्रशासनाकडून देण्यात आली.

# मुख्यमंत्री ग्रामसडक रस्त्याची कामे संथगतीने

## स्थानिक त्रस्त; रस्त्यावर झोपून राहत आंदोलन करण्याचा इशारा



। नेरळ । प्रतिनिधी ।

जिते ते बोर्ले हा रस्ता गेली चार वर्ष सुरू असून त्या रस्त्याचे काम पूर्ण होत नाही.तर आंबिवली फाटक ते कशेळे रस्ता या रस्त्याचे बांधकाम सुरू असून या रस्त्याचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे. दरम्यान, या दोन्ही रस्त्याच्या कामासाठी टाकण्यात आलेली दगडी खडी गेली १५ ते २० दिवस तशीच पडून आहे. त्यामुळे स्थानिक असून रस्त्यांची कामे स्थानिकांसाठी मदतगार ठरण्याऐवजी त्रासदायक ठरत आहेत.

नेरळ जवळील जिते पासून बोर्ले हा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून बनविला जात आहे.मात्र पाच वर्षे होत आली तरी या रस्त्याचे काम पूर्ण होण्याचे नाव घेत नाही.या रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी केवळ १८ महिन्यांचा कालावधी होता, मात्र पंचवार्षिक योजना असल्यागत या रस्त्याचे काम सुरू आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून हा रस्ता अनेकवर्षे सुरू आहे. सुरुवातीला या रस्त्याचे काम सुरू झाले आणि नंतर निधी नसल्याने किमान दोन वर्षे रस्त्याचे काम बंद होते. त्यानंतर पुन्हा एकदा त्या रस्त्याचे बंद असलेले काम सुरू झाले आणि जिते गावच्या वेशीवर जाऊन बंद पडले. मग पुन्हा दीड वर्षाचा कालावधी लोटल्यानंतर ग्रामीण विकास यंत्रणेला जागतिक बँकेचे कर्ज मिळाले आणि रस्त्याचे काम सुरू झाले.

आता रस्त्याच्या कामासाठी जुना डांबरी रस्ता खोदून ठेवला असून त्यावर खडीकरण आणि नंतर काँक्रिटीकरण असे बांधकाम होणार आहे. परंतु रस्त्यात गावातील सांडपाणी वाहत असल्याने हा रस्ता पूर्वी अस्तित्वात होता काय? असा प्रश्न निर्माण असून सर्वत्र पाणीच पाणी रस्त्याने वाहत आहे.त्यामुळे जिते गावात डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे आणि चिखलमय रस्त्याने चालावे लागत आहे.

दुसरीकडे जिते गावाला जोडणारा पेशवे रस्ता काँक्रिटीकरण करण्याचे काम सुरू आहे. आंबिवली फाटक पासून नेरळ कशेळे रस्ता असा हा पेशवे रस्ता काँक्रिटीकरण कामाला मागील तीन महिन्यापासून सुरुवात झाली आहे. रस्ता काँक्रिटीकरण करण्यासाठी जुना अस्तित्वात असलेला रस्ता खोदण्यात आला आहे. त्यावर जे खडीकरण करण्यात येणार आहे असून त्यानंतर काँक्रिटीकरण केले जाणार आहे.

> पुढील दोन दिवसात पेशवे रोड वरील खडी नीट बसवली नाही तर स्थानिक रस्त्यावर उतरतील. तसेच जिते गावातील रस्त्यावर वाहणारे पाणी थांबवले नाहीतर रस्त्यात झोपून आंदोलन करेन.
> – विजय घरत, ग्रामस्थ जिते

मात्र रस्त्याचे लेव्हल मिळावी यासाठी आधी खडीकरण केले जात आहे.परंतु रस्त्यावर १५ ते २० दिवसापासून खडी पसरवून ठेवली असून त्या खडीकरण कामामुळे रस्ता स्थानिकांसाठी धोकादायक बनला आहे.

रस्त्यावर टाकलेली खडी काही ठिकाणी रस्त्याच्या कडेला असलेल्या घरांमध्ये पोहचली असून खडी टाकण्यात आल्यानंतर त्यावर रोलर फिरवून दाबून एकसंध करणे आवश्यक असताना तसे कोणतेही काम ठेकेदाराने केलेले नाही. ठेकेदाराचे पाठीवर कोणतातरी अदृश्य हात असल्याने ठेकेदार मनमानी करताना दिसत आहे.

स्थानिक पातळीवर ग्रामस्थ आवाज काढत नाहीत एवढी दहशत या ठेकेदाराची आहे. त्यामुळे रस्त्यावर पसरलेली खडी वर रोलर फिरवणे, खडी बाजूला जाऊन दुचाकी चालकाला अपघात होऊ नये याची खबरदारी ठेकेदार घेत नाही. त्यामुळे हा नवीन रस्ता स्थानिकांसाठी धोकादायक आणि त्रास देणारा ठरत आहे.

# रसायनी–कोन मार्गावर वाहतूक कोंडीचा विळखा

## लॉजिस्टिक यार्डमुळे रस्ताच बनला पार्किंग

। रसायनी । प्रतिनिधी ।

रसायनी–कोन परिसरातील प्रमुख रस्ता सध्या अवजड वाहनांच्या पार्किंगमुळे अक्षरशः ठप्प होत असल्याचे चित्र आहे. स्थानिकांच्या आरोपानुसार, परिसरातील नवकार, आष्टे, अपोलो लॉजिस्टिक आदी कंपन्यांकडे येणारी अवजड वाहने रस्त्यालाच पार्क केल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत प्रशासनाकडून जनजागृती, दंडात्मक कारवाई आणि विविध अटी लागू केल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात परिस्थितीत फारसा बदल दिसत नाही. महामार्ग सुरक्षा पथक, वाहतूक नियंत्रण कक्ष आणि आरटीओ विभाग औपचारिक दंडात्मक कारवाई करत असले तरी अवजड ट्रकांची रस्त्यावर उभी राहणारी रांग कायम आहे. परिणामी, वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका आणि स्थानिक रहिवाशांचा त्रास वाढत आहे.

नागरिकांच्या मते, अपुऱ्या पार्किंग सुविधेमुळे लॉजिस्टिक कंपन्या सार्वजनिक रस्त्यांचा वापर करत असून रस्ते सुरक्षा कायद्याचे उल्लंघन होत आहे. एखादा गंभीर अपघात झाल्यास जबाबदार कोण? असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवर रस्ते सुरक्षा समिती स्थापन करून पर्यायी मार्ग किंवा स्वतंत्र पार्किंग व्यवस्था उभारण्याची मागणी जोर धरत आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे व खालापूर तालुका सचिव साबीर शेख यांच्यासह विविध सामाजिक घटकांकडून यासाठी पाठपुरावा सुरू आहे.

आगामी काळात प्रशासन कोणती ठोस कारवाई करते, याकडे कोनसावळा परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# करंजाडे–ओवळे भुयारी मार्गावर अपघातांची टांगती तलवार

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल जवळील करंजाडे वसाहतीला नवीन ओवळे आणि महात्मा फुले महाविद्यालयाशी जोडणाऱ्या रेल्वे भुयारी मार्गाचे उद्घाटन काही महिन्यापूर्वी राजकीय कार्यकर्त्यांकडून करण्यात आले. मार्ग खुला झाला असला तरी, या भागातील वाहतुकीचा पेच अद्याप सुटलेला नाही. करंजाडेकडून महाविद्यालयाकडे आणि वरचे ओवळे गावाकडे जाण्यासाठी कोणताही सुरक्षित पर्यायी मार्ग उपलब्ध नसल्याने, वाहनधारकांना नाईलाजास्तव मुख्य रस्त्यावर उलट दिशेने प्रवास करावा लागत आहे. यामुळे येथे मोठ्या अपघाताची शक्यता निर्माण झाली असून हा मार्ग प्रवाशांसाठी डेथ ट्रॅप ठरतोय की काय, अशी भीती व्यक्त होत आहे.

या मार्गावरून दररोज हजारो विद्यार्थ्यांची वर्दळ असते. महात्मा फुले महाविद्यालय आणि परिसरातील इतर शैक्षणिक संस्थांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना याच भुयारी मार्गाचा वापर करावा लागतो. केवळ विद्यार्थीच नव्हे, तर वरचे ओवळे गावातील ग्रामस्थांसाठी शहरात येण्या–जाण्यासाठी हाच एकमेव जवळचा मार्ग आहे. मात्र, करंजाडेकडून या गावांकडे जाताना रस्ते जोडणीच्या तांत्रिक अडचणींमुळे वाहनधारकांना विरुद्ध दिशेने वाहने चालवावी लागतात. समोरून वेगाने येणाऱ्या जड वाहनांमुळे या वळणावर कधीही गंभीर अपघात घडू शकतो. सध्या या परिसरातून ये–जा करण्यासाठी दुसरा कोणताही सोयीस्कर मार्ग अद्याप तयार करण्यात आलेला नाही. पर्यायी व्यवस्थेअभावी नागरिक आणि विद्यार्थी जीव मुठीत धरून या धोकादायक प्रवासाचा अवलंब करत आहेत. प्रशासनाने या भुयारी मार्गालगतच्या रस्ते जोडणीचे काम तातडीने पूर्ण करावे किंवा वाहतुकीचे योग्य नियोजन करावे, अशी मागणी स्थानिक रहिवाशांकडून केली जात आहे. एखादा मोठा बळी जाण्यापूर्वी तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

## मोबाइल हॅक करून सहा लाख लंपास

पनवेल : मोबाइल फोनवर आलेली एक संशयास्पद एपीके फाइल डाऊनलोड करणे कामोठ्यातील तरुणाला महागात पडले आहे. सायबरचोरांनी या फाइलच्या माध्यमातून तरुणाचा मोबाइल हॅक करून त्याच्या खात्यातून अवघ्या ५० मिनिटांत तब्बल ६ लाख ६१ हजार रुपये लंपास केले आहेत. या घटनेतील तक्रारदार अविनाश आयात–निर्यात क्षेत्रात क्लिअरिंग एजंट म्हणून कार्यरत आहे. अविनाशच्या मोबाइलवर एका अनोळखी क्रमांकावरुन एपीके फाइल आली. ती फाइल त्याच्या मोबाइलमध्ये आपोआप डाऊनलोड झाली. एपीके फाइल डाऊनलोड होताच काही वेळातच अविनाश याला त्याच्या खात्यातून १ लाख ९९ हजार रुपये काढले गेल्याचा मेसेज आला. अविनाश याने तत्काळ बँकेच्या कस्टमर केअरशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत त्याचा मोबाइल पूर्णपणे हॅक झाला होता. सायबरचोरांनी अविनाशचा मोबाइल हॅक करून त्याच्या खात्यातून ६ लाख ६१ हजार रुपये लंपास केले.



# पुनाडेमध्ये आरोग्य शिबीर

। उरण । प्रतिनिधी ।

नागरिकांचे आरोग्य निरोगी राहावे, आरोग्या विषयी जनजागृती व्हावी, नागरिकांना त्यांच्या घराजवळ दर्जेदार व उत्तम वैद्यकीय सेवा सुविधा मिळाव्यात या अनुषंगाने बुधवारी (दि.१८) ग्रामपंचायत पुनाडे यांच्या सहकार्याने परिवर्तन, भारतकेअर, एचडीएफसी बँक आणि निरामय हेल्थ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पुनाडे गावात जनरल हेल्थ चेकअप, हिमोग्लोबिन, शुगर, हाडांची ठिसूळता, डोळे तपासणी करून रुग्णांना लागणारे औषधे मोफत देण्यात आली.

यावेळी डोळे तपासणी करताना मोतीबिंदू असणारे लोकांना रेफर केले.या कार्यक्रमाप्रसंगी रसिक बाबुराव पाटील (सदस्य ग्रामपंचायत), अंकिता अमीर ठाकूर (सदस्य ग्रामपंचायत), अक्षता महेश पाटील (सदस्य ग्रामपंचायत), सुनील रमेश पाटील (सदस्य ग्रामपंचायत), सुप्रिया घरत (ग्रामविकास अधिकारी), अमीर श्रीराम ठाकूर, संदीप श्रीराम ठाकूर, निरामय हेल्थ फाउंडेशन स्टाफ आदी मान्यवर उपस्थित होते. या आरोग्य शिबिराला नागरिकांचा, जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. चांगल्या कार्यक्रमाचे, आरोग्य शिबिराचे आयोजन केल्याने नागरिकांनी सदर आरोग्य शिबिराचे कौतुक करत आयोजकांचे तसेच पुनाडे ग्रामपंचायतचे व सदस्यांचे आभार मानले आहेत.

# जिल्ह्यात कलिंगडचा हंगाम सुरू

## अवकाळीमुळे उत्पादनात घट



(छायाचित्र : समिर मालोदे)

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये ठिकठिकाणी कलिंगड विक्रीची दुकाने सजली आहे. जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून कलिंगडचा हंगाम सुरु झाला आहे. मात्र यंदा कलिंगडच्या उत्पादनात ५० टक्के घट झाल्याची माहिती समोर आली आहे. ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे उत्पादनावर परिणाम झाल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली.

पावसाचा हंगाम संपल्यावर रायगड जिल्ह्यातील अलिबागसह रोहा, माणगाव अशा अनेक तालुक्यांमध्ये कलिंगडचे उत्पादन घेतले जाते. कमी कालावधीत जास्त उत्पादन देणारे आणि अधिक मागणी असणाऱ्या या पिकाची लागवड करण्यावर अधिक भर दिली जात आहे. आंब्या बरोबरच कलिंगड लागवड ठिकठिकाणी केली जाते.

डिसेंबरला तयार होऊन कलिंगड बाजारात दाखल होतो. परंतू यावर्षी पावसाचा हंगाम वाढला. ऑक्टोबर महिन्यात अवकाळी पाऊस पडल्याने कलिंगडची लागवड ही लांबणीवर गेली. त्याचा उत्पादनावर परिणाम झाला. त्यामुळे यंदा बाजारात फक्त ५० टक्के उत्पादन तयार झाले आहे. यावर्षी फेब्रुवारी महिन्यात कलिंगड बाजारामध्ये दाखल झाले आहे. ठिकठिकाणी कलिंगड विक्रीची दुकाने सजली आहे. लहान आकारापासून मोठ्या आकाराचे कलिंगड विक्रीसाठी ठेवले जात आहे. अलिबाग रोहा मार्गासह पेण–अलिबाग, रोहा– महाड, रेवदंडा–मुरुड अशा अनेक मार्गावर नाक्या नाक्यावर कलिंगड विक्रीची दुकाने सजली आहेत. बाजारात कलिंगड दाखल झाले असले, तरी त्याचे उत्पादन फारच कमी आल्याने शेतकरी वर्ग चिंतेत आहे. मागणी अधिक आणि उत्पादन कमी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून कलिंगडचा हंगाम सुरु झाला आहे. कलिंगड खरेदीसाठी बाजारात गर्दी होऊ लागली आहे. वेगवेगळ्या आकाराच्या कलिंगडची किंमत ५० रुपयांपासून ५०० रुपयांत आहे. पर्यटकही कलिंगड खरेदीवर अधिक भर देत आहेत. जिल्हयात सकाळी हवेत गारवा असला, तरी दुपारच्या वेळेला उन्हाचे चटके लागत आहे. त्यामुळे कलिंगडचा आस्वाद घेण्याकडे अधिक लक्ष दिले जात आहे. उन्हाळ्यात कलिंगड खाणे पोषक असल्याने कलिंगड खरेदीलाही अधिक मागणी असल्याचे चित्र आहे.

पान १ वरून

## शिवगर्जनेतून महाराजांना मुजरा

फडकवीत महाराजांचा जयघोष केला. त्यामुळे अलिबाग शहरासह ग्रामीण परिसर महाराजांच्या जयघोषाने दुमदूमून गेला. गावांतील तरुणांनी एकत्र येत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस व पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर पोवाड्याचे सादरीकरण करीत महाराजांच्या कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम केले. एक वेगळा उत्साह व उमेद घेऊन अलिबागसह संपूर्ण जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची महती सांगण्यात आले. महाराजांचा जन्म, अफजलखानाचा वध, गड किल्ल्यांवरील लढाई अशा सर्वच कार्याचा उलगडा या कार्यक्रमांतून करण्यात आला. शिवकालीन मर्दानी खेळाच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण करण्यात आले. जय जय महाराष्ट्र माझा गर्जा महाराष्ट्र माझा या राज्यगीताचे ठिकठिकाणी अत्यंत उत्साहात गायन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयासह वेगवेगळ्या शासकीय कार्यालयात, शाळांमार्फत तसेच सामाजिक, शैक्षणिक अशा वेगवेगळ्या संस्था, संघटनांच्या वतीने जिल्ह्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली.

## मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी

त्यानंतर डंपरने स्वामी नारायण मंदिर परिसरात आणखी दोन मोटारींना धडक दिली. शेवटी भूमकर चौक परिसरात आणखी एका मोटारीला धडक देत डंपर वडगाव पुलाजवळ थांबला. दरम्यान, डंपरच्या टायरने पेट घेतला. आग भडकल्याने काहीकाळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

महापालिकेच्या अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी दाखल होत आग आटोक्यात आणली. अपघातामुळे महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव, साहाय्यक आयुक्त अजय परमार, पोलीस निरीक्षक आसाराम शेटे, पोलीस निरीक्षक सुनील गवळी, पोलीस निरीक्षक शरद झिने यांच्यासह कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

पोलिसांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अपघातप्रवण ठिकाणी तातडीची यंत्रणा उपलब्ध नसल्याची तक्रार नागरिकांनी केली. अपघातानंतर क्रेन वेळेवर उपलब्ध न झाल्याने डंपर रस्त्यावरून बाजूला करण्यास विलंब झाला. दरम्यान, वाहतूक पोलिसांनी आपत्कालीन क्रेन मागवून डंपर रस्त्यावरून बाजूला काढत वाहतूक पूर्ववत केली. गतीमर्यादेचे उल्लंघन, जड वाहनांवरील नियंत्रणाचा अभाव यामुळे परिस्थिती गंभीर होत चालली आहे.

## नामकरणासाठी आझाद मैदानावर

उद्घाटन झाले होते. त्यानंतर २५ डिसेंबर २०२५ पासून विमानतळावरून प्रवासी वाहतूक सुरू झाली आहे. मात्र, नामकरणाचा प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याने प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या प्रश्नावर पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, पालघर व नाशिक जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची बैठक कोपरखैरणे येथील शेतकरी समाज सभागृहात पार पडली. त्या बैठकीत २३ फेब्रुवारीपासून आझाद मैदानात ठिय्या आंदोलन करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. समितीच्या वतीने सांगण्यात आले की, विमानतळ ज्या भूमीवर उभा आहे त्या भूमिपुत्रांच्या भावनांचा सन्मान राखत केंद्र सरकारने तात्काळ नामकरणाचा निर्णय जाहीर करावा. अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात
आला आहे.

## ट्रान्सपोर्ट युनियनचा आक्रमक पवित्रा

मोठा विजय मानला जात आहे. मागील काही दिवसांपासून पनवेल रेल्वे स्थानक परिसरात आरटीओ विभागाकडून रिक्षांवर धडक कारवाई केली जात होती. प्रशासनाने रिक्षांच्या वाढत्या संख्येचा विचार न करता आणि पार्किंगची कोणतीही पर्यायी व्यवस्था न करता थेट दंड आकारणे सुरू केले होते. यामुळे सामान्य रिक्षा चालकांवर उपासमारीची वेळ आली होती, असा आरोप युनियनने केला होता. या कारवाईविरोधात युनियनने प्रशासनाला निवेदन देऊन चर्चा होईपर्यंत कारवाई थांबवण्याचा इशारा दिला होता.

## सहाय्यक निबंधक कार्यालय दलालांच्या विळख्यात

जनतेकडून पाच ते सहा हजार रुपये अधिकाऱ्यांच्या नावाखाली व तेथील कर्मचाऱ्यांच्या नावाखाली उकळले जात आहेत. याप्रकरणी आज जरी कोणी पीडित तक्रार करायला पुढे येत नसला तरी येत्या काळात जनतेमधून प्रचंड उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही. महाड तालुक्यात खरेदीचे व्यवहार हे धनदांडग्या व श्रीमंत लोकांकडून केले जात आहेत. गोरगरीब शेतकऱ्यांना अल्प मोबदल्यात त्यांच्या जागा बळकावून जमीन विक्री करणारे दलाल या धनदांड्यांना कोकणातल्या या जमिनी घशात घालत आहेत. किल्ले रायगडच्या परिसरातील जागा देखील परप्रांतीयांच्या घशात घातल्या जात आहेत. या ठिकाणी या परप्रांतीयांकडून मोठ्या प्रमाणावर जंगलतोड करून जमिनीचे सपाटीकरण केले जात आहे. या सपाटीकरणामुळे निसर्ग पर्यावरण त्याचबरोबर किल्ले रायगडलाही प्रचंड धोका निर्माण झाला आहे. किल्ले रायगड ही संरक्षित वस्ती असून नुकतीच त्याची जागतिक वारसास्थळांमध्ये नोंद झाली आहे. मात्र या सर्व परिसरात झालेल्या जमिनीच्या खरेदी विक्रीमुळे येथील पर्यावरण व सांस्कृतिक वारसा धोक्यात आला असून ही जागतिक वारसा नोंद लवकरच रद्द होण्याचा धोका देखील निर्माण झाला.

महाड शहरालगतच्या जागादेखील मोठ्या प्रमाणावर डेव्हलपमेंटच्या नावाखाली बिल्डरच्या घशात घातल्या जात आहेत. महाड नगरपालिका क्षेत्राबाहेर ग्रामपंचायत हद्दीमध्ये अनियमित व अनधिकृत अवैध व कायद्याला धाब्यावर बसून मोठ्या प्रमाणावरती कन्स्ट्रक्शन व गृहप्रकल्प साकार केले जात आहेत. या साकार होणाऱ्या गृहप्रकल्पांना कोणतेही निर्बंध नाहीत की कोणाचा अंकुश नाही. कलेक्टरकडून बांधकाम परवानगी आली की ग्रामपंचायतलादेखील हे विकसक विचारत नाहीत.

या सर्व घडामोडींचे केंद्र हे सहाय्यक निबंधक यांचे कार्यालय असून या कार्यालयामध्ये बेधुंदपणे व मस्तावलपणे वावरणारे हे दलाल आज अक्षरशः माणुसकीला काळीमा फासणाऱ्या अशा गोष्टी घडवीत असून एखाद्या गरजू शेतकरी जेव्हा बँकेकडून कर्ज घेतो आणि आपली जागा घर गहाण खत करण्यासाठी या दलालांच्या जाळ्यामध्ये अडकतो तेव्हा त्यांच्याकडूनही देखील हे दलाल पाच–दहा हजार रुपये उकळत आहेत. हे म्हणजे मेलेल्या मढ्याच्या टाळूवरचे लोणी खाण्यासारखे आहे. अशा ह्या दलालांचा जिल्हाधिकारी तथा सरकारने वेळीच बंदोबस्त केला पाहिजे. यांना दिले जाणारे परवाने रद्द केले पाहिजेत. या परवानांच्या आधारावर हे लोक या ठिकाणी आपली दुकाने थाटून बसले आहेत. या दुकानांच्या माध्यमातून अनेक दलाल या ठिकाणी एखाद्या वेश्या व्यवसायप्रमाणे ग्राहक शोधत असतात. महाराष्ट्रातला शेतकरी हा सावकारांच्या कर्ज जाळ्यातून मुक्त व्हावा व त्याच्या आत्महत्या थांबाव्यात अशी भूमिका वेळोवेळी मायबाप सरकार घेत असते. सावकारांचा मृत्यू फास जरी सुटला असला तरी या दलालांचा फास कर्ज घेणाऱ्या व त्यासाठी गहाण खत करणाऱ्या शेतकऱ्यांना गळ्याभोवती आवळत आहेत. महाडचे सहाय्यक निबंधक कार्यालय हे अशा दलालांपासून मुक्त व्हावे व सर्वसामान्य जनतेची कोणती आर्थिक फसवणूक न होता त्यांच्या दोस्तांच्या नोंदणी शासकीय नियम व निकषाप्रमाणे व्हाव्यात अशीच अपेक्षा आहे.

मात्र प्रत्यक्षरीत्या पाहिले तर अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की हे दलाल आम्हाला बदनाम करीत असून आमच्या नावाने लोकांकडून हे दलाल लोक पैसे उघडत असल्याचे कबूल करत आहेत. तर दुसरीकडे हेच दलाल आम्हाला या अधिकाऱ्यांचे व तेथील कर्मचाऱ्यांचे या दस्तामागे पैसे द्यावे लागतात त्यासाठीच आम्ही दस्त नोंदणी मागे हे पैसे घेत असतो असे हे दलाल सांगत असतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घालून या आशा दलालांचा कायमचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

## अंतराच्या अटीमुळे आरटीई प्रवेश ठरणार मृगजळ

शाळेपासून एक किलोमीटर अंतरावर घर असणारे विद्यार्थीच पात्र ठरणार आहेत. मुळात अंतराचा बदललेला नियमच गैरलागू आहे. शाळेपासून एक किमी अंतरात असे किती विद्यार्थी असणार आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थी तर आरटीई प्रवेशापासून वंचित राहणार आहेतच पण, शहरातील विद्यार्थ्यांनाही प्रवेश मिळणे मुश्कील होणार आहे. मोठ्या शहरात तर परिस्थिती आणखी बिकट असणार आहे. त्यामुळे आरटीई प्रवेश विद्यार्थ्यांसाठी मृगजळ ठरणार, हे निश्चित.

स्वयं अर्थसहाय्यित शाळा व विनाअनुदानित शाळांत आरटीईअंतर्गत २५ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जातात. या विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क आकारले जात नाही. ही रक्कम संबंधित शाळांना शासनाकडून दिली जाते. त्याचा भार कमी करण्यासाठीच शिक्षण विभागाने अंतराची अट बदलली असल्याचे सांगितले जाते.

## टेम्पोची कारला धडक

कोणतेही जीवितहानी झाली नाही. या घटने संदर्भात उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून अपघात करणाऱ्या सदर टेम्पो मालक, चालकावर योग्य ती कडक कारवाई करून झालेल्या वाहनाची आर्थिक नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी राजन घरत यांनी केली आहे.



# लहानगे रमले महाराजांचे चित्र साकारण्यात

। नेरळ । प्रतिनिधी ।

जयंतीनिमित्त कर्जत येथे शिवशंभो युवा हायकर्स आणि भुर्के गुरुजी कलामंच यांच्याकडून लहानग्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

येथील रॉयल गार्डन हॉटेलच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेला कर्जत शहरातील २२५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

यावेळी लहान गट आणि मोठा गट अशा दोन गटांत स्पर्धा घेण्यात आली. त्यात महाराजांच्या गड–किल्ल्यांचे, व्यक्तिचित्र, महारांजी सावली चित्र आणि अनिमेशन स्वरूपातील चित्र या विषयासह महाराजांचे गाजलेल्या लढायांवर आधारित चित्र असे विषय ठेवण्यात आले होते.

सकाळी साडेसात वाजता विद्यार्थ्यांनी या चित्रकला स्पर्धेला गर्दी केली होती. सुरुवातीला महाराजांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून स्पर्धेचा शुभारंभ उद्योजक निलेश चौडिये यांचे हस्ते करण्यात आला.

यावेळी शिवशंभो युवा हायकर्स आणि भुर्के गुरुजी कलामंच यांचे पदाधिकारी आणि पालक उपस्थित होते.

## आठवे राज्यस्तरीय वार्षिक कुलसंमेलन शनिवारी

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रातील कदम घराण्याचे आठवे भव्य राज्यस्तरीय वार्षिक कुलसंमेलन यावर्षी रायगड जिल्ह्यातीलपोलादपूरतालुक्यातील वडघर बुद्रुक याठिकाणी शनिवार २१ फेब्रुवारी आणि रविवार २२ फेब्रुवारी यादिवशी आयोजित करण्यात आले आहे.

याप्रसंगी पोलादपूर तालुक्यातील उद्यानपंडित रामचंद्र रावजी कदम यांच्या जीवनावर आधारित शून्य ते शिखर चरित्रपर पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

प्राचीन कदंब राजवंशाचा इतिहास समाजाला कळावा. तसेच राज्यभरातील कदम कुटुंबियांना नोकरी व्यवसायात सहकार्य मिळावे, घराण्यातील नामवंतांचा सन्मान करणे ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून, क्षत्रिय मराठा कदम परिवार या संस्थेने आजतागायत सात राज्यस्तरीय कुलसंमेलनांचे आयोजन केले आहेत.

# जिल्ह्यात शिवप्रेमींचा जल्लोष



● मावळा प्रतिष्ठान अलिबाग यांच्यावतीने शिवजन्मोत्सव सोहळा गुरूवारी (दि.१९) अलिबाग नगरित उत्साहात साजरा करण्यात आला. अलिबाग शहरातील राममंदिर येथून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जाज्वल्य इतिहासाची मिरवणूक ढोल ताशांच्या गजरात निघाली. (छायाचित्र : समीर मालोदे)



## शिवप्रेमी मित्रपरिवारातर्फे अलिबाग एसटी स्टँड येथे शिवजयंती साजरी

| अलिबाग | प्रतिनिधी |

शिवप्रेमी अलिबाग एसटी स्टँड मित्रपरिवारा यांच्यावतीने गुरूवारी (दि.१९) छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला अलिबाग पोलीस ठाण्याचे अधिकारी किशोर साळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करण्यात आली.

यावेळी उपस्थित शिवप्रेमींनी केलेल्या शिवाजी महाराजांचा जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. अंगावर रोमांच आणणारे पोवाडे, भगवे झेंडे, भगवे फेटे आणि शिवप्रभूंचा जयजयकार यामुळे वातावरण शिवमय झाले होते. कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, स्थानिक नागरिक तसेच तरुणांचा मोठा सहभाग होता. शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि स्वराज्य स्थापनेतील त्यांच्या पराक्रमाचा गौरव करत उपस्थितांनी त्यांना अभिवादन केले.

कार्यक्रमाच्या आयोजनात मित्रपरिवाराच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच, अलिबागमधील पत्रकार बांधवही कार्यक्रमाला उपस्थित राहून त्यांनी उत्साहात भर घातली. हा कार्यक्रम शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. शिवजयंती निमित्ताने समाजात ऐक्य, शौर्य आणि देशभक्तीची भावना दृढ व्हावी, हा संदेश यावेळी देण्यात आला.

## रोटरी शाळेत शिवजयंती थाटात



| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील बोरी येथील रोटरी इंग्रजी माध्यम शाळेत शिवजयंतीचा उत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. शाळेच्या प्राचार्या अक्षता म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या आवारात विद्यार्थी आणि शिक्षकांनी एकत्रितपणे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. शाळेच्या विद्यार्थिनींनी लाल आणि हिरव्या साड्या परिधान केल्या होत्या, तर विद्यार्थ्यांनी पारंपारीक पांढरी वेशभूषा धारण करून शवाजी महाराजांच्या जीवनातील प्रसंगांचे अभिनय केले.

## श्रीवर्धनमध्ये रथोत्सवाचे आयोजन

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त श्रीवर्धन शहरात भव्य रथोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संपूर्ण तालुका देशभक्तीच्या आणि अभिमानाच्या भावनेने भारावून गेला. ढोल-ताशांचा दणदणाट, पारंपरिक वेशभूषेत सजलेले युवक, भगव्या पताकांची दिमाखदार लयलूट आणि 'जय भवानी, जय शिवाजी'च्या गगनभेदी घोषणांनी शहरातील प्रत्येक रस्ता शिवमय झाला होता.

रथोत्सवाची सुरुवात शक्तिपीठ बागमांडला जेटी येथून अत्यंत उत्साहात झाली. विधिवत पूजन आणि आरतीनंतर महाराजांच्या आकर्षक प्रतिमेने सजवलेला रथ शहराच्या मुख्य मार्गाने पुढे मार्गक्रमण करू लागला. श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकातून पुढे जाताना नागरिकांनी ठिकठिकाणी रथाचे जल्लोषात स्वागत केले. महिला वर्गाने पारंपरिक पद्धतीने आरत्या ओवाळल्या, तर युवकांनी ढोल-ताशांच्या तालावर जोशपूर्ण नृत्य सादर केले.

## पंचायत समितीमध्ये शिवजयंती

| म्हसळा | प्रतिनिधी |

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती म्हसळा पंचायत समिती आणि नवनियुक्त शिक्षक वृंद यांच्यावतीने पंचायत समिती कार्यालयात साजरी करण्यात आली. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी माधव जाधव यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. यावेळी विस्तार अधिकारी दामोदर दिघीकर, चंद्रसेन चौधरी, रमेश दवटे, प्रसाद कुरळे, सचिन बोराडे, प्रमोद शिरसाठ, ज्ञानेश्वर झोल, कैलास नागरगोजे, विशाल तळेकर, रमेश खोसे, सखाराम बहिर लटपटे, मुनेश्वर, निलेश शेळके, कृष्णा पांडुळे, गुंजकर, भोये व गायकवाड आदी उपस्थीत होते.



## श्रीवर्धनमध्ये शिवकालीन शस्त्र, नाणी प्रदर्शन



| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यात प्रथमच शिवरूद्र मर्दानी आखाडातर्फे शिवकालीन शस्त्र व नाणी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. श्रीवर्धन नगरपरिषदेच्या शाळा क्रमांक १ येथे गुरूवारी पार पडलेल्या या प्रदर्शनाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. तरुणांना शिवरायांच्या शौर्याची माहिती देणे आणि प्राचीन संस्कृतीतील व्यापार कुठल्या चलनात केला जायचा? तसेच, विद्यार्थ्यांना शिवकालीन युद्धनीती, शस्त्रांचा वापर कळावा. त्याचप्रमाणे मागील काही शतकातील अर्थव्यवस्थेची ओळख करून देणे आणि कलाकुसरीची माहिती मिळावी, या उद्देशाने शिवकालीन शस्त्र आणि नाणी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात मराठा ढोप, तेगा, खंडा, सर्पणी, सोसनपट्टा, पट्टीसा, माडू, कुंत (भाला)- पदकुंत, अश्वकुंत, गजकुंत, कल्पा (निशाणीचा भाला), दांणपट्टा, कट्यार, विजय नगरी कट्यार व इतर शिवकालीन शस्त्र त्याचप्रमाणे शिवकालीन नाणी, मुघल नाणी, ब्रिटिश कालीन नाणी व भारतीय जुनी नाणी इत्यादी प्रदर्शनात ठेवण्यात आले होते.

## तळ्यात शिवजयंती साजरी



| तळा | प्रतिनिधी |

तळा तालुक्यात विविध शाळा, महाविद्यालय, नगरपंचायत कार्यालय, तळगड किल्ला व मुंढ्याची वाडी इत्यादी ठिकाणी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी तळा बाजारपेठेतून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत लहान मुलांनी शिवकालीन वेशभूषा साकारली होती. पारंपरिक खालू बाजा व लेझीम पथकाच्या तालावर 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'च्या घोषणा देत ग्रामस्थ या मिरवणुकीत सहभागी झाले होते. यावेळी शहरात विविध कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये शिवज्योत आणणे, भव्य मिरवणूक, महाराजांच्या प्रतिमेची स्थापना, पोवाडा, हळदीकुंकू कार्यक्रम, हरिपाठ, महाआरती, व्याख्यान, यांसारखे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. तसेच, ऐतिहासिक तळगड किल्ल्यावर देखील तळगड पूजन, ध्वजपूजन, ध्वजारोहण, महादेवाचे पूजन, शिवप्रतिमेचे पूजन हे कार्यक्रम पार पडले.



● माणगावच्या छत्रपती शासन शिवजयंती उत्सव समितीतर्फे शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची माणगाव बाजारपेठेतून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने शिवप्रेमी सहभागी झाले होते. आलेल्या सर्व शिवप्रेमींचे समितीचे अध्यक्ष डॉ. परेश उभारे व सहकारी यांनी स्वागत केले. (छायाचित्र- सलीम शेख)

## पीएनपी महाविद्यालयात शिवजयंती साजरी



| अलिबाग | प्रतिनिधी |

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसा.च्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील इतिहास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून गुरुवारी (दि.१९) छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, कार्यालयीन मार्गदर्शक गबाजी गिते यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मनोगतामध्ये सार्थक नागावकर, गौरी पुरोहित आणि हर्षाली सानप या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले.

शिक्षकांच्या मनोगतामध्ये प्रा. नितीन कराळे, प्रा. मिलिंद घाडगे यांनी शिवजन्मोत्सवाचा ऐतिहासिक आढावा घेतला. कला विभाग प्रमुख डॉ. नम्रता पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार सर्वांनी आत्मसात करावे असे आपल्या मार्गदर्शनामधून सांगितले. या सोहळ्यासाठी उपस्थित असलेले महाविद्यालयाचे कार्यालयीन मार्गदर्शक गबाजी गिते यांनीही आपल्या मार्गदर्शनामधून छत्रपती शिवाजी महाराजांचे योगदान सांगितले. अध्यक्षीय वक्तव्यामध्ये महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे इतिहासातील विविध पैलू उलगडून दाखवले.

या शिवजयंती कार्यक्रमाला महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रसिका म्हात्रे, विज्ञान विभाग प्रमुख प्रा. पूजा म्हात्रे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. पूजा पाटील, प्रा. कैलास सिंह राजपूत, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभागाचे प्रा. साईनाथ पाटील यांनी केले. तर, आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. संपदा शिंदे यांनी केले.

दुर्गवेध परिवाराचा पुढाकार | ऐतिहासिक पुराव्यांचे प्रदर्शन ठरले आकर्षण

## शिवजन्मोत्सव सोहळ्याचा पालीत जल्लोष

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

दुर्गवेध परिवार आयोजित दोन दिवसीय किल्ले सरसगड शिवजन्मोत्सव सोहळ्याला बुधवारी (दि.१८) शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. पाली शहरातून काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीने या सोहळ्याचा दिमाखदार शुभारंभ झाला. यावेळी ढोल-ताशांचा गजर आणि 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने संपूर्ण पाली शहर दुमदुमून गेले होते.

शिवजन्मोत्सव कार्यक्रमाची सुरुवात पाली येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला अभिवादन करून करण्यात





आली. यावेळी तहसीलदार उत्तम कुंभार, नगराध्यक्ष पराग मेहता, माजी नगराध्यक्ष आरिफ मणियार, पोलीस निरीक्षक निकम, शिवऋण प्रतिष्ठानचे केतन म्हस्के, उमेश मढवी यांसह दुर्गवेध परिवाराचे सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मिरवणुकीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे सरसगड संवर्धन मोहिमेदरम्यान उजेडात आलेल्या ऐतिहासिक पुराव्यांचे आणि किल्ल्याच्या इतिहासाचे कार्डबोर्ड प्रदर्शन हे होते. यावेळी संवर्धन कार्यात मिळालेले अवशेष आणि महत्त्वाच्या ऐतिहासिक नोंदी फलकांच्या माध्यमातून प्रदर्शित करण्यात आल्या होत्या. या अभिनव उपक्रमामुळे उपस्थित नागरिकांना आणि विशेषतः तरुणांना सरसगडच्या गौरवशाली इतिहासाची सखोल माहिती मिळण्यास मदत झाली.

### संवर्धनासाठी साद

दुर्गवेध परिवाराच्यावतीने या मिरवणुकीच्या माध्यमातून पालीतील तरुण पिढीला आणि ग्रामस्थांना किल्ले सरसगडच्या संवर्धन कार्यात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. 'आपला वारसा जपणे हे आपले कर्तव्य आहे', हा संदेश या निमित्ताने घराघरात पोहोचवण्यात आला. या सोहळ्याच्या निमित्ताने पाली शहरात शिवमय वातावरण निर्माण झाले असून, पुढील दोन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# .. काय करील एआय?

दिल्लीतील एआयच्या जागतिक परिषदेमध्ये गलगोटिया नावाच्या विद्यापीठाने जी काय माती खाल्ली आहे त्याला तोड नाही. मात्र हा केवळ या विद्यापीठाचा प्रश्न नाही. त्याने भारताची अब्रूही मातीत घातली आहे. चीनमध्ये तीन-चार लाख रुपयांना मिळणारा एक कुत्र्यासारखा रोबो या विद्यापीठाने प्रदर्शनात मांडला व हे आमचेच संशोधन आहे असे म्हणून मिरवण्याचा प्रयत्न केला. पण आजच्या इंटरनेटच्या युगात ही लबाडी काही मिनिटात उघडी पडली. सोशल मिडियात लोकांनी बोंबाबोंब केली. तिकडे चीनमध्ये भारताची टर उडवण्यात आली. एआयची जागतिक परिषद भरवतायत आणि चीनच्या बाजारात मिळणारा रोबो स्वतःचा म्हणवून खपवतायत असे चिनी लोक म्हणू लागले. छीथू करू लागले. आधी गलगोटिया विद्यापीठाने यावर सफाई देण्याचा प्रयत्न केला. पण या विद्यापीठाच्या नेहा सिंग या बाईंनी दूरदर्शन या सरकारी माध्यमाच्या प्रतिनिधीला दिलेल्या मुलाखतीत हा कुत्रा विद्यापीठाच्या संशोधकांनी तयार केला असल्याचा दावा स्पष्टपणे केलेला होता. त्यामुळे विद्यापीठाचा नाइलाज झाला. शेवटी मोदी सरकारलाने माकडिणीची भूमिका घेतली आणि या गलगोटिया नावाच्या पिलाला पायदळी तुडवून त्याला प्रदर्शनाच्या बाहेर काढले व आपली उरलीसुरली अब्रू झाकण्याचा प्रयत्न केला. भाजपचे भक्त थोबाडीत बसल्याप्रमाणे गाल चोळत बसले आहेत. आता ते बहुदा नेहरुंच्या काळात असा प्रकार घडला होता हे शोधून काढत असतील. परवा या परिषदेच्या पहिल्या दिवशी नरेंद्र मोदींना फोटो सेशन करायचे असल्याने सुरक्षेचे कारण दाखवून प्रदर्शनाचे स्टॉल मांडलेल्यांनाच बाहेर काढण्यात आले. सहा तास हे सर्व लोक उन्हातान्हात उभे राहिले. नंतर आत येऊन पाहतात तो त्यांचे लॅपटॉप वगैरे चोरीला गेलेले होते. ही आपल्या मोदी सरकारची व्यवस्था. एआयसारख्या परिषदा आणि भाजपचे मेळावे यांच्यात फरक असतो हे आता तरी मोदीभक्तांना कळेल अशी आशा आहे. नरेंद्र मोदींचा प्रसिध्दीचा हव्यास, जिकडेतिकडे स्वतः चमकण्याचा अट्टाहास आणि साधी एक आंतरराष्ट्रीय परिषद देखील धड आयोजित न करता येणारी त्यांच्या हाताखालची नालायक नोकरशाही यांचे विदारक दर्शन या निमित्ताने सर्व जगाला घडले आहे.

### त्यांचा एआय आमची गाय

एआय हा सर्व जगात सध्या परवलीचा शब्द झाला आहे. आपल्याकडे वृत्तपत्रांमध्ये दर दिवशी एआयवर काही ना काही मजकूर छापलेला असतो. दर आठवड्याला कोणाचे तरी या विषयावर भाषण चालू असते. पुस्तकेही येत असतात. शेअर बाजारात कधी मोठी घसरगुंडी तर मध्ये कधीतरी उसळी चालू आहे. त्याचे कारणही हटकून एआयशी संबंधितच असते. दिल्लीमध्ये नुकतीच एआयची जागतिक परिषद भरवण्यात आल्यामुळे तर चहू बाजूंनी एआयचा गजरच गजर चालू आहे. क्रांतिकारी तंत्रज्ञान आले की त्याने मोठे बदल होतातच. पण या बदलांना समाज किती कवेत घेतो आणि हा बदल किती मोठ्या समाजावर प्रभाव टाकतो याचे गणित वेगवेगळे असते. अलिकडची दोन उदाहरणे घेऊ. १९८५ च्या आसपास देशात संगणक येऊ लागले. त्याही वेळी आता संगणक नोकऱ्या घालवणार असा प्रचार झाला होता. त्या प्रचारामुळे नव्हे, पण इतर कारणांमुळे संगणकाचा प्रसार तुलनेने काहीसा हळू झाला. याउलट, त्यानंतर दहाच वर्षांनी आलेल्या मोबाईल आणि नंतरचे स्मार्टफोन यांनी अक्षरशः पाहता पाहता या गरीब देशाचा कबजा घेतला. फेरीवाले, सुतार, गवंडी, शेतमजूर किंवा अगदी सफाई कामगार यांच्या खिशांमध्ये या स्मार्टफोन्समुळे पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक पैसे येऊ लागले. आजही संगणक कधीही न हाताळलेले कोट्यवधी लोक या देशात असतील. पण मोबाईल न वापरलेले कदाचित काही हजारांच्या घरात असतील. एआय काय काय करू शकेल याच्या सुरस व चमत्कारिक कहाण्या आपण रोज ऐकत आहोत. पण भारतासारख्या देशात तो स्मार्टफोनच्या वेगाने येणार की संगणकासारखी दणकट पण धीमी पावले टाकणार हे पुढच्या काही काळात कळेलच. पण या बदलांसाठी तयार व्हायचे तर सरकार व सर्व समाज यांची मानसिकता बदलावी लागेल. विद्यापीठांमध्ये तसे काटेकोर शिक्षण द्यावे लागेल. वैज्ञानिक दृष्टिकोन अवलंबावा लागेल. पण आपल्याकडे गोमूत्र, गायीचे शेण यांचे संशोधन आणि गटारीतील निर्माण होणारा गॅस असल्या गोष्टींनाच प्रतिष्ठा राहणार असेल तर बदल कठीण आहे.

### थापा नकोत

नाही निर्मळ जीवन, काय करील साबण असा संत तुकारामांचा अभंग आहे. मुळात चित्त शुद्ध नसेल तर बाह्य उपचारांचा काय उपयोग असा त्याचा अर्थ आहे. त्याच धर्तीवर मुळात जर लबाडी आणि खोटेपणाचे शिक्षण घेऊन मिरवण्याची सवय लागली असली तर एआयसारख्या तंत्रज्ञानाचा काही उपयोगही नाही व त्यात आपला निभाव लागणेही कठीण आहे. असता फाटक्यात पाय काय करील एआय असे विचारावे लागेल. एआय तंत्रज्ञान इतके झपाट्याने पुढे सरसावत चालले आहे की भारतातल्या आयटी कंपन्यांवर संक्रांत येईल अशी भीती व्यक्त होते आहे. त्यामुळेच गेले काही दिवस या कंपन्यांचे शेअर्स दणादण कोसळत आहेत. टीसीएस, इन्फोसिस वगैरे कंपन्यांनी गेल्या काही महिन्यात जेमतेम काहीशे लोकांची नवी भरती केली आहे. एरवी ही भरती कित्येक हजारात असते. अमेरिका आणि चीन यांची एआयचे चमत्कार दाखवण्यामध्ये जोरदार स्पर्धा सुरू आहे. चॅटजीपीटीसारखे नवनवे अवतार पुढे येत आहेत. त्याचवेळी भारतात टिपू सुलतान, जीभ कापून आणल्यास बक्षीस असल्या भानगडी सुरू आहेत. दिल्लीच्या परिषदेत हजारो कोटींचे व्यवहार झाले, गुंतवणूक येणार आहे अशी प्रसिध्दी आता केली जाईल. भारतात असंख्य हुशार आयटी इंजिनिअर्स आहेत. जगातील नामवंत कंपन्यांनी त्यांचा भरपूर उपयोगही करून घेतलेला आहे. पण भारताला फायदा होईल असे मूलभूत तंत्रज्ञान किंवा चॅटजीपीटीसारखे नवीन काही या तंत्रज्ञाना निर्माण करता आलेले नाही. त्यामागे गलगोटियासारख्या भामट्यांनी जोपासलेली संस्कृतीच कारणीभूत आहे. दुसरे म्हणजे जगात कितीही महान संशोधने झाली तरी आपला भर जुगाड करण्यावर व लोकांची संशोधने पळवण्यावर अधिक राहिलेला आहे. येथेही तेच घडते आहे. अमेरिका व चीनमध्ये एआयमध्ये नवनवीन शोध लावण्याची शर्यत लागलेली आहे. त्यानंतर आपल्याला याची जाग आली व गेल्या वर्षी आपण भारताचा चॅट जीपीटी तयार करण्याचा प्रकल्प हाती घेतला. पण संशोधन यावर आपला खर्च इतका तुटपुंजा आहे की यातून असे काही क्रांतिकारक नवीन घडणे कठीण आहे. मोदींची प्रसिध्दी यंत्रणा भारतीयांना काय वाटेल त्या थापा मारू शकेल, आपण विश्वगुरु कसे झालो आहोत हे सांगू शकेल. पण जगामध्ये ही प्रसिध्दीची नाटके पुरणारी नाहीत. एआयच्या परिषदेने याचे भान मोदी सरकारला आले तरी बरे होईल.

---

**विचार**

# गंभीर जागतिक संघर्षाच्या दिशेने...

***अमेरिका आणि इराणमधील तणाव सर्वोच्च लष्करी अस्वस्थतेच्या टप्प्यावर आहे. इराणवर आर्थिक दबाव म्हणून अमेरिका तेलाचा एक साधन म्हणून वापर करत आहे. अमेरिकेने इशारा दिला आहे की, इराणच्या जनआंदोलन दडपण्याच्या कृतीला बळाने प्रत्युत्तर दिले जाईल. मात्र याच सुमारास चीन आणि रशिया इराणला साह्य करत असल्यामुळे अमेरिका आणि इतर देशांमध्ये तणाव वाढण्याच्या शक्यतेमुळे जग चिंतेत आहे.***



**शंतनु चिंताळकर**

अमेरिका आणि इराण यांच्यातील तणावाची परिस्थिती धोकादायक संघर्षाच्या अवस्थेत पोहोचली आहे. अमेरिकेच्या नौदल तैनातीमुळे आणि इराणमध्ये मोठ्या प्रमाणावर जनक्षोभ उसळल्यामुळे प्रत्यक्षात लष्करी संघर्षाचा धोका वाढला आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांमध्ये युद्धाची शक्यता आहे का, हा संपूर्ण जगाला भेडसावणारा प्रश्न आहे. जागतिक युद्ध निश्चित नसले तरी, इराणवरील लष्करी हल्ल्याचा धोका सध्या जास्त आहे. यूएसएस अब्राहम लिंकनच्या नेतृत्वाखालील अमेरिकेचा एक नौदल वाहक आघाडीचा गट सध्या इराणच्या जवळच्या क्षेत्रात दाखल झाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी याला एक खबरदारीचा आर्माडा (लष्करी ताफा) असे याचे वर्णन केले आहे. अमेरिकन लष्कराने आपला दृष्टिकोन कायम ठेवला, तर इराण उच्चस्तरीय युरेनियम संवर्धन पुन्हा सुरू करू शकतो, असे संकेत देऊन इराणने अणुबॉम्ब हे अस्त्रदेखील जवळ बाळगले आहे. यावर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी हे अशक्य असून इराण अणुबॉम्ब बनवू शकत नाही, असे म्हटले आहे. ट्रम्प यांच्या पवित्र्यावर इराणी अधिकाऱ्यांनी इशारा दिला आहे की ते मर्यादित किंवा सर्जिकल हल्ल्यालाही सर्वंकष युद्धाची घोषणा मानतील. त्यांनी आपल्या सैन्याला उच्च सतर्कतेवर ठेवले असून हल्ला झाल्यास प्रदेशातील अमेरिकन तळांना किंवा इस्रायलला लक्ष्य करण्याची धमकी दिली आहे. या निमित्ताने सध्याच्या परिस्थितीचे आणि तिला कारणीभूत असलेल्या घटकांचे विश्लेषण करणे क्रमप्राप्त ठरते. इराणने अमेरिकेच्या नौदल हालचालींना 'आंतरराष्ट्रीय कायद्याचे घोर उल्लंघन' म्हटले आहे आणि या कारवाईला जशास तसे उत्तर देण्याचा इशारा दिला आहे.

या प्रदेशातील अमेरिकेची उपस्थिती गेल्या अनेक वर्षांमधील सर्वोच्च पातळीवर आहे. इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनेई यांनी देशातील अलिकडच्या आंदोलनांमध्ये हजारो लोकांचा मृत्यू झाल्याचे मान्य केले, परंतु या हिंसाचारासाठी अमेरिका आणि इस्रायल या परदेशी चिथावणीखोर राज्यांना जबाबदार धरले. ट्रम्प प्रशासन एका अल्टिमेटमसाठी दबाव आणत आहे, ज्यामध्ये इराणचा अणु कार्यक्रम आणि क्षेपणास्त्र साठ्याचा संपूर्ण नायनाट, हिजबुल्लाह, हमास संघटनांना दिला जाणारा पाठिंबा थांबवणे आणि देशांतर्गत विरोधकांना फाशी देण्याचे थांबवणे या अटींचा समावेश आहे. अमेरिकेचा भर इराणची तेल विकण्याची क्षमता रोखून विद्यमान राजवटीला दिवाळखोर बनवण्यावर आणि तिला वाटाघाटीच्या टेबलवर आणण्यावर आहे. सध्या जागतिक तेल बाजारपेठेत तेलाचा पुरवठा मुबलक आहे आणि अमेरिका स्वतः एक प्रमुख तेल उत्पादक देश बनला आहे. इराणच्या तेलाची गरज असण्याऐवजी अमेरिकेला होर्मुझच्या सामुद्रधुनीची अधिक चिंता आहे. त्यातून जगातील वीस टक्के तेलाचा व्यापार होतो.

युद्धामुळे इराण ही सामुद्रधुनी रोखू शकतो, ज्यामुळे जागतिक ऊर्जा किमती गगनाला भिडतील. गेल्या काही काळात परिस्थिती वेगाने बदलली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील सध्याची परिस्थिती खरोखरच एका गंभीर टप्प्यावर आहे. अमेरिकेने इराणवर हल्ला केल्यास जागतिक युद्ध सुरू होईल का, हा सध्याचा चर्चेचा विषय आहे. जागतिक युद्ध या शब्दाचा अर्थ 'संपूर्ण जागतिक संघर्ष' असा असला तरी तज्ज्ञ त्याकडे आर्थिक परिणामांसह एक उच्च-धोक्याचे प्रादेशिक युद्ध म्हणून पाहतात.

या संघर्षात अमेरिकेने जमिनीवरील आक्रमणाऐवजी 'जास्तीत जास्त दबाव' टाकण्यास प्राधान्य देण्याचे संकेत दिले आहेत. इराणने अमेरिकेचे तळ आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीला लक्ष्य करण्याची धमकी दिली असली तरी, दीर्घकाळ चालणाऱ्या जागतिक युद्धासाठी त्याची क्षमता सध्या कमी झाली आहे. रशिया आणि चीन या महासत्तांचे इराणशी घनिष्ठ संबंध असले तरी ते थेट युद्धात उतरण्याची शक्यता नाही. त्याऐवजी त्यांनी लष्करी मदत, गुप्तचर माहिती, सायबर आणि आर्थिक पर्यायी मार्ग देण्यास सुरुवात केली आहे. भविष्यकाळात युद्ध झाले तर इस्रायल अमेरिकेसोबत प्राथमिक सक्रिय लढवय्या देश असेल, जो इराणच्या क्षेपणास्त्र क्षमता निष्प्रभ करण्यावर लक्ष केंद्रित करेल. जॉर्डन हे अमेरिकेचे एक महत्त्वाचे लॉजिस्टिक केंद्र आहे. प्रादेशिक हल्ल्यांची क्षमता वाढवण्यासाठी अमेरिकेची एफ-१५ विमाने यूकेमधून जॉर्डनच्या हवाईतळांवर तैनात केली गेली आहेत. सौदी अरेबिया, कतार आणि यूएई हे अमेरिकेचे तळ आणि क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली यांना आश्रय देत असले तरी सध्या सावध आहेत. या राष्ट्रांनी अलिकडेच प्रादेशिक सर्वसमावेशक युद्ध टाळण्यासाठी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला आहे, ज्यामुळे तेलाच्या किमती दुप्पट होऊ शकतात आणि त्यांच्या अर्थव्यवस्था उद्ध्वस्त होऊ शकतात. एक पारंपरिक मित्रराष्ट्र म्हणून इंग्लंडने पाठिंबा दिला असला तरी त्याचा लष्करी सहभाग सागरी सुरक्षेवर केंद्रित असण्याची शक्यता आहे.

इराणच्या उत्तरेकडील सीमेवर स्थित अझरबैजान या देशाचे इस्रायलबरोबर जवळचे लष्करी संबंध आहेत. त्यामुळे तेहरानसाठी एक महत्त्वपूर्ण धोका निर्माण होतो. इराण अमेरिकेच्या लाल समुद्रातील जहाज वाहतुकीला लक्ष्य करण्याची आणि सौदी किंवा इस्रायली लक्ष्यांवर लांब पल्ल्याचे हल्ले करण्याची शक्यता आहे. इराक आणि सीरियामधील अमेरिकन तळांवरही इराणकडून हल्ले होऊ शकतात. युक्रेनसोबतच्या संघर्षात खोलवर गुंतलेला असतानाही रशियाने पाश्चात्य निर्बंधांना बगल देण्यासाठी इराणसोबत आपले सामरिक संबंध मजबूत केले आहेत. युद्ध झाल्यास रशिया गुप्तचर माहिती, सायबर समर्थन किंवा प्रगत शस्त्रे पुरवू शकतो, तथापि थेट सैन्य सहभागाची शक्यता कमी आहे. इराणी तेलाचा एक प्रमुख खरेदीदार असल्यामुळे चीनला या प्रदेशातील स्थिरतेमध्ये रस आहे. संघर्ष थांबवण्यासाठी तो कदाचित राजनैतिक आणि आर्थिक दबाव वापरेल, परंतु ऊर्जा सुरक्षेला थेट धोका निर्माण होत नाही, तोपर्यंत तो लष्करी हस्तक्षेप करण्याची शक्यता नाही. नाटो सदस्य आणि इराणसोबत सीमा सामायिक करणारा तुर्की अमेरिकेला हल्ले टाळण्यासाठी राजी करण्याचे अंतिम प्रयत्न करेल. या महिन्यात विश्लेषकांनी नमूद केलेला सर्वात मोठा धोका म्हणजे होर्मुझच्या सामुद्रधुनीची संभाव्य नाकेबंदी. यामुळे तेलाच्या किमती प्रति बॅरल १२० डॉलरच्या वर जाऊ शकतात आणि जागतिक अर्थव्यवस्थेचे संरक्षण करण्यासाठी तटस्थ देशांनाही एका बाजूने उभे राहण्यास भाग पडेल. संभाव्य युद्ध टाळण्याचा तो एक मार्ग असू शकेल.

युद्ध टाळण्यासाठी जगभरातून समांतर राजनैतिक प्रयत्न केले जात आहेत. तुर्की, कतार आणि इजिप्त हे तणाव कमी करण्यासाठी सक्रियपणे काम करत आहेत. या आठवड्याच्या उत्तरार्धात अंकारामध्ये एक संभाव्य उच्चस्तरीय बैठक आयोजित केली जात असल्याची माहिती आहे. दोन्ही देशातील तणाव युरोपियन युनियनपर्यंतही पोहोचला आहे. रशिया आणि चीन या दोन्ही देशांनी अमेरिकेविरुद्ध सामरिक प्रतिकाराची भूमिका घेतली असून इराणवर अमेरिकेचा संभाव्य हल्ला रोखण्यासाठी कठोर राजनैतिक इशाऱ्यांसोबतच लष्करी उपस्थिती वाढवून संतुलन साधले आहे. गेल्या आठवड्यात युरोपियन युनियनने इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (आयआरजीसी)ला दहशतवादी संघटना म्हणून घोषित केल्यानंतर इराणच्या संसदेने प्रत्युत्तर म्हणून युरोपियन युनियन देशांच्या सैन्यांना 'दहशतवादी गट' मानण्याची घोषणा केली आहे. रशिया आणि चीन ही दोन्ही राष्ट्रे इराण एकाकी नाही हे दर्शवण्यासाठी कठोर शक्तीचे प्रदर्शन करत आहेत. रशिया आणि चीनने उत्तर हिंदी महासागर आणि ओमानच्या आखातात मेरिटाइम सिक्युरिटी बेल्ट नौदल सरावाच्या आठव्या आवृत्तीची घोषणा केली. या सरावांमध्ये नियमित नौदल युनिट्स आणि आयआरजीसी यांचा समावेश आहे, जे या प्रदेशाकडे येणाऱ्या अमेरिकेच्या अर्माडाला थेट प्रत्युत्तर म्हणून काम करत आहे. चीनने जानेवारी २०२६ च्या अखेरीस जलद हवाई वाहतूक केली; ज्यात तांत्रिक आणि लष्करी मदत पुरवण्यासाठी मालवाहू विमाने इराणला पाठवण्यात आली, ज्याचा उद्देश इराणची हवाई संरक्षण आणि क्षेपणास्त्र प्रतिबंधक क्षमता पुन्हा उभारणे हा असण्याची शक्यता आहे.

इराणच्या पायाभूत सुविधांना अमेरिका आणि इस्रायलच्या सायबर हल्ल्यांपासून सुरक्षित करण्यासाठी चीन इराणला पाश्चात्य तंत्रज्ञानाच्या जागी सुरक्षित चिनी प्रणाली वापरण्यास सक्रियपणे मदत करत आहे. संयुक्त राष्ट्रांमध्ये, रशिया आणि चीन हे लष्करी कारवाईच्या अधिकाराविरुद्ध इराणचे प्राथमिक संरक्षक म्हणून काम करत आहे. दोन्ही देशांनी लष्करी पर्यायाला अधिकृतपणे विरोध दर्शवला आहे आणि कोणत्याही हल्ल्यामुळे धोकादायक परिणाम होऊन अराजकता निर्माण होईल असा इशारा दिला आहे.

---

# शिवजयंती देखाव्यापुरतीच मर्यादित?

**संतोष राऊळ**

१९ फेब्रुवारी रोजी राज्यभरात शिवजयंती साजरी केली जाते. याचे वेध महिनाभर आधीच शिवप्रेमींना लागलेले असतात. यादरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक व परिसर स्वच्छ करणे, गड किल्ल्यांची डागडुजी करून स्वच्छता करणे, तसेच विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात शिवप्रेमी दंग असतात. काही ठिकाणी मोठं मोठ्या आवाजात शिवाजी महाराजांची गाणी किंवा पोवाडे लावून शिवजयंती साजरी केली जाते. तर, काही ठिकाणी महाराजांचा पेहराव करून, डोक्याला फेटे बांधून, ढोल ताशांच्या किंवा डिजेच्या गजरात पालखी व मुरवणुका काढल्या जातात. परंतु, शिवजयंती आज मिरवणुकीतील देखाव्यापुरतीच मर्यादित राहिली आहे का, असा प्रश्न शिवप्रेमींना पडत आहे.



शिवजयंती आली की मोठंमोठ्या आवाजात त्यांचे पोवाडे लावणे, त्यांच्या सारखा पोशाख करणे, तलवारी मिरविणे, पालखी काढणे असे विविध उपक्रम करण्यात येतात. असे करणे गरजेचे आहे; परंतु, आपण महाराजांच्या शिकवणीतून काय घेतो? हे देखील तितकेच महत्वाचे आहे. आपणच जर कोरडेपाषाण असू तर नव्या पिढीला आपण काय सांगणार? आज शिवजयंती म्हटले की, एखादे मोठे व्यासपिठ, त्यावर वेगवेगळे सांस्कृतीक कार्यक्रम, नाच-गाणी आणि पोवाड्यांचे आयोजन केले जाते. तसेच, काही ठिकाणी मोठंमोठ्या मिरवणुका काढल्या जातात. त्यात शिवाजी महाराजांचा पेहराव करून, डोक्याला फेटे बांधून, भगवे झेंडे धरून बाईक रॅली काढल्या जातात. तसेच, शिवजयंतीच्या काही दिवस आधी महारांच्या स्मारकाची व परिसराची स्वच्छता केली जाते. विशेष म्हणजे शिवभक्त आणि सर्वसामान्य जनता उत्स्फुर्तपणे यात भाग घेत असते, हे महत्त्वाचे आहे. असे वर्षातून फक्त दोन वेळाच घडते. त्यांनतर सोशल मिडीयावर पोस्ट झाल्या की शिवजयंती संपते. खरंतर शक्य होईल तसे वर्षभर काही प्रमाणात शिवजयंतीनिमित्त होणारे कार्यक्रम होणे गरजेचे आहे. नुसतेच गरजेचे नाही, तर ती काळाची गरज असल्याचे शिवप्रेमींमधून बोलले जात आहे. तसेच, राज्यात आज दोन शिवजयंती साजऱ्या केल्या जातात. त्यातील पहिली म्हणजे १९ फेब्रवारी आणि दुसरी तिथीनुसार, जी यावर्षी ६ मार्च रोजी साजरी करण्यात येणार आहे. त्यामुळे काही ठिकाणी शिवजयंतीच्या तारेखेवरून देखील काही प्रमाणात वाद होताना दिसतात. मात्र, शिवजन्म तारेखेवरून वाद न करता किंवा कोणती खरी आणि कोणती खोटी तारीख यावर वादविवाद नक करता शक्य झाल्यास रोजच शिवजन्मोत्सव साजरा व्हावा. सर्व प्रथम शिवजयंती ही महात्मा फुले यांनी साजरी केली होती. १८१८ साली इंग्रजांनी जेव्हा रायगड किल्ला ताब्यात घेतला त्यानंतर जवळ जवळ ६५ वर्षे रायगडावर कोणालाही जाण्यास सक्त मनाई करण्यात आली होती. त्यामुळे महाराजांचा इतिहास काही प्रमाणात पुसला गेला. मात्र, त्यांचा पराक्रम अद्यापही क्रांतीकारांच्या मनांत धगधगत होता. महात्मा फुले यांनी इंग्रजांना फटकारून सर्व प्रथम रायगडावरील महारांची समाधी शोधून काढली. त्यानंतर १८८३ सालानंतर सर्वसामान्य जनता देखील रायगडावर जाऊन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊ लागली. त्यानंतर लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक शिवजयंती साजरी करण्यास सुरूवात केली. त्यावेळी इग्रजांच्या जुलमी सत्तेला मात देण्यासाठी सार्वजनिक शिवजयंती साजरी केली जात असे. सर्वांच्या मनात शिवरायांचा पराक्रम पेरून जुलमी सत्तेला लाथाडून देशाबाहेर काढण्यासाठीचे प्रयत्न होते. परंतु, शिवजयंतीची सुरवातच तारखेच्या वादावरून होते. एक म्हणतो मी तारखेनुसार करणार तर दुसरा म्हणतो मी तिथीनुसार साजरी करणार. मुळात शिवजयंतीची तारीख ही नाममात्र आहे. खरंतर शक्य असेल तर रोजच शिवजयंती साजरी केली पाहिजे. मात्र, आता तसे होताना दिसत नाही. आज जरी देश स्वतंत्र असला तरी काही ठिकाणी हुकुमशाही, गुन्हेगारी, अत्याचार यांचे वर्चस्व आहे. त्यामुळे त्याच्या विरोधात आज शिवजयंतीनिमित्त आवाज उठवणे गरजेचे असल्याचे शिवप्रेमींमधून बोलले जात आहे.

त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांना फक्त शिवजंतीला न आठवता वर्षातील ३६५ दिवस त्यांना आठवून त्यांचा जागर करणे, तसेच त्यांच्या पराक्रमाचा आदर्श सर्वांसमोर ठेवणे गरजेचे आहे. त्यांनी आयुष्यातील संपुर्ण ५० वर्षे रयतेसाठी दिली. साडेतीनशे वर्षे लोटली तरी आजही प्रत्येकाच्या मनात महाराज जिवंत आहेत. आणि तेच काम आपल्याला करायचे आहे. नवीन पिढी त्यांच्या विचाराप्रमाणे घडवायची आहे. ज्या दिवशी पुन्हा सर्व एकत्र येऊ आणि शिवाजी महाराजांचे आचार-विचारांची देवाण-घेवाण करू तीच खरी शिवजयंती असेल. त्यामुळे महाराजांचे पेहराव किंवा त्यांच्या नावाच्या मिरवणूका काढून शिवजयंती फक्त देखाव्यापुरती मर्यादित न ठेवता, त्यांचे आचार-विचार, पराक्रम आणि राजकारण यांचा प्रसार करणे काळाजी गरज असल्याचे शिवप्रेमींमधून बोलले जात आहे.

---

**लोकसंसद**

## सकारात्मक विचार करुन परीक्षा द्या!

फेब्रुवारी मार्च महिना म्हटलं की परीक्षांचा हंगाम. दरवर्षी याच दोन महिन्यात परीक्षा होतात. दहावी बारावी या बोर्डाच्या परीक्षाही याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय यासारख्या स्पर्धा परीक्षाही याच काळात होतात. इयत्ता ५ वी आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षा २२ फेब्रुवारी रोजी आहे. दहावीची बोर्ड परीक्षा आजपासून म्हणजे २० फेब्रुवारी पासून सुरू होत असून ती १८ मार्च पर्यंत असणार आहे. बारावीची परीक्षाही १० फेब्रुवारी रोजी सुरू झाली असून ती ११ मार्चपर्यंत चालणार आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात म्हणूनच या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्वाच्या असतात. करियरच्या दृष्टीने आणि पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी बोर्ड परीक्षेच्या गुणांना खूप महत्व असते. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर भरपूर अभ्यास करत असतात. पण प्रत्यक्ष जेंव्हा परीक्षा जवळ येते तेंव्हा मात्र विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढते. ते साहजिकच असले तरी या काळात विद्यार्थ्यांनी टेन्शन फ्री राहणे महत्वाचे आहे कारण नकारात्मक विचार घेऊन जर विद्यार्थी परीक्षेला गेला तर त्याचा विपरीत परिणाम होऊन वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी पडू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत प्रसन्न रहावे. सतत अभ्यास करण्याऐवजी मध्येमध्ये ब्रेक घेऊन थोडा वेळ टीव्ही पाहणे, संगीत ऐकणे, लहान मुलांशी खेळणे, बाहेर फिरून येणे, मित्रांशी अभ्यासाव्यतिरिक्त इतरही विषयांशी चर्चा करणे, गप्पा मारणे, चित्र काढणे, आवडती पुस्तके वाचणे अशा गोष्टी कराव्यात. रात्री जागरण करणे टाळावे. विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत मोबाईलपासून दूरच राहावे. अभ्यासाचा खूप ताण आल्यास विश्रांती घ्यावी. जर विद्यार्थी परिक्षेचे टेन्शन न घेता सकारात्मक विचार घेऊन परीक्षेला गेला तर यश निश्चित मिळेल. सर्व विद्यार्थी मित्रांना या बोर्ड परीक्षांसाठी मनापासून शुभेच्छा!

**– श्याम ठाणेदार,** पुणे

---

**दिनविशेष**

# जागतिक सामाजिक न्याय दिन

सामाजिक न्याय हा शांततापूर्ण आणि समृद्ध समाजाचा पाया आहे. सामाजिक न्यायामध्ये समानता, एकता आणि मानवी प्रतिष्ठा यासारख्या मूलभूत मूल्यांचा समावेश आहे. ज्याचा उद्देश अधिक समावेशक आणि न्याय्य समाज निर्माण करणे आहे.दरवर्षी २० फेब्रुवारी रोजी जागतिक सामाजिक न्याय दिन साजरा केला जातो. समाजातील गरिबी, बेरोजगारी, लिंगभेद, आणि मानवी हक्क यांसारख्या सामाजिक आव्हानांना तोंड देण्यासाठी, तसेच समानता आणि एकोपा वाढवण्यासाठी संयुक्त राष्ट्रांकडून हा दिवस पाळला जातो. १९९५ मध्ये, डेन्मार्कमधील कोपनहेगन येथे सामाजिक विकासासाठी जागतिक शिखर परिषद आयोजित करण्यात आली होती आणि त्याचा परिणाम कोपनहेगन घोषणापत्र आणि कृती कार्यक्रमात झाला. शिखर परिषदेत १०० हून अधिक राजकीय नेत्यांनी गरिबी आणि पूर्ण रोजगाराविरुद्ध लढण्याचे वचन दिले, तसेच ते स्थिर, सुरक्षित समाजांसाठी काम करतील. विकास योजनांच्या केंद्रस्थानी लोकांना ठेवण्याची गरज असल्याचेही ठरले.

१० वर्षांनंतर, संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रांनी फेब्रुवारी २००५ मध्ये न्यू यॉर्कमध्ये कोपनहेगनच्या घोषणापत्राचा आणि सामाजिक विकासासाठी कृती कार्यक्रमाचा आढावा घेतला. सामाजिक विकास कसा वाढवायचा हा देखील चर्चेचा एक महत्त्वाचा मुद्दा होता. २६ नोव्हेंबर २००७ रोजी, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने २० फेब्रुवारी हा वार्षिक जागतिक सामाजिक न्याय दिन म्हणून घोषित केला. २००९ मध्ये, हा दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला.जगाच्या अनेक भागांमध्ये देशांमधील आणि देशांमधील गरिबी आणि असमानता वाढत आहे. अलिकडच्या काळात आलेल्या आर्थिक आणि सामाजिक संकटांमध्ये साथीच्या रोगांचे परिणाम, हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या नैसर्गिक आपत्ती, भू-राजकीय तणाव आणि सशस्त्र संघर्ष यांचा समावेश आहे. त्यांच्याशी संबंधित मानवी संकटे आणि कामाच्या जगावर त्यांचा परिणाम या पलीकडे, या संकटांनी जगभरातील अर्थव्यवस्था आणि समाजांमधील परस्परसंबंध आणि अवलंबित्व अधोरेखित केले आहे आणि जागतिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय पातळीवर त्यांना प्रतिसाद देण्यासाठी एकत्रित कृतीची महत्त्वपूर्ण आवश्यकता दर्शविली आहे. सामाजिक न्यायामुळे समाज आणि अर्थव्यवस्था चांगल्या प्रकारे कार्य करतात आणि गरिबी, असमानता आणि सामाजिक तणाव कमी होतात. दरवर्षी, संयुक्त राष्ट्रसंघ सामाजिक न्यायाशी संबंधित प्रमुख मुद्दे आणि प्राधान्यक्रमांवर प्रकाश टाकण्यासाठी एक थीम निवडते. सामाजिक न्याय म्हणजे असा दृष्टिकोन की प्रत्येकाला त्यांची वंश, आर्थिक स्थिती, लैंगिकता किंवा लिंग ओळख काहीही असो, समान हक्क, संधी आणि वागणूक मिळण्यास पात्र आहे. सामाजिक न्याय लोकांना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेतील ऐतिहासिक असमानता दूर करण्यास आणि ज्यांना सतत समानता नाकारली गेली आहे, त्यांना मदत करण्यास देखील आवाहन करतो. व्यक्ती-व्यक्तीमध्ये जात, धर्म, वंश, पंथ, वर्ण, जन्मस्थान, लिंगभाव या सामाजिक आधारावर भेदभाव न मानता, प्रत्येक व्यक्तीला विकासाची समान संधी उपलब्ध करून देणे म्हणजे सामाजिक न्याय होय. सामाजिक न्यायाची पाच तत्वे आहेत. ही तत्वे अत्यंत परस्परांशी जोडलेली आहेत. सामाजिक न्याय सुधारणा समाजात एकूण समानता वाढवण्याच्या अनेक प्रयत्नांमध्ये या तत्वांचा समावेश करण्याचा प्रयत्न करते. सामाजिक न्यायाची पाच तत्वे म्हणजे प्रवेश, विविधता, समानता, सहभाग आणि मानवी हक्क. राष्ट्रांमध्ये शांतता आणि सुरक्षितता साध्य करण्यासाठी आणि राखण्यासाठी सामाजिक विकास आणि सामाजिक न्याय अपरिहार्य आहे. त्या बदल्यात, शांतता आणि सुरक्षिततेशिवाय किंवा सर्व मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्यांचा आदर नसल्यास सामाजिक विकास आणि सामाजिक न्याय प्राप्त होऊ शकत नाही.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० फेब्रुवारी

१) श्री.केशव बंडू पांचाळ
ता.अलिबाग, जि.रायगड
दि.२०-२-१९४५

२)श्री.प्रकाश सदाशिवराव जोशी
अलिबाग, रायगड
दि.२०-२-१९४४

३)श्रीम.विभा वसंत म्हात्रे
बामणोली, अलिबाग
दि.२०-२-१९५२

४)श्रीम.सुरेखा अरूण कुवळेकर
चेंढरे, अलिबाग
दि.२०-२-१९६०


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


## मोबाईल चोरणारा पोलिसांच्या ताब्यात

**मुंबई :** केईएम इस्पितळात रुग्ण व नातेवाईकांचे मोबाईल तसेच किमती ऐवज चोरणाऱ्या एका सराईत चोराच्या भोईवाडा पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. अटक आरोपीकडून चोरीचे नऊ मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. केईएममध्ये एका डॉक्टरचा मोबाईल चोरीला गेला होता. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर वरिष्ठ निरीक्षक दत्तात्रय ठापूर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सचिन बोरसे, अनिल बोंग तसेच चव्हाण, धंगेकर, माळी, खेडेकर, पाटील व पथकाने तपास सुरू केला. पथकाने इस्पितळ परिसरातील ५० ते ६० सीसीटीव्ही फुटेज तपासून खबऱ्यांमार्फत माहिती काढली असता मोबाईल चोरणारा सराईत आरोपी फिरोज शेख (४०) हा असल्याचे निष्पन्न झाले असता पोलिसांनी सापळा लावून त्याला ताब्यात घेतले.

# श्रीवर्धन आगार समस्यांच्या विळख्यात

## • वेळापत्रक कायमच कोलमडलेले; भंगार बसेसमुळे प्रवासी त्रस्त

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

**श्रीवर्धन परिवहन आगाराच्या समस्या दिवसेंदिवस वाढतच आहेत. आगारामध्ये नवीन गाड्या आलेल्या असल्या तरी सुद्धा स्थानिक वाहतुकीसाठी शिवशाही बसेस वापरल्या जात आहेत. त्यामुळे स्थानिक नागरिकांना विनाकारण जास्त भुर्दंड सहन करावा लागत आहे.**

श्रीवर्धन आगार सुरू झाल्यापासून नियमितपणे सुटणारी श्रीवर्धन-अलिबाग ही बस श्रीवर्धन आगाराकडून नेहमीच चालू बंद, चालू बंद करण्यात येत असते. वास्तविक पाहता अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण आहे व श्रीवर्धन हे जिल्ह्याच्या एका कोपऱ्यात आहे. त्यामुळे येथील प्रवाशांना दीडशे किलोमीटर दूर अलिबागला जाण्यासाठी प्रवास करावा लागत आहे.

काही कार्यालयीन अधिकारी, कर्मचारी यांची देखील अलिबागला नियमितपणे कामे असतात. परंतु, अलिबाग गाडीचे वेळापत्रक कधी चालू कधी बंद अशा अवस्थेत असल्यामुळे नागरिकांची आयत्या वेळेला पंचाईत होते. तसेच श्रीवर्धन सातारा ही नियमित चालणारी बस सुद्धा पुन्हा बंद करण्यात आली आहे. या फेरीला भारमान चांगले असून सुद्धा श्रीवर्धन आगाराकडून का बंद करण्यात आली? याबाबत कोणताही खुलासा आगाराकडून करण्यात येत नाही. श्रीवर्धन आगारामध्ये अहिल्यानगर, बीड, उस्मानाबाद व लातूर या चार जिल्ह्यातील चालक, वाहक व कर्मचारी जास्त प्रमाणात असल्यामुळे श्रीवर्धन ते लातूर व बीड या फेऱ्या कधीही बंद न करता नियमितपणे चालवल्या जातात. या फेऱ्यांना भारमान नसताना सुद्धा केवळ आपल्या कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी म्हणून या फेऱ्या सुरू असतात.



तरी श्रीवर्धनच्या प्रवाशांची ठाम मागणी आहे की, लातूर, बीड गाड्या बंद करून फक्त श्रीवर्धन पुणे हीच बस दिवसातून दोन ते तीन वेळा सोडावी. त्याचप्रमाणे श्रीवर्धन सातारा ही फेरी नियमित सुरू करावी व स्थानिक फेऱ्यांसाठी शिवशाहीचा वापर न करता लाल परीचाच वापर करून आगार व्यवस्थापनाने या सर्व बाबींचा विचार करावा, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

### रिक्षासाठी विनाकारण खर्च

**अनेकवेळा लातूर, श्रीवर्धन, पुणे या बसेस संध्याकाळी आठच्या दरम्यान श्रीवर्धनमध्ये पोहोचतात. परंतु, त्यांना गावातून राऊंड असून सुद्धा चालक गावामध्ये गाडी आणण्यास नकार देतात. त्यामुळे प्रवाशांना श्रीवर्धन स्थानकातच उतरावे लागते. तेथून ७० रुपयांपासून १०० ते १५० रुपयांपर्यंत रिक्षासाठी विनाकारण खर्च करावा लागतो. तरी आगार व्यवस्थापनाने या सर्व बाबींचा विचार करावा, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.**

## करंजाडेमध्ये घरफोडीत दागिने लंपास

**| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |**

करंजाडे परिसरात घरफोडीची घटना उघडकीस आली आहे. अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून सुमारे ५७ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे मंगळवारी (दि.१७) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रीया कांबळे या करंजाडे येथील सिद्धिविनायक प्रारंभ सोसायटी, सेक्टर आर-३ येथे वास्तव्यास आहेत. त्या घराबाहेर गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप उघडून आत प्रवेश केला. घरातील कपाटांची उचकापाचक करून चोरट्याने सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले. चोरीची बाब लक्षात येताच प्रीया कांबळे यांनी तात्काळ पोलिसांत तक्रार दाखल केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. तसेच परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी सुरू करण्यात आली असून संशयितांचा शोध घेतला जात आहे.

करंजडे परिसरात वाढत्या घरफोडीच्या अशा घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पुढील तपास सुरू आहे.

## महिलांसाठी आरोग्य जागरूकता कार्यक्रम

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

महिला वर्ग घर सांभाळीत असताना आपल्या आरोग्याकडे सातत्याने दुर्लक्ष करीत असतात. घरातील कुटुंबाची जबाबदारी घेत असताना त्यांनी स्वतःकडे लक्ष दिले पाहिजे, हे उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून मर्क या संस्थेच्या माध्यमातून महिला वर्गासाठी आरोग्य जागरूकता आणि समुपदेशचे आयोजन, आंबिवली येथे सीआरपी कमल जाधव यांच्या निवासस्थानी करण्यात आले होते.




यावेळी महिलांच्या समस्यांसमवेत गरोदर माता स्तनपान, संधी वात, गुडघेदुखी असे आजार दिवसेंदिवस वाढत आहेत. तसेच मुलांना मोबाईलपासून दूर ठेवले पाहिजे. तसेच पुस्तक वाचण्याची आवड त्यांच्या मध्ये रूजू केली पाहिजे, यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### मर्क संस्थेचा पुढाकार

हा कार्यक्रम मर्क या संस्थेच्या माध्यमातून घेण्यात येत असून मागील आठवड्यापासून हा उपक्रम सुरू आहे. यामध्ये महिला सक्षमीकरण करण्यासाठी भर दिला जात आहे. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र लोहप डॉ. मंगेश देशमुख, खरात (नर्स), आशासेविका कविता भोइर, सतिश राणीम, सी.आर.पी महिला बचत गट अध्यक्ष कमल जाधव, आशासेविका मनिषा जाधव तसेच या पंचक्रोशीतील महिला वर्ग उपस्थित होत्या.

## आदगाव हायस्कूलमध्ये 'हिंद-दी-चादर' पंधरवडा उत्साहात

**| आदगाव | प्रतिनिधी |**

जनता शिक्षण संस्था, बोर्ली पंचतन अंतर्गत आदगाव हायस्कूल, आदगाव येथे गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त 'हिंद-दी-चादर' पंधरवडा मोठ्या उत्साहात व विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. शाळेच्या प्रांगणात देशभक्तीपर वातावरणात आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पंधरवड्याची सुरुवात गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापकांनी प्रास्ताविकात गुरु तेग बहादुर यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत त्यांच्या शौर्य, त्याग आणि धर्मस्वातंत्र्यासाठी दिलेल्या बलिदानाचे महत्त्व अधोरेखित केले. 'हिंद-दी-चादर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गुरुजींनी अन्यायाविरुद्ध लढा देत मानवतेचा संदेश दिला, असे त्यांनी नमूद केले. या पंधरवड्यांतर्गत प्रश्नमंजूषा स्पर्धा, निबंध लेखन, वक्तृत्व स्पर्धा, घोषवाक्य लेखन तसेच भित्तीपत्रक सादरीकरण अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रश्नमंजूषा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी गुरुजींच्या बालपणापासून ते त्यांच्या बलिदानापर्यंतच्या इतिहासावर आधारित प्रश्नांची अचूक उत्तरे देत आपले ज्ञान सिद्ध केले. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयीची जिज्ञासा वाढली असल्याचे शिक्षकांनी सांगितले. निबंध व वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी गुरु तेग बहादुर यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग प्रभावी शब्दांत मांडले. धर्मस्वातंत्र्य, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश यावर विद्यार्थ्यांनी आपली मते व्यक्त केली. कार्यक्रमादरम्यान शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली.



## डंपरची कारला धडक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

घाटकोपर येथे राहणारे मिथिल राणे हे मारुती सुझुकी कार क्रमांक एम एच ०३ इ बी ८३ ५३ घेऊन देवगड सिंधुदुर्ग येथे निघाले होते. यावेळी वेगाने आलेल्या डंपरने त्यांच्या कारला पाठीमागून धडक दिली. या अपघातात मिथिल यांची मुलगी त्रिशिका मिथिल राणे (९) जखमी होऊन बेशुद्ध झाली. तसेच कारचेदेखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या अपघाताप्रकरणी डंपर क्रमांक एमएच ४७ बीवाय १२२० वरील चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ट्रकची कारला धडक; दोघेजण जखमी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

ट्रकने कारला दिलेल्या धडकेत दोघेजण जखमी झाले. या अपघातात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. ट्रक क्रमांक जी जे ३२ व्ही २०२३ वरील चालका विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ओमकार जगदीश घरत हे कोनगाव येथे राहत असून ते शुभम सुरेश घरत यांच्यासोबत कोन गाव येथून कासारभट, पनवेल येथे इनोवा क्रिस्टा कार क्रमांक एम एच ४६ बीव्ही ७६ ७५ घेऊन जात होते. चिंचवण पनवेल येथे चर्चच्या समोर आले असता समोरून आलेला ट्रक क्रमांक जी जे ३२ व्ही २०२३ हा विरुद्ध दिशेने भरधाव वेगाने आला आणि त्यांच्या इनोवा कारला जोरात ठोकर मारून अपघात केला. या अपघातामध्ये कारची एअर बॅग निघाल्याने ओमकार घरत त्याला किरकोळ दुखापती झाल्या. त्यांच्यासोबत असलेले शुभम सुरेश घरत हा गंभीर जखमी झाला. शुभम घरत यांना गांधी हॉस्पिटल पनवेल येथे दाखल करण्यात आले. त्यानंतर बेलापूर येथे नेण्यात आले. या अपघातात कारचे मोठे नुकसान झाले.

## महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी

### मेमोग्राफी, पेप्समेयर चाचणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**| उरण | प्रतिनिधी |**

महिलांच्या आरोग्य प्रति जागरूकता निर्माण करण्यासाठी श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण आणि आई माऊली महिला ग्राम संघ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.१८) करंजा येथे मोफत मेमोग्राफी आणि पेप्समेयर तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

करंजा ग्रुप ग्रामपंचायत चाणजे येथील द्रोणागिरी देवीच्या मैदानात सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत शिबीर पार पडले. या शिबिरासाठी एमओसी कॅन्सर केअर सेंटर पनवेल यांचे तांत्रिक सहकार्य लाभले. सेंटरचे नितीन पटेल, विजय औटी, सतीश पारेकर, ऋतुषा बामणे, शगुप्ता खान यांनी उपस्थित महिलांचे आरोग्य तपासणी करून त्यांना मार्गदर्शन केले. कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे, या उद्देशाने मेमोग्राफी आणि महत्त्वाच्या चाचण्या यावेळी विनामूल्य करण्यात आल्या. त्याचप्रमाणे उरणमधील सुप्रसिद्ध डॉ. अजय कोळी आणि डॉ. विकास मोरे यांचेही महत्त्वाचे योगदान लाभले. या सामाजिक उपक्रमासाठी श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्थेच्या अध्यक्षा संगीता ढेरे, कविता म्हात्रे आणि अभया म्हात्रे यांनी विशेष मेहनत घेतली. तसेच आई माऊली ग्राम संघाच्या अध्यक्षा अनु पाटील, नैना पाटील, उज्वला म्हात्रे, तृप्ती घरत आणि निशा म्हात्रे यांचे शिबिराच्या नियोजनात मोठे योगदान लाभले.




या शिबिराला परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली. ग्रामीण भागातील महिलांसाठी अशा प्रकारच्या अत्याधुनिक वैद्यकीय चाचण्या विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## निवडक




### संजय कदम पुरस्काराने सन्मानित

**पनवेल :** रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनतर्फे आयोजित विशेष कार्यक्रमात गेली २५ वर्षे सातत्याने विविध वृत्तपत्रात पत्रकारिता करणारे, त्याचप्रमाणे सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांच्या कामाची व कार्याची दखल घेत त्यांना व्होकेशनल एक्सलन्स अ‍ॅवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनचे अध्यक्ष रो.निलेश पोटे, सचिव रो.हितेश राजपूत, खजिनदार जितेंद्र बालड, डायरेक्टर रो.विजय मेढेकर, संजय जैन, डॉ.जयश्री पाटील, देवयानी पोटे यांच्यासह रोटरीचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन पनवेल येथील स्व.पावर्तीबाई महादेव सावळेकर रोटरी सभागृह येथे हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाप्रसंगी मेघना संजय कदम प्राणिक हेलींग आणि मेडीटेशन या संदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच त्यांच्या शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमांतर्गत अध्यक्ष निलेश पोटे यांनी आगामी रोटरी क्लबतर्फे घेण्यात येणाऱ्या विविध प्रोजेक्ट संदर्भात त्यामध्ये प्रामुख्याने माहिती दिली. अस्मिता प्रोजेक्ट त्यामध्ये सॅनिटरी पॅड, वेडींग मशिनचे शाळांना वाटप, स्कील लॅब प्रोजेक्ट, तसेच जल पुर्नजीवन प्रोजेक्ट संदर्भात माहिती दिली.




### उणेगाव येथे नृत्य स्पर्धा उत्साहात

**माणगाव :** उणेगाव येथे महाशिवरात्री उत्सव २०२६ निमित्त श्री काळभैरव मुंबईकर मंडळ, सत्त्वे आळी यांच्या वतीने भव्य जिल्हास्तरीय खुल्या गटाची नृत्यस्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सोमवारी (दि.१६) रात्री ९ वा. मोठ्या उत्साहात ही स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या नृत्यसंघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पारंपरिक, लोकनृत्य, देशभक्तीपर तसेच सामाजिक संदेश देणाऱ्या नृत्याविष्कारांनी प्रेक्षकांची मने जिंकली. रंगतदार सादरीकरणांमुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिके व चषक देऊन गौरविण्यात आले. प्रथम क्रमांकास ११ हजार १११ रुपये, द्वितीय क्रमांकास सहा हजार ६६६ रुपये, तृतीय क्रमांकास पाच हजार ५५५ रुपये व चतुर्थ क्रमांकास तीन हजार ३३३ रुपये अशी पारितोषिके प्रदान करण्यात आली. परीक्षकांनी सादरीकरणातील ताल, अभिनय, सर्जनशीलता व एकूण सादरीकरण यांचा विचार करून निकाल जाहीर केला. कार्यक्रमास ग्रामस्थ, पालकवर्ग व तरुणाईची मोठी उपस्थिती लाभली. आयोजक मंडळाने उत्कृष्ट नियोजन करून स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडली. महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने आयोजित या नृत्यस्पर्धेमुळे स्थानिक कलाकारांना आपली कला सादर करण्याचे व्यासपीठ मिळाले असून उपस्थितांनी कार्यक्रमाचे भरभरून कौतुक केले. श्री कालभैरव मुंबईकर मंडळ ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळ पुणे गाव यांनी या नृत्य स्पर्धेचे उत्तम असे नियोजन केले होते.

### आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**नेरळ :** कडाव येथे प्राथमिक शिक्षक स्व. राजेंद्र आढाव यांच्या स्मृतीदिनानिमित्त आरोग्य शिबिर तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात जनरल चेकअप आणि रक्तदान करण्यासाठी रुग्णांनी गर्दी केली होती. कर्जत तालुक्यातील कडाव येथील ग्रामस्थ असलेले जिल्हा परिषद शिक्षक राजेंद्र तुळशीराम आढाव यांच्या द्वितीय स्मृती दिनानिमित्त कडाव येथे आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जीवक आयुर्वेद रुग्णालय आणि रायगड हॉस्पिटल रक्तपेढी यांच्या माध्यमातून हे आरोग्य शिबीर घेण्यात आले. रुग्णांची तपासणी डॉ. अशोक लोंढे आणि डॉ. रुपाली गायकवाड आणि आरोग्य पथकाने केली, तर रायगड हॉस्पिटलच्या रक्तपेढीने रक्त संक्रमणाचे कार्य केले. या शिबिराचे नियोजन योगेश घाणेकर यांनी केले असून त्यांना अशोका इंटरप्रायझेसचे सहकार्य लाभले. यावेळी असंख्य रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला आणि उपचार करून घेतले.

### श्रीवर्धनमध्ये पोपटी लावण्यास सुरुवात



**श्रीवर्धन :** कोकणातील विशेषतः रायगड जिल्ह्यामध्येच पोपटी लावण्याची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. आपल्या शेतात जेव्हा गावठी वालाच्या शेंगा तयार होतात. त्या वेळेलाच पोपटी बनवून खाण्याचा आनंद लुटण्यात मजा येते. श्रीवर्धन परिसरात सध्या घरगुती पोपटी लावून खाण्याचा आनंद कौटुंबिक स्तरावरती घेतला जात आहे. तर काही तरुण मंडळी पार्टी करताना खूप मोठ्या प्रमाणावर पोपटी शेतामध्ये किंवा एखाद्या फार्म हाऊसमध्ये लावतात. त्या पोपटीमध्ये चिकन, अंडी, बटाटे, मच्छीचा तुकड्या इत्यादी पदार्थ टाकून देखील पोपटी लावण्यात येते. पोपटीमध्ये चिकन किंवा मच्छीच्या तुकड्या टाकताना चिकनला किंवा मच्छीच्या तुकड्यांना मसाला लावून केळीचे पान आगीवर पोळून घेऊन त्याच्या पुड्या बांधल्या जातात व त्या वालाच्या शेंगांमध्ये मडक्यामध्ये टाकून त्याची पोपटी लावली जाते. पोपटी लावताना वालाच्या शेंगा बरोबरच ओवा, मीठ इत्यादी पदार्थ त्यामध्ये टाकले जातात. त्यामुळे केवळ वाफेवर शिजलेल्या सर्व पदार्थांना अतिशय चांगल्या प्रकारची चव येते. सध्या मडक्यांचे भाव देखील खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. परंतु खवय्यांच्या आनंदाला वाढलेल्या किमतीची देखील परवा नसते. महागडे मडके आणून पोपटी लावून खाण्याचा आनंद हा वेगळाच असतो.


### महाराजांच्या तेजाचे जिवंत दर्शन | रांगोळी पाहण्यासाठी विद्यार्थ्यांची गर्दी

# सोनाली मुरुडकरने रांगोळीतून साकारले शिवराय

**| माणगाव | प्रतिनिधी |**

**माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या दत्तात्रय तटकरे महाविद्यालय येथे शिवजयंतीचा उत्सव यंदा एका वेगळ्याच भावविश्वात साजरा झाला. बी.एससी. प्रथम वर्षात (आय. टी. शाखा) शिक्षण घेणारी सोनाली रणजित मुरुडकर हिने आपल्या कल्पकतेच्या रंगांनी अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची अप्रतिम रांगोळी साकारून संपूर्ण महाविद्यालयाला अभिमानाची अनुभूती दिली.**





शिवजयंतीनिमित्ताने काढलेली ही रांगोळी केवळ रंगांची मांडणी नव्हती, तर ती शिवभक्तीची साक्ष होती. महाराजांच्या तेजस्वी मुखमुद्रेतील आत्मविश्वास, डोळ्यांतील निर्धार आणि भगव्या पार्श्वभूमीतील तेज या सर्वांचे जिवंत दर्शन या रांगोळीतून घडत होते. रांगोळी पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी अक्षरशः गर्दी केली होती. अनेकांनी या कलाकृतीसमोर उभे राहून मोबाईलमध्ये छायाचित्रे टिपली, तर काहींच्या डोळ्यांत अभिमानाचे अश्रूही दाटून आले.

सोनालीची ही कला एका दिवसाची कमाई नाही. शालेय जीवनात असतानाच तिने चित्रकलेच्या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण करून आपल्या कलेची पायाभरणी केली. त्या काळातच तिच्या मनात रंगांविषयीची ओढ निर्माण झाली आणि रांगोळीच्या माध्यमातून चित्र रेखाटण्याची अनोखी आवड तिने जोपासली. कोणताही औपचारिक कोर्स न करता, केवळ आत्मविश्वास, सराव आणि जिद्दीच्या बळावर तिने स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

महाविद्यालयात आयोजित विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत तिने अनेक पारितोषिके आणि बक्षिसे मिळविली आहेत. तिच्या या यशामागे चिकाटी, सातत्य आणि स्वतःला सिद्ध करण्याची जिद्द आहे. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि मान्यवरांनी तिच्या कलेचे मनापासून कौतुक करत, भविष्यात ती रांगोळी आणि चित्रकलेच्या क्षेत्रात एक उत्कृष्ट व नावाजलेली कलाकार बनेल, असा विश्वास व्यक्त केला.

शिवजयंतीच्या मंगल दिवशी साकारलेली ही रांगोळी केवळ एक कलाकृती नव्हती, तर ती शिवप्रेम, संस्कार आणि कलेच्या संगमातून उभी राहिलेली प्रेरणागाथा होती. सोनाली मुरुडकरच्या या कलेने महाविद्यालयाचा आणि माणगावचा नावलौकिक उंचावला आहे.

# निवडक



## उपसरपंचपदी समाधान बैलमारे बिनविरोध

**पाताळगंगा–खोपोली :** खालापूर तालुक्यातील सावरोली ग्रुप ग्रामपंचायतीचे उप सरपंचपद मागील काळात दोन वर्षांच्या कालावधीसाठी मनाली दर्गे यांना देण्यात आला होता. त्यांचा कार्यकाळ समाप्त झाल्याने त्यांनी उप सरपंचपदाचा राजीनामा दिला. या रिक्त जागेवर उपसरपंचपदाची निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीसाठी सदस्य समाधान बैलमारे यांचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक अधिकारी योगेश पाटील यांनी सरपंच संतोष बैलमारे यांच्या अध्यक्षतेखाली समाधान बैलमारे यांची उप सरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांनी बैलमारे यांना शुभेच्छा देऊन पुढील वाटचाल व गावाच्या विकासासाठी प्रयत्न करावे, अशा शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक सुनील पाटील, सावरोली सरपंच तथा रायगड जिल्हा परिषद सदस्य संतोष बैलमारे, माजी जिल्हा परिषद सदस्य शेखर वालेकर, गजानन पाडगे, नागेश मेहत्तर, निवृत्ती सालेकर, संतोष चिले, विनोद चोगले, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, नंदकुमार पाटील, किशोर घोसाळकर, नरेश मणेर, विवेक पाडगे, गणेश घाटवळ, रामकृष्ण लोते, संदीप घोसाळकर, संदीप वादळ आदींसह ग्रामस्थ व विविध मान्यवर उपस्थित होते.

## बालरुग्णांसाठी 'सुपर स्पेशालिस्ट' आरोग्य शिबिराचे आयोजन

**दिघी :** ग्रामीण भागातील बालकांना तज्ज्ञ वैद्यकीय सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हावी या उद्देशाने बोर्लीपंचतन येथे 'बालरुग्ण सुपर स्पेशालिस्ट आरोग्य शिबीर' आयोजित करण्यात आले आहे. डॉ. राजेश पाचरकर मित्र फाऊंडेशनच्या पुढाकाराने




रविवारी (दि.२२) सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत प्राथमिक आरोग्य केंद्र–बोर्लीपंचतन येथे हे शिबीर होणार आहे. मुंबई, पुणे, ठाणे, पनवेल, माणगाव, महाड आणि अलिबाग येथील तज्ज्ञ डॉक्टर या शिबिरात सहभागी होणार असून बालरोग, अस्थिरोग, सर्जिकल, नेत्ररोग व न्यूरोलॉजी या क्षेत्रातील तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे. ग्रामीण भागात अनेक बालकांमध्ये जन्मजात विकार, हाडांचे आजार, डोळ्यांचे विकार, मेंदूशी संबंधित समस्या आढळून येतात; मात्र वेळेवर निदान न झाल्याने पुढे गुंतागुंत वाढते. अनेक पालक आर्थिक कारणांमुळे शहरात उपचारासाठी जाऊ शकत नाहीत. या पार्श्वभूमीवर हे शिबहर महत्त्वाचे ठरणार आहे. शिबिरात फिमोसिस, हर्निया, अंडकोष न उतरणे, हायपोस्पॅडियस, लिम्फ नोड, लिपोमा, सिस्ट इत्यादी सर्जिकल समस्यांवर सल्ला दिला जाणार आहे. तसेच, भेंगडेपणा, लेझी आय, मोतीबिंदू, नंबर तपासणी अशा डोळ्यांच्या तपासण्या केल्या जाणार आहेत. ऑटिझम, एडीएचडी, अपस्मार, मस्क्युलर डिस्ट्रॉफी, विकासातील विलंब यांसारख्या न्यूरोलॉजिकल समस्यांवर तज्ज्ञ मार्गदर्शन होणार आहे.



## शरण्या वाघमोडेची चमकदार कामगिरी

**मुरूड :** तालुक्यातील साळाव येथील जिंदल विद्या मंदिरातील इयत्ता पाचवीत शिकणारी विद्यार्थीनी शरण्या वाघमोडे हिने चमकदार कामगिरी केली आहे. तिने जानेवारीमध्ये आयोजित ऑनलाईन इंटरनॅशनल परफॉर्मिंग आर्ट्स कॉन्टेस्ट अँण्ड फेस्टिव्हलमध्ये प्रथम क्रमांक पटकावून शाळेचा तसेच परिसराचा मान उंचावला आहे. नागपूर येथील अखिल नटराजम् आंतर सांस्कृतिक संघ पॅरिस–फ्रान्स यांच्या माध्यमातून झालेल्या या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय स्पर्धेत शरण्याने नृत्य व नाटिकाचे उत्कृष्ट सादरीकरण, शिस्तबद्धता आणि सर्जनशील अभिव्यक्तीच्या जोरावर हा मानाचा बहुमान मिळवला. तिच्या या यशामुळे जिंदल विद्या मंदिरला आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव प्राप्त झाले आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी शरण्याचे अभिनंदन करून तिच्या जिद्द, परिश्रम आणि चिकाटीचे कौतुक केले. तिने कलाक्षेत्रात सातत्याने प्रगती करत इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. एस.एम.सी. अध्यक्ष पंकज मलिक तसेच उपप्राचार्य मंगेश बामनोटे यांनीही शरण्याचे अभिनंदन केले.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **कामासाठी माणसे/मुलगे पाहिजे–** १) कंपनीचे मोबाईल विक्रीसाठी दुकानदारांकडे १) उरण–उलवा २) पेण पोयनाड ३) माणगाव–महाड–बिरवाडी, पोलादपूर, कर्जत/खोपोली, २) डिलेवरी एस.टी.ने अथवा बाईकने (पेण–अलिबाग) (रेवदंडा–मुरुड–अलिबाग) लायसन्स पाहिजे. (बाईक आमची) ३) कॉम्प्युटर ऑपरेटर (मुलगी) पाहिजे. ४) पार्ट/फुल टाईम चालेल. संपर्क–८८८८२२०२२१.
- **ग्राफिक डिझाईन,** सोशल मीडिया हॅंडिन साठी अनुभवी मुलगी पाहिजे. मो.९९२१०७३९६३
- **पाहिजेत–**अलिबाग येथे ऑफीसमध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर/ऑफीस असिस्टंट पाहिजे. संपर्क– श्री. मधुकर पाटील ९२७३२८९०१५/९४२०३२५१०६
- **हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहेत.** १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास ४)X-Rayसाठी मुले ५) मावशी/आयाबाई आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र आणावे. अंजली हॉस्पिटल अलिबाग. ७७४५०५००२५/९११९५६५०२२/९३२१३०३९३८
- **मंगलग्रेन स्टोअर्स, बाजारपेठ,** अलिबाग येथे Packing व डिलेवरी व इतर कामासाठी मुल, मुली पाहिजेत. संपर्क :– ७८७५९९००९२
- **शर्वरी एंटरप्रायजेस चेंढरे–अलिबाग येथे सोलर**/इलेक्ट्रिकल दुकानात काम करण्यासाठी बारावी पास मुलगा पाहिजे. BA/BCom शिक्षण घेत असलेला सुद्धा चालेल. संपर्क : ७७५५९३२२२९

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


# घुरूप कुटूंबियांची घरासाठी वणवण

## • सहा महिने उलटूनही मदत नाही

**| महाड | प्रतिनिधी |**

महाड तालुक्यातील भवानी नडगांव या गावात गतवर्षी जुलै महिन्यात आलेला पाऊस व सोसाट्याच्या वाऱ्यामुळे येथील घुरूप कुटुंबीयांच्या घराचे मोठे नुकसान झाले होते. त्यावेळी तलाठी यांनी शासकीय पंचनामे करून तहसील कार्यालयाकडे सुपूर्द केले होते. परंतु, अद्यापही घुरूप कुटूंबाला मदत मिळालेली नाही.



महाड तालुक्यातील भवानी नडगांव या गावात २५ जुलै, २०२५ रोजी अचानक आलेला पाऊस व सोसाट्याच्या वाऱ्यामुळे येथील काही घरांची पडझड झाली होती. त्यात घुरूप कुटुंबीयांच्या घराचे मोठे नुकसान झाले होते. त्यांच्या घराच्या छताची व भिंतीची पडझड झाली होती. त्यावेळी या दुर्घटनेतून कविता कृष्णा घुरुप (६१) आणि श्लोक निलेश घुरूप (८) हे आजी व नातू थोड्यात बचावले होते. त्यावेळी त्यांचा जीव तर वाचला, परंतु घुरुप कुटुंबाचे जीवन विस्कळीत झाले आहे. कविता घुरूप यांचा मुलगा निलेश घुरूप यांचे सात वर्षांपूर्वीच निधन झाले होते. तेव्हापासून वयोवृद्ध महिला कविता घुरूप आणि सून निकिता घुरूप यांना जगण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. त्यातच या आस्मानी संकटाने त्यांचे जीवन कोलमडले आहे. त्यावेळी संबंधित तलाठी यांनी दुर्घटनास्थळी जाऊन शासकीय पंचनामे करून तहसील कार्यालयाकडे ते सुपूर्द केले होते.

> अचानक आलेल्या अतिवृष्टी पावसामुळे माझ्या घरचे मोठे नुकसान झाले असून, त्याचे पंचनामे होऊनही अध्यापही शासनाकडून मला कोणतेही भरपाई मिळाली नाही. सध्या आम्ही बळीराम घुरूप यांच्या घरी राहत आहोत. मे व जून दरम्यान पावसाळा सुरू होईल. त्यापूर्वी आम्हांला घर मिळावे, घर नसल्याने आम्ही अडचणीत आलो आहोत.
> – निकिता घुरूप

प्रत्यक्षात मात्र घुरूप कुटूंबाला अद्याप मदत मिळालेली नाही. घुरूप कुटूंबाला पूर्ण निवारा मिळण्यासाठी प्रशासकीय योजने अंतर्गत तात्काळ घर मिळावे, यासाठी मागणी केली होती. मात्र, या घटनेला ६ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी उलटला, तरी नुकसानग्रस्त कुटूंबाला शासकीय नुकसान भरपाई मिळाली नाही. त्यामुळे स्थानिक नागरिक संताप व्यक्त करत आहेत. जनतेप्रती शासनाची संवेदनशीलताच लोप पावली आहे काय, असा सवाल देखील उपस्थित केला जात आहे.

> नुकसान झालेल्या घरमालकाला घर मिळावे, यासाठी घराचा पंचनामे तात्काळ पूर्ण करून योग्य कागदपत्रासह महाडच्या तहसील कार्यलयामार्फत प्रस्ताव पाठवला आहे.
> – अस्मिता खेदू, तलाठी

# पंचायतराज अभियानाचा रानवलीत जागर

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यातील रानवली ग्रामपंचायतीने एक नवा आदर्श निर्माण केला आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान केवळ कागदावर न ठेवता, ते थेट गावाच्या पारावर उतरविण्यात आले आहे. ग्रामपंचायती समोरील ऐतिहासिक पाराचे रूपांतर एका खुल्या ज्ञानमंदिरात करण्यात आले असून, येथे मराठी आणि उर्दू वृत्तपत्रांचे वाचनालय सुरू करण्यात आले आहे.

## चित्रातून प्रबोधन, पारावर वृत्तपत्र क्रांती




गावातील पारावर बसून गप्पा मारण्याची परंपरा जुनी आहे; मात्र, रानवली ग्रामपंचायतीने या गप्पांना वैचारिक जोड दिली आहे. अभियानातील महत्त्वाचे घटक आणि शासकीय योजनांची माहिती देणारी बोलकी चित्रे या पारावर रेखाटण्यात आली आहेत. त्यामुळे पारावरून चालणारे प्रत्येक पाऊल आता माहितीने समृद्ध होत आहे. या उपक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे येथे भाषेची भिंत ओलांडून मराठी आणि उर्दू अशा दोन्ही भाषेतून वृत्तपत्रे उपलब्ध करून दिली आहेत. ग्रामीण भागात अशा प्रकारचे अष्टपैलू वाचनालय सुरू होणे ही एक क्रांतिकारी पाऊल मानले जात आहे. या उपक्रमाचा शुभारंभ नुकताच प्रमुख मान्यवरांची उपस्थिती मोठ्या दिमाखात पार पडला. यावेळी रानवली सरपंच सुरेश मांडवकर, उपसरपंच अताउल्ला जालगावकर, समाजसेवक राजू जाधव, मुख्याध्यापक भिकू पांगारकर, ग्रामसेवक अधिकारी अभिजित माने आदी उपस्थित होते.

# रेवदंड्यातील रो–रो जेट्टीच्या कामाला प्रारंभ

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**



पर्यटन वाढीसाठी सागरी वाहतुकीस राज्य शासन भर देत असून मांडवा रो–रो जेट्टीच्या धर्तीवर कोकण किनारपट्टीवर ठिकठिकाण रो–रो जेट्टी उभारण्याचे काम हाती घेतले गेले आहे. त्यापैकी रेवदंडा मोठे बंदर येथे कुंडलिका समुद्र खाडीच्या मुखावर रो–रो जेट्टी उभारण्याचे कामास प्रारंभ झाला आहे.

मुंबईहून थेट रत्नागिरीपर्यंत रो–रो सेवा शासन सुरू करण्याचा प्रयत्नात आहे. त्यामुळे मांडवा रो–रो सेवेसाठी उभारलेल्या जेट्टी पाठोपाठ मुरूड तालुक्यातील काशिद व अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथे मेरीटाईम बोर्डाच्या कक्षेत रो–रो जेट्टी बांधण्यात येत आहे. अंदाजे १२० कोटी रूपयांचा निधी या रो–रो जेट्टीसाठी मंजूर झाला आहे. रेवदंड्यातील रो–रो जेट्टीचे काम मे. अजवानी इंन्फ्रास्ट्रचर प्रा.लि. या कंस्ट्रशन कंपनीस देण्यात आले आहे.

# ओएनजीसी प्रकल्प गुजरातला?

## ६०० कामगार रस्त्यावर येण्याची भीती

**| उरण | प्रतिनिधी |**

उरणमधील न्हावा येथे कार्यरत असलेला ओएनजीसीचा सप्लाय बेस प्रकल्प गुजरातमधील पिपावाव येथे हलविण्याच्या हालचाली सुरू असल्याची माहिती समोर येताच कामगारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या निर्णयामुळे सुमारे ६०० स्थानिक कामगार बेरोजगार होण्याची शक्यता व्यक्त होत असून, मंगळवारी (दि.१७) कंपनीच्या प्रवेशद्वारावर जोरदार निदर्शने करण्यात आली.

जेएनपीए बंदरालगत ४५ वर्षांपूर्वी उभारण्यात आलेला न्हावा सप्लाय बेस हा 'मुंबई हाय' येथील तेल व गॅस विहिरींसाठी अत्यंत महत्त्वाचा केंद्रबिंदू मानला जातो. सुमारे १०० ते १२५ किलोमीटर सागरी अंतरावर असलेल्या विहिरींपर्यंत अवजड यंत्रसामग्री, पाइप, सिमेंट व इतर साहित्य जहाजांद्वारे याच ठिकाणाहून पाठवले जाते. मात्र, हा प्रकल्प गुजरातला हलविण्याचे निर्देश ओएनजीसीच्या नियोजन व परिवर्तन विभागाचे अध्यक्ष अजय कुमार सिंग यांनी दिल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. त्याच्या निषेधार्थ सुमारे ६०० कामगारांनी कंपनीसमोर घोषणाबाजी करत केंद्र सरकारविरोधात रोष व्यक्त केला. निर्णय घेण्यापूर्वी प्रशासनाने कामगारांशी चर्चा करावी, सर्वांच्या नोकऱ्यांची हमी द्यावी आणि स्थानिक रोजगारावर गदा येणार नाही, याची स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी ट्रान्सपोर्ट अँण्ड डॉक वर्कर्स युनियनच्यावतीने करण्यात आली आहे.

# कर्जत विविध विषय समित्या निवडणुक

**| कर्जत | प्रतिनिधी |**


(छायाचित्र : संजय गायकवाड)

कर्जत नगरपरिषदेमध्ये नुकतीच विविध विषय समित्यांची निवडणूक पार पडली. यावेळी नगरपरिषदेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस व ठाकरे गट यांच्या परिवर्तन विकास आघाडीची निर्विवाद सत्ता आली आहे. त्यामुळे कर्जत विविध विषय समितीचे सर्व सभापती परिवर्तन परिवर्तन विकास आघाडीचेच बिनविरोध निवडून आले आहेत.

कर्जत नगरपरिषदेच्या सभागृहामध्ये पीठासीन अधिकारी मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष सभेत कार्यालयीन अधिक्षक रवींद्र लाड उपस्थित होते. यावेळी स्थायी समितीमध्ये सात सदस्य असावेत, असे विरोधी पक्षाचे गटनेते संकेत भासे

### ■ परिवर्तन विकास आघाडीची बाजी

यांनी विनंती केली. त्यावर या विषयावर मतदान घ्यावे, अशी मागणी नगरसेवक प्रशांत पाटील यांनी केली. त्यावर पाच सदस्य असावेत यासाठी मतदान घेण्यात आले. त्यावेळी १३ सदस्यांनी हात वर करून सहमती दिली. त्यानंतर सात सदस्य असावेत, यासाठी मतदान घेण्यात आले. त्यावेळी ८ सदस्यांनी हात वर करून सहमती दर्शविली. त्यामुळे विरोधी पक्षाच्या सर्व नऊ सदस्यांनी सभात्याग केला. त्यानंतर पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती सभापतीपदी सुचिता खोत, वीज सार्वजनिक बांधकाम शहर नियोजन व विकास समिती सभापतीपदी महेंद्र चंदन, महिला व बालकल्याण समिती सभापतिपदी हर्षाली गायकवाड, उपसभापतीपदी अंजली कडू यांची बिनविरोध निवड झाली. तर, स्वच्छता वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समिती सभापतीपदी पदसिद्ध म्हणून उपनगराध्यक्ष संतोष सुरेश पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले.

# सरकारी कर्मचारी रस्त्यावर

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी चौथ्या वेतन आयोगापासून वेतनश्रेणीत असलेली तफावत दूर करून सुधारित वेतन श्रेणी लागू करावी. तसेच, जशास तशी जुनी पेन्शन लागू करावी, या मागण्यांसह लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या इतर प्रलंबित मागण्यांसाठी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय व अधिकारी व कर्मचारी संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. संघटनेच्यावतीने बुधवारी (दि.१८) पनवेल पंचायत समिती कार्यालय परिसरात निदर्शने करण्यात आली. यावेळी अधिकारी व कर्मचारी संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे.

लिपिक संवर्गाच्या कर्मचाऱ्यांना अनेक समस्या भेडसावत आहेत. आपल्या मागण्यांसाठी वेळोवेळी आंदोलन करूनही आश्वासनाच्या पलीकडे काहीही लागले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष धुमसत आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्याच्या पूर्ततेसाठी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय व संघटनेच्या वतीने परिसरात निदर्शने करण्यात आली. २३ फेब्रुवारीपासून कर्मचारी बेमुदत संपावर जाणार आहेत.

# नमिता घारे परिवर्तन आघाडीच्या गटनेत्या

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांच्या कर्जत परिवर्तन आघाडीला स्पष्ट बहुमत दिले आहे. या आघाडीमध्ये दोन पक्ष असून या पक्षातून निवडून आलेल्या १० सदस्यांनी गट नोंदणी प्रक्रिया रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे केली. दरम्यान, गटनेत्या म्हणून बीड बुद्रुक गणांमधून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या उमेदवार म्हणून निवडून आलेल्या नमिता घारे यांची निवड करण्यात आली आहे.



कर्जत पंचायत समितीच्या १२ जागांसाठी झालेल्या निवडणूकीत कर्जत परिवर्तन आघाडीचे १० आणि महायुतीचे २ सदस्य निवडून आले. महायुतीमध्ये शिवसेना शिंदे गटाचा आणि शेतकरी कामगार पक्षाचा प्रत्येकी १ सदस्य निवडून आला आहे. कर्जत परिवर्तन विकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट हे दोन पक्ष आहेत. या दोन पक्षाचे १० सदस्य निवडले गेले असून त्यात राष्ट्रवादीचे ६ आणि शिवसेना ठाकरे पक्षाचे ४ सदस्य निवडले गेले आहेत. कर्जत पंचायत समिती सभापतीपदाची निवडणूक लवकरच होणार असून परिवर्तन विकास आघाडी मध्ये निवडून आलेल्या सर्व १० सदस्यांची गट नोंदणी रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली. जिल्हाधिकारी यांच्याकडे परिवर्तन विकास आघाडी अशी गट नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली असून गटनेता म्हणून नमिता सुधाकर घारे यांची निवड करण्यात आली आहे.

**होळी सणादरम्यान तब्बल १९८ जादा फेऱ्या | गाव–शहरांचे नाते अधिक घट्ट होणार**

# प्रवाशांसाठी लालपरी ठरणार आधारवाटिका

**| रेवदंडा | विशेष प्रतिनिधी |**

एसटी महामंडळाने होळीच्या सणानिमित्त विशेष सेवेची घोषणा केली आहे. होळी सणादरम्यान तब्बल १९८ जादा फेऱ्या सोडण्याची घोषणा महामंडळाने केली आहे. त्यामुळे शहरातून गावाकडे येणाऱ्या प्रवासी वर्गासाठी लालपरी खरी आधारवाटिका ठरणार आहे.

राज्यासह जिल्ह्यात प्रत्येक महत्त्वाच्या सणाला शहरात कामानिमित्त गेलेले चाकरमानी आपापल्या गावी येत असतात. होळीच्या दिवशी होलिका दहन करून आपल्या कुटुंबियांसोबत वेगवेगळ्या रंगात रंगले जातात. दुसऱ्या दिवशी चाकरमानी आपल्या परतीच्या प्रवासाला लागतात. मात्र,



परतीच्या प्रवासात त्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. सर्वच चाकरमानी एकाच दिवशी शहराकडे निघाल्यामुळे खासगी वाहनांसह एसटी स्थानकांत देखील मोठ्या प्रमाणात गर्दी होते. याचा फायदा घेत काही खासगी वाहनांचे दर वाढवले जातात. काहीवेळा नाहीलाजास्तव चाकरमान्यांना अतिरिक्त भाडे देऊन निश्चित स्थळी जावे लागते. एसटी बसचा प्रवास परवडण्यासारखा असला तरी त्या ठिकाणी होणाऱ्या प्रचंड गर्दीमुळे वेळेचा प्रचंड अपव्यय होतो. याच अडचणींवर मात करण्यासाठी लालपरी आता सज्ज झाली आहे.

नुकतीच एसटी महामंडळाने होळीच्या सणानिमित्त जादा एसटी बसेस सोडण्याची योजना आखली आहे. 'होळी जादा ऑपरेशन' अंतर्गत प्रवाशांचा प्रवास सुरक्षित, वेगवान आणि स्वस्त होईल, अशी खात्री महामंडळाने दिली आहे. यावेळी महामंडळाने रायगड सह मुंबई, ठाणे आणि पालघर विभागांतून तब्बल १९८ जादा फेऱ्या सोडण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे शहरातून गावाकडे येणाऱ्या प्रवासी वर्गासाठी लालपरी खरी आधारवटिका ठरणार आहे.

### सुरक्षित प्रवासाला प्राधान्य

प्रत्येक एसटी बससाठी आरोग्य तपासणी, स्वच्छता आणि चालकाची विशेष तयारी करण्यात आली आहे. त्यामुळे एसटीचा प्रवास पहिल्यापेक्षा जास्त सुरक्षित होणार असल्याचे महामंडळाकडून सांगण्यात येत आहे. तसेच, खासगी वाहतुकदारांच्या मनमानी भाड्याला आळा बसणार असून लालपरी सामान्य दरात आरामदायी प्रवास देणार आहे. होळीपूर्वी आणि सणादरम्यान गर्दीचा अचूक अंदाज घेऊन फेऱ्या नियोजित केल्या जाणार आहेत. प्रवाशांनी ऑनलाइन बुकिंग किंवा स्थानकावरून तिकीट घ्यावे आणि वेळेवर स्थानकात पोहोचावे, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.

> होळी हा सण नातेवाईकांच्या भेटीचा आहे. लालपरी प्रवाशांना त्यांच्या गावापर्यंत सुरक्षित ने–आण करेल. पूर्वीप्रमाणे आजही आम्ही लाखो कुटुंबांना एकत्र जोडतोय. या निर्णयामुळे होणारी संभाव्य गर्दी आणि गैरसोय टळेलच, त्याचबरोबर स्थानिक अर्थव्यवस्थेला देखील चालना मिळेल आणि पर्यावरणस्नेही वाहतुकीला प्रोत्साहन मिळेल.
> – डॉ. माधव कुसेकर (आयएएस), व्यवस्थापकीय संचालक, एसटी महामंडळ

तसेच, होळीच्या या रंगीत प्रवासात लालपरीचा रंग चढणार असून गाव–शहरांचे नाते अधिक घट्ट होणार आहे.

# श्रीवर्धनकरांना नगर परिषदेचा दिलासा

## ●कागदपत्रांसाठी हेलपाटे वाचणार ●भ्रमणध्वनीवरून नागरिकांना करणार संपर्क

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

नगरपरिषद कार्यालयातून विविध दाखले मिळविण्यासाठी अथवा ना हरकत प्रमाणपत्र घेण्यासाठी नागरिकांना हेलपाटे मारावे लागतात. अनेक वेळा संबंधित कामासंदर्भातील कागदपत्रांची पूर्तता नसणे , कराची थकबाकी किंवा विभाग प्रमुख (एचओडी) जागेवर नसल्याने काम रखडते व नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. साहेब आज नाहीत, काम होणार नाही, कर भरला नाही, नंतर या, वाक्याला आता पूर्णविराम मिळणार आहे. नगरपरिषद आता नवीन योजना अंमलात आणणार असून दाखला मिळण्यासाठी विलंब होणार असल्यास, त्याच प्रमाणे दाखला तयार झाल्यावर तसे संबंधित व्यक्तीला भ्रमणध्वनी वरून कळवण्यात येणार आहे.

श्रीवर्धन येथील सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत भगत यांच्या संकल्पनेतून भ्रमणध्वनी वरून संपर्क ही योजना अंमलात येणार आहे. नगरपरिषदेत गरजु व्यक्तीनी दाखला अथवा ना हरकत प्रमाणपत्र करीता अर्ज दाखल केल्यानंतर अधिकृत दप्तरी जमा करून नोंद केली जाते. काही वेळा नगरपरिषद प्रशासनाकडून कार्यवाही केली जात नाही. काही दिवसांनी संबंधित व्यक्ती दाखला संदर्भात विचारणा करण्यास गेली असता तुमचा मालमत्ता कर, पाणीपट्टी कर पूर्ण करा मग दाखला मिळेल किंवा कागदपत्रे अपूर्ण आहेत.असे सांगितले जाते.

यावेळी चंद्रकांत भगत यांनी सांगितले की, श्रीवर्धन येथील सत्तर टक्के जनता मोलमजूरी करणारी आहे. दाखल्यासाठी वारंवार हेलपाटे मारणे हे त्यांचे नुकसान आहे. अनेक वेळा साहेब नाहीत, नंतर या. तुमचे कर भरणे बाकी आहे. अशी उत्तर दिली जातात. मजुरीवर जाणारी व्यक्ती दिवसाची मजुरी व दिवस फुकट घालवून नगरपरिषदेत येतात पण त्यांचा दिवस वाया जातो. असे होऊ नये म्हणून अर्ज इनवर्ड करताना संबंधित व्यक्तीनी भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा व त्यांच्या काही त्रुटी असल्यास किंवा कर थकबाकी असल्यास तसे कळवण्यात यावे. महत्वाचे म्हणजे दाखल्याचे काम झाले असल्यास तसे कळवावे म्हणजे संबंधित व्यक्तीला इनवर्ड येथे येऊन दाखला हस्तगत करता येईल.



> जन्म मृत्यू दाखले, विविध कर भरणा किंवा कामांसाठी ना हरकत प्रमाणपत्र तयार झाले की संबंधित व्यक्तींना भ्रमणध्वनीद्वारे कळविण्यात येईल.काही त्रुटी राहिल्या असतील तर तसेही कळवले जाईल. त्याचप्रमाणे कुठल्या दाखल्यांसाठी कुठली कागदपत्रे आवश्यक आहेत याची माहिती फलकावर लावली जाईल. संबंधीत विभाग, अभियंता तसेच स्थायी समिती सभापती, सदस्य यांची नावे व भ्रमणध्वनी क्रमांक फलकावर टाकण्यात येतील. जेणेकरून जनतेची गैरसोय होणार नाही. भ्रमणध्वनी वरून संपर्क लवकर अंमलात आणणार आहोत.
>
> **अ‍ॅड.अतुल अरविंद चौगुले.**
> **नगराध्यक्ष.श्रीवर्धन नगरपरिषद.**

## बी.एस.पाटील इंग्लिश मेडियमचे वार्षिक स्नेहसंमेलन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

विंधणे येथील बी.एस. पाटील इंग्लिश मेडियम स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले.

व्यासपीठावर संस्थापक अध्यक्ष कैलास पाटील, गितेश जोशी, सचिन जोशी, प्रदीप शेलके, सुनील ठाकूर, सुचिता जोशी, जयवंत पाटील, बळीराम नवाले, जयेश नवाले, जगन्नाथ चिल्लनपल्ले, राकेश घरत, राज घरत, सूर्यकांत कासकर, ऋषिकेश माळी, वसुधा जोशी सन्मिका कोळी, तुषार थळी, संजय केणी, सुरेश पाटील, स्नेहल जोशी, जयवंत पाटील, बाळीराम नवाळे, जयेश नवाळे, जयेश पाटील, जगन्नाथ चितमपल्ले, राकेश घरत, राज घरत, सूर्यकांत कासकर, ऋषिकेश माळी, समीर जोशी आदी उपस्थित होते.

## स्वामी समर्थ ग्रंथालयात काव्यवाचन कार्यक्रम

**अलिबाग :** स्वामी समर्थ सार्वजनिक ग्रंथालय चेंढरे आणि शब्द सखी वाचन परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेला जल्लोष कविताचा हा स्वरचित काव्यवाचनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. प्रारंभीच्या दीप प्रज्वलन व सरस्वती देवीच्या पूजनानंतर या कार्यक्रमात जवळपास १६ कवींनी स्वरचित कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या एफ रेडीओवरील शीघ्र कवि डॉ.स्मिता सहस्रबुद्धे यांनी त्यांच्या स्वतः च्या काव्यसंग्रहातील कविताचे वाचन केले तर परेश पवार यांनी उत्तम प्रकारे ऋतू विषयावरील कविताची सादरीकरण केले. श्रुती राजे यांनी ऋतू व उत्सव नात्याचा या विषयात वर परस्पर संबंधित गुंफुण रचलेल्या कवितेचे प्रभावी गायन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार यांनी ग्रंथालय विषयी माहिती व अन्य कार्यक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ग्रंथालयाचे अध्यक्ष दिपक कुलकर्णी यांनी केले, तर सूत्रसंचालन ज्योती आमले यांनी केले. मानसी लोंढे यांनी आभार मानले सहभागी कविनां सहभागाबद्दल प्रमाण पत्रांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणावर रसिकांनी उपस्थिती लावली होती. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शब्दसखीच्या व ग्रंथालयाच्या सर्व सदस्यांनी मेहनत घेतली.

## श्रीवर्धनमध्ये महाआरोग्य शिबीर

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन शहरात सामाजिक बांधिलकी जपत शिवसेना व जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत महाआरोग्य शिबीर व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात गरजू नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात येणार असून विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व मार्गदर्शन दिले जाणार आहे. २१ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत उपजिल्हा रुग्णालय, श्रीवर्धन येथे हे शिबीर पार पडणार आहे. श्रीवर्धन व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. विविध तज्ज्ञ विभागांचा सहभाग या महाआरोग्य शिबिरात जनरल सर्जरी, बालरोग, कॅन्सर, किडनी, एमडी मेडिसिन, स्त्रीरोग, ऑर्थोपेडिक तसेच हृदयरोग विभागातील तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहणार आहेत. मधुमेह, उच्च रक्तदाब, दमा, किडनी स्टोन, स्तनाचा कॅन्सर, प्रोस्टेट, गर्भाशयाशी संबंधित आजार, फ्रॅक्चर, स्पाईन समस्या, अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी संदर्भातील मार्गदर्शन अशा विविध आजारांवर तपासणी व सल्ला देण्यात येणार आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे तळाणीखार, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या बिनशेती जमिन मिळकती, सदर मिळकतींचे संबंधित मालक व कब्जेदार, १. श्री. सुंदरलाल एकलिंगलाल जैन, २. श्री. दिपक चंदुलाल रावल, ३. श्रीमती. गिताबेन रमेशकुमार रावल, ४. श्रीमती. शैलाबेन रमेशभाई रावल, ५. श्रीमती. सोनल चेतन रावल, ६. श्रीमती. रुपल जिगनेश रावल व ७. श्रीमती. डिंपल अमिश रावल, यांच्याकडून आमचे अशिलांनी कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| | मौजे | स.नं./हि.नं. | बिनशेती प्लॉट नं. | क्षेत्र (आर.चौरस मीटर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | १ | २७.४१.०० | २७४.१० |
| २. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | २ | २०.०८.०० | २००.८० |
| ३. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ३ | २.४८.५० | २४.८५ |
| ४. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ४ | २.६९.५० | २६.९५ |
| ५. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ५ | २.५३.०० | २५.३० |
| ६. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ६ | २.८५.०० | २८.५० |
| ७. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ७ | ३.०६.०० | ३०.६० |
| ८. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ८ | ३.०६.०० | ३०.६० |
| ९. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ९ | २.३१.०० | २३.१० |
| १०. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | १० | २.५६.५० | २५.६५ |
| ११. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ११ | २.४३.५० | २४.३५ |
| १२. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | १२ | २.३०.०० | २३.०० |
| १३. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | १३ | २.३५.७५ | २३.५८ |
| १४. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | १४ | २.३५.०० | २३.५० |
| १५. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | १५ | २.३०.०० | २३.०० |
| १६. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | १६ | २.३५.०० | २३.५० |
| १७. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | १७ | २.३५.०० | २३.५० |
| १८. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | १८ | २.३०.०० | २३.०० |
| १९. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | १९ | २.३०.०० | २३.०० |
| २०. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | २० | २.३०.०० | २३.०० |
| २१. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | २१ | २.३०.०० | २३.०० |
| २२. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | २२ | २.३०.०० | २३.०० |
| २३. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | २३ | २.३०.०० | २३.०० |
| २४. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | २४ | ३.३०.०० | ३३.०० |
| २५. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | २५ | ३.१०.०० | ३१.०० |
| २६. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | २६ | २.९९.०० | २९.९० |
| २७. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | २७ | ३.०६.०० | २३.६० |
| २८. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | २८ | ३.२२.५० | ३२.२५ |
| २९. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | २९ | ३.०४.५० | ३०.४५ |
| ३०. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ३० | २.८३.५० | २८.३५ |
| ३१. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ३१ | २.६३.०० | २६.३० |
| ३२. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ३२ | २.६१.०० | २६.१० |
| ३३. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ३३ | ३.०९.०० | ३०.९० |
| ३४. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ३४ | ३.२६.०० | ३२.६० |
| ३५. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ३५ | ३.२४.५० | ३२.४५ |
| ३६. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ३६ | ३.२४.५० | ३२.४५ |
| ३७. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ३७ | ४.६१.०० | ४६.१० |
| ३८. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ३८ | २.३६.५० | २३.६५ |
| ३९. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ३९ | २.०९.०० | २०.९० |
| ४०. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | ४० | १.९३.५० | १९.३५ |
| ४१. | तळाणीखार | ९/१/२/३/१०/२/४ब | खुले क्षेत्र | ९१.१३.०० | ९११.३० |
| | | | खुल्या क्षेत्रापैकी | ८२.१३.०० | ८२१.३० |

सबब सदरच्या मिळकतींवर अगर त्यांच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त , पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा याप्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (०७) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर, सदरच्या मिळकती निर्वेध आणि बोजारहीत व कराराने खरेदी घेणेस योग्य आहेत, असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत, असे समजणेत येईल, हे सर्व लोकांस कळावे.

ता. २०/२/२०२६ सही/-

**अ‍ॅड. माधवी नारायण ठाकूर**
सी ३०१, क्लिफ हेवन को. ऑप.हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०२ २०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझ्या अशिलांनी मौजे-वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड येथील श्री. गौरीष भरत घरत, वगैरे ४, रा.वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या खुद्द मालकीची खालील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे-वरसोली, ता.अलिबाग येथील भूमापन क्रमांक १७/३/अ/४, एकूण क्षेत्र २.२०.०० आर.चौ.मी. आकार रु.२२.०० पैसे.

तरी वर वर्णन केलेली बिनशेती मिळकत विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ०७ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- २०/०२/२०२६

सही /-
**अ‍ॅड. समाधान रविंद्र पाटील**
मु.पो.वेश्वी, हनुमान मंदिर जवळ,
ता.अलिबाग, रा.रायगड
मोबा.नं. ८९८३०११९६९

### जाहीर नोटीस

दिनांक १९/०२/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचित करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे मांडवणे ता. कर्जत, जि. रायगड येथील.

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा | बिनशेती प्लॉट.क्रं. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| किरण दर्शन तोलानी | १६३/२ | २ | ४-६४-५७ चौमी | ४६.४५ |
| बिना सुशिल चडडा | १६३/२ | २ | ४-६४-६८ चौमी | ४६.४६ |

बिनशेती जमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेले आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे. तरी उपरोक्त बिनशेती जमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशीर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमिन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**अ‍ॅड. पूजा प्रताप सुर्वे**
रा.पळसदरी, ता.कर्जत, जि.रायगड
भ्रमनध्वनी क्र. ९२७१८७६०५०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक कै.सावळाराम गोविंद देशमुख व कै. अनुसया सावळाराम देशमुख मयत यांचे वारस विजय सावळाराम देशमुख व इतर ४ व कै. मनोहर सावळाराम देशमुख मयत यांचे वारस सुरेखा मनोहर देशमुख इतर २ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे -

**मौजे गौरकामत तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ९६/० | एकुण क्षेत्र ३२-९८-०० हे आर पॉ या एकुण क्षेत्रापैकी वरील मालक यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र | १२-३१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २०/०२/२०२६

**खरेदीदारातर्फे वकील अ‍ॅड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९, तळमजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर अमराई रोड,
कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील अ‍ॅड.निलेश कान्हु मोरे**
मोबा.९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळमजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर अमराई रोड,
कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

**Adv. Anupama Dhabe, Deshpande.**
Adv. For Applicant
Exh. 7/D

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF THE CIVIL JUDGE
(S.D.) PANVEL AT PANVEL DISTT.RAIGAD
CIVIL MISC APPLICATION NO. 06 of 2026

Mrs. SUNITA NARAYAN,
W/O CHAKRAPANI CHINTAMANI NARYAN
-APPLICANT

NIL -OPPONENTS

That Late Mr. Chakrapani Chintamani Naryan was husband of the applicant. That Mr. Chakrapani Chintamani Naryan Expired On 07/11/2009, at New Delhi. The properties description is in the name of deceased are attached herewith.

**SHCEDULE OF THE PROPERTIES**

| Sr.No. | Details Of The Properties |
|---|---|
| 1. | A 100% undivided share in Flat No. B-602,Plot No.-184,Sector-13,HawareTiara, Kharghar-410210. |

Whereas the above named applicant has filed Misc. Application for Heirship of Property under, Bombay Regulation Code, 1827, the court of Civil Judge (S.D.)Panvel. You the members of public are hereby given notice to appear in the court Civil Judge (S.D) Panvel, in person or by pleader duly instructed and to file say/objection if any within 30 days from the date of publication of this public notice Failing which the said application will be held, presuming that there is no objection of anybody and the application will be finally decided. Given today under my hand and seal of the court.

The next date is fixed on 17/03/2026.

Date:16/02/2026 Seal Order

Sd/-

Sd/- Sd/-
**PANVEL** **Asst. Suprintendent**
**(Jr.Clerk)** **Civil Judge, SD Panvel,**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे जांभिवली, ता. कर्जत, जि. रायगड. येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत तिचे मालक श्री. श्रीकांत वसंत देशमुख रा.गौरकामथ, ता.कर्जत, जि. रायगड यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| ३८ | २ ब | एकूण क्षेत्र ०-७२-६० पैकी विकत दिलेले क्षेत्र ०-१७-०० (हे.आर.पॉ) | ३-०१ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/०२/२०२६

**अ‍ॅड. विलास रमेश लाड**
ऑफीस-वसंत पॅराडाईज फ्लॅट
नं.१०१/१. पहिला पहिला, कोतवाल नगर,
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.९३२५६७७९७९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, सिताराम बाबूराव जाधव रा.तळदेव, शेडाशी, पो.रानसई, ता.पेण, जि.रायगड येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिनी शेडाशी कातकरीवाडी ता.पेण, जि.रायगड येथे असून मी. स्वतः आशुतोष किसनलाल बियानी विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| शेडाशी कातकरीवाडी | सिताराम बाबूराव जाधव | १८/४३ | ०.०६.०० | ०.०४ |
| | | १८/३४ | ०.०४.०० | ०.०३ |

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वतः कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वतः जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक : २०/०२/२०२६

**आशुतोष किसनलाल बियानी**
६०६ जीवन, विहार ५ मानव,
मंदिर रोड, मलाबार हिल, मुंबई
मलाबार हिल, महाराष्ट्र ४०००06
फोन नंबर ९००४६०००४६

### जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मजगांव, ता. मुरूड, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक शारीक कासिम हलडे यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| मजगांव ता.मुरूड जि.रायगड | १६५ | ०.५५.०० पो.ख. ०.१७.०० एकूण ०.७२.०० | ०.५९ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे अ‍ॅडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १९/०२/२०२६

**अ‍ॅड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो.झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकतीचे मालक श्री. सुनिल किसन जाधव यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं | प्लॉट नं | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| १४२ | १५ | १-९५-०० | १९-५० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २०/०२/२०२६

**अ‍ॅड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# रायगडात, 'जय भवानी, जय शिवाजी'चा जयघोष

**हातात भगवा जरीपटका, मुखात जय भवानी, जय शिवाजीचा जयघोष, ऐतिहासिक देखाव्यांनी सजलेल्या मिरवणुका, हजारोंच्या संख्येने सहभागी झालेले शिवप्रेमी अशा उत्साही वातावरणात गुरुवारी (दि.१९) छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव सोहळा रायगडात सर्वत्र उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. या उत्सवामुळे अवघा रायगड शिवमय झाल्याचे दिसून आले. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सरकारी स्तरावर शिवजयंतीचा सोहळा साजरा करुन युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांना मानाचा मुजरा करण्यात आला.**

## शस्त्र प्रदर्शनातून इतिहासाची माहिती

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव तालुका सकल मराठा समाजातर्फे गुरुवारी (दि.१९) फेब्रुवारी रोजी क्षत्रिय मराठा भवन माणगाव याठिकाणी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त ऐतिहासिक शस्त्र प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना इतिहासाची माहिती देण्यात आली. शिवजीयंतीच्या पावन पर्वानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम व अद्वितीय युद्ध कौशल्याची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहचविण्याचा उद्देशाने सकल मराठा समाज माणगाव तालुका यांच्यावतीने ऐतिहासिक शस्त्र प्रदर्शन क्षत्रिय



मराठा भवन माणगाव याठिकाणी भरविण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये शिवकालीन तलवार, ढाल, भाला, कट्यार, नाणी तसेच विविध ऐतिहासिक शस्त्रांची माहिती तज्ञ् मार्गदर्शकांमार्फत विद्यार्थी, शिक्षक व शिवप्रेमी नागरिकांना देण्यात आली.

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, स्वाभिमान व इतिहासाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या स्तुत्य उपक्रमाचा आयोजकांचा हेतू होता. सकल मराठा समाज बांधवानी शिवजयंतीच्या आदल्या दिवशी किल्ले रायगड येथे जाऊन तेथून शिवज्योत घेऊन शिवज्योत क्षत्रिय मराठा भवन माणगाव येथे आणली. शिवजयंतीच्या दिवशी सकाळी आयोजकांनी माणगावात शोभा यात्रा काढली. या शोभा यात्रेत सकल मराठा समाज बांधव-भगिनी यांच्याबरोबरच कामेरकर स्कुलचे विद्यार्थी, शिक्षक तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शिवजयंतीनिमित्त भरविण्यात आलेल्या ऐतिहासिक शस्त्र प्रदर्शनाची पाहणी माणगाव शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक तसेच शिवप्रेमी नागरिकांनी करून सकल मराठा समाजाने एका आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे चांगल्या प्रकारे आयोजन केल्याने त्यांचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमास माणगाव तालुक्याचे प्रांताधिकाईर डॉ. संदीपान सानप, कुंडलिक पुरंदरे, गणेश चव्हाण, बीजाक्षी रॉय, शुभम पोल आदी मान्यवर उपस्थित होते.



● नांदगाव येथे सुरेश खैरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर शिवजयंतीनिमित्त अभिवादन केले.

## युईएसतर्फे लेझिम नृत्य सादर



**| उरण | प्रतिनिधी |**

यु.ई.एस. स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स ॲण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजी मध्ये गुरुवारी (दि.१९)रोजी शिवजयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विमला तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याजवळ विदयार्थी पारंपारिक वेषभूषेत जमले होते. सिनियर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, समन्वयक, पीटीए सदस्य, पालकगण, शिक्षक व स्कूल, ज्युनिअर व सिनियर कॉलेजचे सर्व विदयार्थी उपस्थित होते. यानंतर ढोलताशे व लेझिमच्या लयबद्ध वादयवृंदासह महाराजांच्या पालखीची मिरवणूक निघाली. सर्व विदयार्थ्यांनी पारंपारिक वेष परिधान केला होता. त्यातील काही विदयार्थी जिजाऊ व बाल शिवाजींच्या वेशभूषेत आले होते. ह्या सर्व विद्यार्थ्यांनी पालखीतील शिवरायांच्या मूर्तीची वाजत गाजत भव्य मिरवणूक पालक मैदानाच्या दिशेने काढली. सर्व कार्यक्रमाची तयारी, उपस्थितांचे स्वागत, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार प्रदर्शन युईएस. परिवारातील शिक्षकांनी सुत्रबध्द पध्दतीने केले.



● पनवेल महानगरपालिकेतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त भव्य-दिव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. (छायाचित्र : राजेश डांगळे)

## शिवजयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

कोकण उन्नती मित्रमंडळाचे वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, मुरुड जंजिरा येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून मुरुड नगरपरिषदेच्या वतीने भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा दिला. या स्पर्धेत यजमान वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत बाजी मारली आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.सुभाष म्हात्रे



यांनी केले. सदर स्पर्धा दोन वयोगटांत पार पडली. यामध्ये गट १ (इयत्ता ८ वी ते १० वी) आणि गट २ (इयत्ता ११ वी ते पदवी स्तर) अशा दोन विभागांत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेत वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मोठे यश मिळवले. यामध्ये सुयश गायकर याने प्रथम क्रमांक, अंतरा मसाल तृतीय क्रमांक प्राप्त केला. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांचे मान्यवरांनी स्वागत केले. स्पर्धेचे परीक्षण तनुजा गोबरे, प्रीती संधने, अशोक कामणे , डॉ. सीमा नाहीद यांनी केले.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे, पांडुरंग आरेकर, सतेज निमकर, डॉ. श्रीशैल भैरगुंडे, डॉ. सुभाष म्हात्रे, प्रा. प्रणव बागवे, विद्यार्थी आदिंसह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रवेश पाटील यांनी केले.तर आभारप्रदर्शन डॉ. श्रीशैल भैरगुंडे यांनी केले.

## धुतूममध्ये महाराजांच्या प्रतिमेचे पूजन



**| उरण | प्रतिनिधी |**

धुतूम ग्रामपंचायतीच्या कार्यालयाची इमारत जिर्ण झाल्याने ग्रामपंचायतीच्या सुचिता ठाकूर यांनी सदर इमारतीचे नव्याने नूतनीकरण करण्यात आले.

शिवजयंतीच्या मुहूर्तावर नूतनीकरण करण्यात आलेल्या धुतूम ग्रामपंचायतीच्या कार्यालयात गुरुवारी ( दि१९ ) श्री गणेश पुजन व छत्रपतींच्या प्रतिमेचे पूजन सुचिता ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच धुतूम ग्रामपंचायतीचे प्रथम सरपंच स्व.रामदासशेठ नारायण ठाकूर यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले.

याप्रसंगी महेंद्र घरत, डॉ. मनिष पाटील, प्रियांका मढवी, निर्मला घरत, उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सजैराव पाटील, विस्तार अधिकारी विनोद मिंडे, नरेश घरत, स्मिता ठाकूर, रविनाथ ठाकूर, प्रकाश ठाकूर, प्रेमनाथ ठाकूर, चंद्रकांत ठाकूर, कविता पाटील, सुचिता कडू, अनिता ठाकूर, करिष्मा ठाकूर, नागनाथ घाडगे, संदिप काळे, शंकर ठाकूर, अर्चना ठाकूर, नारायण ठाकूर, दिपक मढवी, साहिल, सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



● शिवजयंतीनिमित्त अलिबाग नगरपरिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिव जन्मोत्सव कथा नृत्यातून सादर केली. (छायाचित्र : समीर मालोदे)

## राजिपमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

**| रायगड | प्रतिनिधी |**

अलिबागमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती दरवर्षीप्रमाणे यावर्षीही गुरुवारी (दि.१९) अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. रायगड जिल्हा परिषदेच्या कुंटेबाग येथील कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अर्धपुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रभारी) प्रियदर्शनी मोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जालिंदर पठारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) विशाल तनपुरे, मुख्य वित्त व लेखा अधिकारी राहुल कदम, शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे, बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता विनायक तेलंग, यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## शिवप्रेरणा प्रतिष्ठानतर्फे रक्तदान शिबीर

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

शिवजयंतीनिमित्त अलिबाग तालुक्यातील वेश्वीतील शिवप्रेरणा प्रतिष्ठान आणि मराठा समाजाच्या वतीने रक्तदान शिबीर, नेत्र तपासणी शिबीर तसेच महिलांसाठी खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिरासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय रक्तपेढी, नेत्र तपासणी शिबिरासाठी लायन्स हेल्थ फाऊंडेशनचे सहकार्य लाभले. शिवप्रेरणा प्रतिष्ठानचे अध्यक्ष समरेश शेळके, गणेश जाधव, अंकित शेळके, गणेश शेळके, सुरेंद्र शेळके यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमांना



सुरुवात करण्यात आली. यावेळी ५६ रक्तदात्यांनी रक्तदान केले तर ३५ ज्येष्ठ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. यावेळी वेश्वी ग्रा.पं.चे माजी सरपंच प्रफुल्ल पाटील, मंगेश जाधव, वैभव गोळे, किरण काकडे, लेकराज शेळके, सिद्धेश जाधव, विक्रांत जाधव, विशाल जाधव, नागेश शेळके, उमेश जाधव, प्रशांत गोळे, रोहित मिंडे, अंकित मिंडे, निकेश शेळके, ऋषिकेश गोळे, संकेत शेळके, कुणाल धनवी, ओंकार नलावडे, कल्पेश जाधव, दीपक शेळके, प्रकाश गोळे, अनिकेत शेळके, सुहास काकडे, अनिल गोळे, किरण कदम, सौरभ नलावडे, समाधान नलावडे, केदार नलावडे, अमित मुलुस्कर, अक्षय आंबोळे, शिरीष गोळे, स्वप्नील शेळके, दत्ता कदम, प्रणव जाधव, ओम शेळके, जेष्ठ नागरिक, महिला व वेश्वीतील मराठा समाज, ग्रामस्थ उपस्थित होते.

## फणसवाडीत सांस्कृतीक कार्यक्रम सादर

**| पनवेल | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, पनवेल व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, फणसवाडी, ता. पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने, प्राथमिक, फणसवाडी शाळेत छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी केली. याप्रसंगी अरविंद मोरे, प्रा. डॉ. नीलिमा मोरे, दयानंद कदम सविता सरगर उपस्थित होते.

याप्रसंगी लावण्या पारधी, संतोष भगत, मनीष पारधी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर उत्कृष्ट भाषण दिले. तर स्मित भगत, अस्मित भगत, बाळकृष्ण भगत, लावण्या पारधी, मनीष पारधी यांनी शिवगीत साजरे केले. तर बाळकृष्ण भगत, अस्मित भगत, स्मित भगत, मनीष पारधी, रितिक पारधी, भावेश पारधी, देवदास भगत यांनी नाटीका सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दयानंद कदम यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सविता सरगर यांनी केले.



## मुरुड जंजिरा नगरपरिषदेतर्फे शिवरायांना मानवंदना

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, आदर्श कल्याणकारी राजा, जाणता राजा श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीचे औचित्य साधून मुरुड-जंजिरा नगरपरिषदेच्या वतीने नगरपरिषद कार्यालय, लक्ष्मीखार व दत्तवाडी येथील शिवाजी महाराज्यांच्या पुतळ्याला नगराध्यक्षा आराधना दांडेकर व उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

त्यानंतर राजे छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव, जय जिजाऊ, धर्मवीर संभाजी महाराज की जय अशा घोषणा देण्यात आल्या.



महाराजांनी स्वराज्य निर्माण कार्यात समाजातील सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेवून कार्य केले. जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन विरेंद्र भगत यांनी केले.

याप्रसंगी नगराध्यक्ष आराधना दांडेकर, उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, मुख्याधिकारी सचिन बच्छाव, प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आबंतेकर, सतेज निमकर, पांडुरंग आरेकर, मनोज भगत, आदेश दांडेकर, रुपेश पाटील, मनिष विरूकुड, रुपेश रणदिवे, प्रिता चौलकर, नगमाना खानजादे, यास्मिन कादिरी, देवयानी गुरव, प्रमिला माळी, श्रध्दा अपराध, प्रमोद भायदे, अनिकेत वाजे, अनिकेत जगदाळे, सोनल पाटील, गजानन भुसाणे, प्रशांत दिवेकर, संजय बामगुडे, अरविंद गायकर, प्रशांत कासेकर, सुदेश माळी, जयकृष्ण भिसे आदी शिवप्रेमी उपस्थित होते.

## सातगाव विद्यालयात देशभक्तीपर घोषणा

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या सातगाव माध्यमिक विद्यालयात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यालय परिसर देशभक्तीपर घोषणांनी दुमदुमून गेला होता. कार्यक्रमाची सुरुवात शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून झाली. मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या कार्याची, पराक्रमाची तसेच स्वराज्य स्थापनेतील त्यांच्या योगदानाची माहिती उपस्थितांसमोर मांडली. विद्यार्थ्यांनी प्रभावी भाषणे सादर करून वातावरण शिवमय केले. त्यांच्या सादरीकरणातून शिवाजी महाराजांचे शौर्य, धैर्य आणि न्यायप्रियता अधोरेखित झाली. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वाचे कौतुक केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. शिवजयंतीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, स्वाभिमान आणि सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला.

## पेणमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

**| पेण | प्रतिनिधी |**

पेण नगरपालिकेडून शासकीय शिवजयंती छत्रपती शिवाजी महाराज चौकात साजरी करण्यात आली. यावेळी पेणच्या प्रथम नागरिक प्रितम पाटील यांच्या हस्ते शासकीय पुजन करण्यात आले. त्यानंतर शाळेय मुलांचे मर्दानी खेळांचे प्रात्यक्षित दाखविण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा प्रितम पाटील, मुख्याधिकारी जिवन पाटील यांच्यासह पेण शहराचे सर्व नगरसेवक पेण नगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी वर्ग हजर होते.

पेण एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयाकडूनदेखील शिवजयंतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये



महाराजांच्या पालखीचे आयोजन करण्यात आले होते. पालखी सोहळयात विद्यार्थ्यांनी मराठमोळा वेशभुषा साकारली होती. तसेच यावेळी प्रतापगडाच्या रणसंग्रामाचे देखावा देखील साकारण्यात आले होते. तसेच प्रशाळेच्या विद्यार्थ्यांनी मराठी स्फुर्ती गीतांवर नृत्यांचे आविश्कार देखील सादर केले.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या सार्वजनिक विदया मंदिर पेणच्या विदयार्थ्यांनी शहरामध्ये महाराजांच्या पालखीचे आयोजन केले होते. यामध्ये अश्वरुढ महाराजांचे चलचित्र साकारले होते. या पालखी सोहळयात मोठया प्रमाणात सार्वजनिक विदयामंदिर ज्युनियर कॉलेजचे विद्यार्थी सामिल झाले होते. त्यामुळे पुर्ण शहरात शिवमय वातावरण पहायला मिळाला. तर ग्रामीण भागामध्ये देखील मोठया प्रमाणात शिव जयंती गावागावात साजरी करण्यात आली.

## अंबामातेच्या मंदिराची प्रतिकृती

**| पनवेल | ग्रामीण प्रतिनिधी |**

शिवजयंती उत्सवानिमित्त कामोठे येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात कोल्हापूर येथील प्रसिद्ध अंबाबाई मंदिराची भव्य उभारण्यात आली असून ती परिसरातील नागरिकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. ही प्रतिकृती कलाकार विपुल गोवारी, संगम भोईर, आशिष धनावडे, तेजस गोवारी, कुणाल गोवारी यांनी साकारली आहे. मंदिराच्या मूळ वास्तुरचनेचा बारकाईने अभ्यास करून त्यानुसार सजावट, प्रकाशयोजना आणि शिल्पकलेचा वापर करण्यात आला आहे.



शिवजयंतीनिमित्त उभारण्यात आलेल्या या प्रतिकृतीमुळे कामोठे परिसरात उत्सवाचे वातावरण अधिकच रंगतदार झाले आहे. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वच नागरिक मोठ्या संख्येने येथे भेट देत असून सेल्फी आणि छायाचित्रांसाठी गर्दी होत आहे.

आयोजकांनी सुरक्षेची आणि शिस्तीची योग्य काळजी घेतली असून नागरिकांनीही उत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : सहकार्य आणि चांगले संबंध यामुळे आर्थिक लाभ होईल. रेंगाळलेली कामं होतील. समाधानी रहाल.
- **वृषभ** : आपल्या बुद्धिमत्तेची, दूरदर्शीपणाची स्तुती होईल. कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. पैसा हाती येईल.
- **मिथुन** : नोकरीत पदोन्नती मिळेल. स्थावर मालमत्तेपासून फायदा होईल. जुनी येणी वसुल होणार आहेत.
- **कर्क** : प्रभाव वाढल्याने शत्रू अस्वस्थ होतील. सर्व कामं वेळेत पूर्ण करुन घ्यावी. छंदात मन रमवू शकाल.
- **सिंह** : मुलांच्या भविष्याची चिंता राहील. वाडवडिलांचं मार्गदर्शन घ्यावं. अविचाराने गुंतवणूक करू नये.
- **कन्या** : आर्थिक कामकाज मध्यम स्वरुपाचं राहील. नवीन संबंध प्रस्थापित होतील. व्यवसायात प्रगती.
- **तूळ** : अडचणीतून मार्ग निघेल. कौटुंबिक जीवनात मतभेद टाळावे. कला-गुणांचा उत्तम विकास होईल.
- **वृश्चिक** : आपल्या प्रयत्नांमुळे स्थिती मजबूत होईल. आर्थिक फायदा मनासारखा होईल. सौख्य लाभेल.
- **धनु** : अपूर्ण राहिलेली कामं पूर्ण करुन घ्यावी. घरगुती वाद मिटणार आहे. स्थावर, वाहनसौख्य लाभेल.
- **मकर** : कुटुंबातली कटुता टाळावी. रचनात्मक कामाचं चांगलं फळ मिळेल. भागिदारीत लाभ होईल.
- **कुंभ** : कौटुंबिक तणाव वाढेल. अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी.
- **मीन** : संपत्तीसंबंधी प्रश्न मार्गी लावावे लागतील. उत्साहवर्धक घटना घडतील. ज्येष्ठांचा सल्ला घ्यावा.

## स्टाईल स्टेटमेंट
## दुपट्टा फॉर एव्हरी ऑकेजन

लग्नात सर्वांचं लक्ष वेधून घेणारी व्यक्ती म्हणजे नवरी मुलगी. तिचा पेहराव, दिसणं चर्चेचा विषय ठरतं. आयुष्यातल्या या अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगी नवरीलाही छान दिसायचं असतं. वेगळेपण जपायचं असतं. स्वागत सोहळ्यात बऱ्याच मुली लेहंगा चोली परिधान करतात. या पेहरावाची शोभा वाढवतो तो दुपट्टा. युनिक आणि ट्रेंडी दुपट्टा लक्षवेधी ठरतो. बाजारात विविध रंगांचे, प्रकारचे, डिझाइन्सचे दुपट्टे मिळतात. विशेष म्हणजे ते इतर समारंभांनाही कॅरी करता येतात. दुपट्ट्यांच्या विविध प्रकारांविषयी...

✽ बॉर्डरवर मिरर वर्क केलेले दुपट्टे सुंदर दिसतात. विशेष म्हणजे ही फॅशन कधीच जुनी होत नाही. त्यामुळे असे दुपट्टे वेगवेगळ्या पारंपरिक पेहरावावरही घेता येतात. लग्नाआधीच्या संगीत सोहळ्यात असे दुपट्टे घालता येतील.

✽ घुंगरु लावलेले दुपट्टेही उठून दिसतात. सध्या अशा दुपट्ट्यांचा ट्रेंड फारसा नसला तरी लग्नातल्या एखाद्या सोहळ्यासाठी हा दुपट्टा घेता येईल. **(क्रमश:)**

## २० फेब्रुवारी — दिनविशेष

- **१९५०** : सुभाषचंद्र बोस यांचे थोरले बंधू, संयुक्त समाजवादी संघटनेचे अध्यक्ष शरदचंद्र बोस यांचं निधन.
- **२०१३** : कामगार संघटनांच्या देशव्यापी संपाला उत्तम प्रतिसाद.
- **२०१४** : स्वतंत्र भारतात तेलंगण हे नवे २९ वे राज्य जन्माला घालणारे आंध्र प्रदेश पुनर्रचना विधेयक-२०१४ राज्यसभेत मंजूर.
- **२०१८** : अनियंत्रित आणि अनियमित स्वरूपाच्या बचत योजनांना बंदी घालणाऱ्या विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

## सफर देशांची
## छोटासा 'नौरू'

'नौरू' हा द्विपसमूह म्हणजे मध्य पॅसिफिक महासागरात वसलेला छोटासा देश. एकेकाळी 'प्लेझंट आईसलँड' अशी ओळख असलेल्या नौरुची 'यारेन' ही राजधानी. राष्ट्रकुल तसंच ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये हा छोटेखानी देश सहभागी होतो. नौरू हे अंड्याचा आकाराचं बेट आहे. १८८८ मध्ये जर्मनीने या बेटावर सत्ता स्थापन केली. दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड यांचं नौरूवर एकत्रित राज्य होतं. १९४२ मध्ये जपानने हे बेट ताब्यात घेतलं. पण पुन्हा १९६६ पर्यंत संयुक्त राष्ट्रांच्या करारानुसार इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडने राज्य केलं. मग दोन वर्षांनी म्हणजे १९६८ मध्ये हा देश स्वतंत्र झाला. नौरू १९९९ मध्ये संयुक्त राष्ट्रांचा सदस्य बनला. या बेटावर फॉस्फेट मोठ्या प्रमाणावर आढळतं.

नौरूमध्ये अमेरिकेचा दूतावास नाही. फिजी या देशातले अमेरिकेचे राजदूत नौरूच्या संपर्कात असतात. या देशात फक्त एकच विमानतळ आहे. गंमत म्हणजे नौरू हा जगातल्या सर्वात जाड लोकांचा देश आहे. या देशात फारसं कोणी येत नाही. ऑस्ट्रेलियन डॉलर हे इथलं चलन आहे.

## आरोग्यमंत्र
## बहुगुणी मुळा



विविध भाज्या आणि फळांमध्ये अनेक पोषक घटक असतात. जीवनसत्त्वं, खनिजं, तंतुमय पदार्थ, प्रथिनांनी समृद्ध फळं आणि भाज्या खाल्ल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढते. अनेक आजारांना प्रतिबंध होऊ शकतो. जीवनसत्त्वं आणि खनिजांचा असाच एक मुबलक स्रोत म्हणजे मुळा. मुळ्याची भाजी, कोशिंबिर, पराठे केले जातात. सॅलड म्हणूनही मुळा खाल्ला जातो. मुळ्यातून शरीराला बरेच आवश्यक पोषक घटक मिळतात. तर अशा या बहुगुणी मुळ्याच्या लाभांची माहिती घेऊ.

✽मुळ्यात शरीराला आवश्यक असणारी कर्बोदकं, प्रथिनं आणि फॉस्फरस व लोहासारखे घटक असतात. ॲनिमिया असणाऱ्यांनी मुळा खायला हवा. मधुमेहावरही मुळा गुणकारी ठरतो.

✽ पांढरा शुभ्र पण चवीचा थोडा तिखट, बराचसा उग्र आणि थोडासा कडवट मुळा औषधी गुणधर्मांनी समृद्ध आहे. ✽ मुळा ही बारमाही भाजी आहे. त्यामुळे मुळ्याचा वरचेवर आहारात समावेश करायला हवा. राहता.✽ मुळ्याच्या सेवनाने हृदयविकाराला दूर ठेवता येतं. तसंच यात रक्तातलं वाढलेलं कोलेस्टरॉल कमी करणारे गुणधर्म असतात. त्यामुळे हृदयाशी संबंधित त्रास असणाऱ्यांनी मुळा खायला हवा. ✽ मुळ्यात पाचक गुणधर्म आहेत. गॅस, आम्लपित्ताचा त्रास असेल तर मुळा खायला हवा. ✽ सर्दी-सायनससारख्या व्याधींतही मुळा गुणकारी ठरु शकतो. मुळव्याधीचा त्रास असणाऱ्यांनीही मुळा खायला हवा. यामुळे आराम मिळू शकतो.

## पंचांग

**शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, फाल्गुन शु. ३, चंद्रराशी : मीन, नक्षत्र : उ. भाद्रपदा, योग : साध्य, सूर्योदय ७.०६, सूर्यास्त ६.३९

## फॉरवर्डस

**समंदर अपनीं बेबसी किसी से कह नहीं सकता...**


**हजारों मील में फैला हैं लेकिन बह नहीं सकता...!**

## फॅशन पॅशन

'फर्स्ट इंप्रेशन इज लास्ट इंप्रेशन' असं म्हणतात. म्हणूनच इंटरव्ह्यूला जाताना आपल्या लूककडे विशेष लक्ष द्यायला हवं. फॅशनसंदर्भातल्या काही चुका टाळायला हव्यात. समोरच्यावर आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाडण्याच्या दृष्टीने पेहराव करायला हवा. इंटरव्ह्यूला जाताना नेमकं काय करता येईल याविषयी...

✽ चुकीच्या फिटिंगचे कपडे अजिबात घालू नका. शर्ट असो किंवा पँट, कोणताही कपडा तुमच्यावर शोभून दिसायला हवा. फार घट्ट किंवा ढगळ कपडे घालू नका. **(क्रमश:)**

## करिअरवाटा
## शिक्षण घ्या फलोद्यान शास्त्राचं



फळझाडं आणि फूलझाडांची लागवड करणं, त्यांची योग्य निगा राखणं, फळा-फुलांची वेळच्या वेळी काढणी करणं, योग्य साठवणूक करणं तसंच योग्य पॅकिंग करून विक्रीस पाठवणं ही संपूर्ण प्रक्रिया अभ्यासण्याजोगी असते. या संदर्भात व्यवस्थित शिक्षण घेतल्यास फायदेशीर व्यवसाय उभा राहू शकतो. देशातील जमिनीची उत्पादकता पूर्णपणे वापरली जावी यासाठी फलोद्यान शास्त्राचं ज्ञान असणारे लोक या व्यवसायात उतरणं गरजेचं आहे. वास्तविक आपल्या देशात फळं आणि भाज्यांच्या उत्पादनाची क्षमता प्रचंड आहे. त्यादृष्टीने फलोद्यान शास्त्राच्या अभ्यासक्रमाला भरपूर वाव आहे. हेच प्रशिक्षित विद्यार्थी वैयक्तिक किंवा सार्वजनिक बागा फुलवतात. फळे, फुले, भाज्या आणि शोभिवंत झाडांची लागवड करतात. अनेक कंपन्या, कारखाने, शाळा, महाविद्यालये परिसरात बागा लावतात. त्यांच्या देखभालीसाठी तज्ज्ञ माणूसच हवा असतो. अशा अनेक ठिकाणी या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना बियांचं संकलन, झाडांची लागवड, त्यांची निगा, सजावट, झाडांवरील कीड आणि रोगांबाबत करावयाच्या उपाययोजना आदींवर काम करावं लागतं. म्हणूनच यासंदर्भातील अभ्यासक्रम पूर्ण करुन चांगल्या व्यवसायाची उभारणी करणं सहजशक्य आहे.

## खेचाखेची
## हिशेबात राहा

जेव्हा बायका मुलाला बदडत असतात,

तेव्हा मधून मधून नवऱ्याकडे का बघत असतात?

.
.
.
.
.

तू पण हिशेबात राहा, नाहीतर...

## वेगळं काही

इंडोनेशियाच्या उत्तरेला असलेल्या मोलुक बेटांवर शास्त्रज्ञांना उंदराएवढी मधमाशी सापडली. उंदराएवढ्या मधमाशीचा डंख किती वेदनादायी असेल याचा विचार न केलेलाच बरा. तिच्या पंखांचा आकार सहा सेंटीमीटर इतका आहे. 'वॅलेस' या नावाने ती ओळखली जाते. १८५८ मध्ये ब्रिटिश पर्यावरण तज्ज्ञ अल्फ्रेड रसेल वॅलेस यांना इंडोनेशियातलं बेट 'बेकन'वर ही मधमाशी आढळली होती. त्यावरूनच तिला हे नाव देण्यात आलं. मात्र १९८१ नंतर ती कोणालाच दिसली नव्हती. मध्यंतरी मोलुकमध्ये एक मोहीम राबवणाऱ्या गटाला ती दिसली. या गटाला एक शास्त्रज्ञ क्ले बोल्ट यांनी ही मधमाशी दुर्मीळ असल्याचं सांगत तिला 'फ्लाईंग बुलडॉग' असं नवं नाव दिलं.

## फॅशन पॅशन
## दुधाने करा सौंदर्यसाधना



सध्याच्या लॉकडाउनच्या काळात सौंदर्यप्रसाधनं उपलब्ध होत नाहीत. त्यातच ब्युटी पार्लर्सही बंद आहेत. असं असलं तरी तुम्ही घरगुती साहित्यात सौंदर्यसाधना करू शकता. यात दुधाचं महत्त्वाचं स्थान आहे. दुधाचा वापर करून तुम्ही त्वचेचं सौंदर्य खुलवू शकता. दुधात प्रथिनं भरपूर प्रमाणात असतात. प्रथिनांच्या कमतरतेमुळे त्वचा निस्तेज दिसू लागते. तसंच केस गळू लागतात. म्हणूनच आहारात दूध तसंच दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करायला हवा. यासोबतच सौंदर्यप्रसाधन म्हणूनच दूध वापरता येईल.

✽ चेहऱ्यावरील मुरूमांची समस्या दूर करण्यासाठी दुधात थोडे मीठ घालून ते चेहऱ्याला लावा. यामुळे बराच फरक पडू शकतो. ✽ कच्च्या दुधात थोडं गुलाबपाणी घालून चेहऱ्याला लावल्याने त्वचा उजळते. ✽ त्वचेवं टॅनिंग किंवा काळपटपणा घालवण्यासाठी दुधात थोडा लिंबाचा आणि बटाट्याचा रस घालून मिश्रण तयार करा. हे मिश्रण चेहरा आणि हातापायांना लावून ठेवा. वाळल्यावर पुसून टाका. त्वचेचं काळपटपणा दूर होईल. ✽ सायीत थोडी हळद घालून चेहरा आणि मानेवर चोळा. काही दिवसात त्वचा उजळलेली दिसेल.

## सुडोकू ६६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | | | २ | १ | ९ | | | |
| ४ | | | | | | ६ | | ३ |
| | ५ | ७ | ६ | | | १ | ८ | ९ |
| ९ | | ३ | | ६ | २ | ५ | ४ | ८ |
| | | | | ९ | | | | |
| ५ | १ | २ | ४ | ८ | ३ | ९ | ६ | ७ |
| ३ | २ | ६ | | | ८ | ४ | १ | |
| ७ | | ५ | | | | | | ६ |
| | | | ५ | ४ | ६ | | | २ |

**टीप -**

✽ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

✽ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✽ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ६५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ४ | ३ | ६ | ८ | १ | ५ | २ | ९ |
| १ | ६ | ९ | ३ | २ | ५ | ७ | ८ | ४ |
| ५ | ८ | २ | ४ | ९ | ७ | १ | ६ | ३ |
| ६ | ९ | ८ | २ | १ | ४ | ३ | ५ | ७ |
| ३ | १ | ५ | ७ | ६ | ८ | ४ | ९ | २ |
| २ | ७ | ४ | ५ | ३ | ९ | ६ | १ | ८ |
| ४ | ५ | १ | ९ | ७ | २ | ८ | ३ | ६ |
| ८ | २ | ६ | १ | ४ | ३ | ९ | ७ | ५ |
| ९ | ३ | ७ | ९ | ५ | ६ | २ | ४ | १ |

## शब्दकोडे क्रमांक ६६

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | | ७ | | ८ | | ९ | ■ | १० |
| ११ | | | ■ | १२ | | | ■ | | ■ | | ■ | १३ | | |
| | ■ | १४ | | ■ | | ■ | १५ | | ■ | ■ | १६ | | ■ | |
| | ■ | | ■ | १७ | | १८ | ■ | १९ | | २० | ■ | २१ | २२ | ■ |
| २३ | | ■ | २४ | | ■ | २५ | | | ■ | २६ | | ■ | २७ | २८ |
| | ■ | २९ | ■ | ३० | ३१ | | ■ | | ■ | | ■ | ३२ | ■ | |
| ३३ | | | ■ | ■ | | ■ | ३४ | ■ | ३५ | | | | ३६ | ■ |
| ■ | ■ | ३७ | | ३८ | | ■ | ३९ | | | ■ | ■ | ४० | | ४१ |
| ४२ | ४३ | | ■ | ४४ | | ४५ | | ■ | ४६ | ४७ | ■ | ■ | ४८ | |
| ४९ | | ■ | ५० | ■ | ५१ | | ■ | ५२ | | | ५३ | ५४ | ■ | |
| | ■ | ५५ | | ५६ | | ■ | ५७ | | ■ | ■ | ५८ | | | |
| | ■ | | ■ | | ■ | ५९ | | | ६० | ६१ | ■ | | ■ | |
| ६२ | ६३ | | ६४ | ■ | ६५ | | | ■ | ६६ | | | | ■ | |
| ■ | | ■ | ६७ | | | ■ | ६८ | | | | ■ | | ■ | ■ |
| ६९ | | | | ■ | ७० | | | ■ | | ■ | ७१ | ■ | ७२ | |

**आडवे शब्द :-**

१) गणपतीच्या आरतीची सुरुवात
११) या देशात गंगा-यमुना सारख्या पवित्र नद्या आहेत
१२) पाषाण
१३) या गळीत धान्याला अळशी असेही म्हणतात
१४) रमणीय
१५) चंद्र
१६) प्रामाणिक
१७) काळे ज्वालाग्राही खनिज
१९) पंजाबी नृत्यप्रकार
२१) बुद्धाच्या अवशेषांवर बांधलेली विशिष्ठ आकाराची इमारत
२३) धन, पैसा
२४) नारळाचा कोंब
२५) पक्षांचा राजा
२६) केवळ, फक्त
२७) मलई
३०) ताठ, उद्धट, उर्मट
३३) च्या पुढे, समक्ष
३५) फार मोठा फायदा
३७) पूर्ण भरलेले, आकंठ
३९) संपूर्ण
४०) फणसाचा एक प्रकार
४२) मुलगी
४४) उत्सवाचे दिवस
४६) फणसातील गर
४८) भीती
४९) खवा
५१) बसण्याची फळी
५२) दु:खदायक
५५) सांज वेळ
५७) बाजार
५८) मुस्लिमांचा उपवासाचा महिना
५९) धोकादायक
६२) मोजकेपणा, मितता
६५) गाईचे पिलू
६६) सन्मान, मान

✽✽✽✽

६७) तारा
६८) रेलचेल, विपुलता
६९) माणुसकी
७०) पत्र
७१) गाय
७२) गणपतीला वाहावयाचे खास गवत

**उभे शब्द :-**

१) तुम मुझे खून दो मैं तुम्हे आजादी दूंगा असे सांगणारे नेताजी
२) कोळशाचा चुरा
३) कातरलेले तुकडे
४) खेद
५) खडकाची जमीन
६) हक्क (हिं.)
७) कारण नसता भांडत सुटणे
८) संकट
९) सामानसुमान
१०) रेशमाचा किडा, कोळी
१७) गवत उपटण्याचे हत्यार
१८) समुद्र
२०) अस्थिरता, दंगा, बंड
२२) अर्धी ओंजळ
२८) कुबेराचा सेवक
२९) दुसऱ्याचे शरीर
३१) मूर्ख, दरिद्री, कफल्लक
३२) फुलांचा राजा
३४) वाळवी, उणीव
३५) हळुवारपणे
३६) भरडलेली डाळ, जाड
३८) कासोटा, कंबर
४१) कारखान्याचा मालक
४२) लोकनाट्यातील कलाकार
४३) जुनाच्या विरुद्ध
४५) रस्ता, सडक
४७) गवंडी
५०) चालू काळ
५२) पादत्राण
५३) पुरुष
५४) कमरपट्टा
५५) राग, क्रोध
५६) शरीर
५७) खिशातील चौकोनी वस्त्र
५९) वाळा
६०) अत्यंत थोडे, नावापुरते
६१) महाभयंकर
६३) भुई
६४) प्रजा, रयत
६५) चावट

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लो | क | ना | य | क | ■ | स | क्ष | म | ■ | फा | से | पा | र | धी |
| ह | र | क | ■ | था | पा | ड्या | ■ | नो | क | र | ■ | क | द | र |
| चुं | ■ | ■ | कं | क | र | ■ | पो | ह | रा | ■ | मा | ळी | ■ | ■ |
| ब | द | क | ■ | थ | ■ | मौ | ■ | र | म | णी | य | ■ | ■ | त |
| क | ल | ■ | मा | न | ध | न | ■ | ■ | त | ■ | ■ | ता | त | डी |
| ■ | द | क्ष | ता | ■ | ■ | ■ | मा | सा | ■ | क | जा | ग | ■ | पा |
| प | ल | ■ | पि | त | ळ | उ | घ | डे | प | ड | णे | ■ | ख | र |
| र | ■ | स | ता | र | ■ | रो | ■ | सा | द | ■ | ■ | दा | स | ■ |
| ता | ■ | म | ■ | बे | री | ज | ■ | ती | र | क | मा | न | ■ | क |
| वा | ज | त | गा | ज | त | ■ | व | ■ | मो | ■ | न | वी | ■ | म |
| ■ | पा | ल | व | ■ | स | ■ | स | व | ड | ■ | व | र | व | र |
| म | न | ■ | क | द | र | दा | न | ■ | ■ | दा | ता | ■ | ■ | क |
| हा | ■ | वा | री | ■ | ■ | ह | वा | ल | दा | र | ■ | स | क | स |
| रा | ■ | द | ■ | ■ | चु | क | त | ■ | द | ■ | बा | द | ल | ■ |
| ज | न | क | क | न्या | ■ | ता | ■ | द | ला | ई | ला | मा | ■ | ओ |

विनायक दळवी

## नवोदित संघांना मुख्य प्रवाहात सामावण्याचा प्रयोग यशस्वी




यंदाची टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धा आत्ता निर्णायक टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. क्रिकेटचा जगभरात अधिक जोमाने प्रसार व्हावा म्हणून या विश्वचषक स्पर्धेत तब्बल आठ नवोदित सांघाना किंवा कसोटी दर्जा नसलेल्या संघांना स्पर्धेच्या मुख्य प्रवाहात स्थान देण्यात आले होते. आयसीसीचा हेतू काही प्रमाणात सफल झाला. मात्र, कसोटी खेळणाऱ्या देशांव्यतिरिक्त उर्वरित आठ देशांच्या संघांची मुख्य संघांविरुद्ध खेळताना कामगिरी यथा तथाच होती. हे संघ आपल्या दर्जाच्या ताकतीच्या संघांशी मात्र, जिद्दीने आणि मोठ्या हिकमतीने खेळताना आढळले.

या आठ संघांपैकी ओमन हा देश 'ब' गटात बलाढ्य संघांसोबत होता. कारण या गटातील उरलेले चारही संघ कसोटी क्रिकेट खेळणारे संघ होते. त्यामुळे ओमान पुढे आव्हान अतिशय कडवं होतं. चार गटांमध्ये दोन दोन नवोदित संघाची विभागणी करण्यात आली होती. मात्र, बांगलादेशच्या माघारीमुळे अचानक निर्माण झालेल्या जागेवर स्कॉटलंडचा संघ खेळला. त्यामुळे 'क' गटातील दुबळ्या संघांची संख्या दोन ऐवजी तीन झाली. त्यामुळे या स्पर्धेतील चारही गटात असलेला समतोल साधला गेला नाही असे वाटते. अपेक्षेप्रमाणे 'अ' गटातून यजमान भारत आणि पाकिस्तान यांनी सुपरहिट स्पर्धेत स्थान मिळवलं.

या गटात अमेरिकेच्या संघाने मात्र अतिशय प्रभावी कामगिरी केली. त्यांनी सुरुवातीला भारताविरुद्ध सामना किंवा पाकिस्तान सामना जरी गमावला असला, तरीही हॉलंड व नामीबिया या संघांना त्यांनी सहज धूळ चारली.

अमेरिकेच्या संघात बरेचसे भारत आणि पाकिस्तान या दोन देशातील क्रिकेटपटू खेळत होते. जे अमेरिकेत कामानिमित्त स्थायिक झाले आहेत किंवा तेथे बरीच वर्ष वास्तव्य करून आहेत. अशा खेळाडूंनी अमेरिकेच्या संघाला अतिशय प्रभावी कामगिरी करून दिली. यामध्ये मुंबईच्या शुभम रांजणे, सौरभ नेत्रावळकर आणि हरमीतसिंग या तीन रणजीपटूंचा देखील उल्लेख करावा लागेल. अमेरिकेच्या संघात कृष्णमूर्ती हा देखील रणजी खेळाडू आहे. मुकुंद कुमार हा देखील दिल्लीचा रणजीपटू आहे. त्यामुळे या खेळाडूंमध्ये एक परिपक्वता होती. त्यांच्या खेळातून ती दिसत होती. भारतासारख्या बलाढ्य संघाविरुद्ध दोन हात करताना देखील नेत्रावलकर किंवा शुभम रांजणे किंवा हरमीतसिंग याची गोलंदाजी भेदक वाटत होती. आपल्याला ही गोष्ट प्रकर्षाने जाणवली कोणतेही दडपण न येता हे सर्व खेळाडू खेळत होते. मात्र, नेमका याच गोष्टीचा अभाव ओमान सारख्या नवोदित संघाकडे होता. कारण या संघातील खेळाडू जरी भारत आणि पाकिस्तान येथून आलेले असले तरीदेखील त्यांच्या क्रिकेटचा स्तर 'ब' किंवा 'क' दर्जाच्या क्रिकेट साखळी स्पर्धांच्या पातळीवरचा होता. त्यामुळे त्यांना विश्वचषक स्पर्धेत एवढ्या मोठ्या व्यासपीठावर येताक्षणी प्रचंड दडपण जाणवलं. त्यांच्याही लक्षात आलं असेल की, त्यांना अजून किती पूर्वतयारी करायची आहे. 'क' गटामध्ये स्कॉटलंड इटली आणि नेपाळ या तिन्ही संघानी एकमेकांविरुद्धचे दोन दोन गुण घेतले. म्हणजे त्यांनी मोठ्या संघांना हरवलं नसले तरी देखील आपसातील ताकद त्याने योग्य पद्धतीने आजमावली होती. अपेक्षेप्रमाणे या गटात इंग्लंड आणि वेस्ट इंडिज यांनी पुढचा पल्ला गाठला. मात्र, ज्या नवोदित संघांचा उल्लेख केला आहे. त्या नवोदीत संघांपैकी नेपाळच्या संघाने अतिशय प्रभावी अशी कामगिरी केली आहे.

खरंतर नेपाळने वानखेडे स्टेडियमवरील इंग्लंड विरुद्ध सामन्यात विजय जवळ जवळ मिळवला होता. विजय आणि पराजय यातील अंतर फक्त एका फटक्याचे म्हणजे एका चौकाराचे होते. हाच नेपाळ संघ नंतरच्या सामन्यात मात्र तेवढा प्रभावी वाटला नाही. पुन्हा एकदा स्कॉटलंड विरुद्ध सामन्यात त्यांनी पहिल्या सामन्यात दाखवली झलक दाखवली. नेपाळच्या संघाचा कौतुक यासाठी, की ते स्वतःला मैदानावर झोकून देतात, असे चित्र दिसते. प्रतिस्पर्ध्याला धावचित करताना किंवा धावा रोखताना चेंडू अडवण्यासाठी त्यांनी मैदानावर मारलेले सूर उत्तम दर्जाच्या क्रिकेटला साजेसे होते. किंवा आयरी सारखा जो खेळाडू आहे, त्याने थेट चेंडू फेकीने अनेक फलंदाज धावचित केलेले आपण पाहिले. त्यांनी क्षेत्ररक्षणात खूपच मेहनत घेतलेली दिसून येते. त्यांची फलंदाजी देखील तळापर्यंत आहे. त्यामुळे स्कॉटलांड विरुद्ध सामन्यात त्यांनी आधी हातून निश्चित चाललेला विजय पुन्हा खेचून आणला. अर्थात त्यात श्रेय आयरी सारख्या कसलेल्या फलंदाजाला द्यावे लागेल.

नेपाळ संघाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे सर्व सामने आयसीसी ने मुंबईत वानखेडे स्टेडियम वरच ठेवले होते. नेपाळच्या सर्व चहात्यांनी या चारही सामन्यांना मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून, आपल्या संघाचा हुरूप वाढविला होता. याचे आयसीसीला देखील श्रेय द्यावे लागेल. कारण त्यांनी क्रिकेटचे मार्केटिंग कसे करावे याचा उत्तम पाठ नेपाळचे सामने मुंबईत ठेवून सर्वांपुढे ठेवला. आयसीसीने नेपाळच्या चाहत्यांसाठी सामन्यांची तिकीट मोठ्या प्रमाणात राखून ठेवली. त्यांच्यासाठी हॉटेलचे बुकिंग देखील करण्याची मदत केली. त्यामुळे नेपाळच्या सामन्यांसाठी आलेल्या सुमारे १८ ते २० हजार प्रेक्षकांपैकी, बरेचसे मुंबई बाहेरचे पाठीराखे होते. ज्यांनी तिकिट देखील खरेदी केली आणि मुंबईतील वास्तव्य देखील निश्चित केले होते. एरवी भारताचे सामने वगळता वानखेडे स्टेडियमवर प्रेक्षक एवढ्या मोठ्या संख्येने आलेले पाहायला मिळत नाहीत. नेपाळ सारख्या संघाच्या वेळी झालेली गर्दी ही आयसीसी साठी उत्साह वाढवणारी असेल.

नेपाळने प्राथमिक फेरीत एकच सामना जिंकला असला, तरी त्यांनी प्रत्येक सामन्यात दर्जेदार खेळ करत क्रिकेट रसिकांची मन जिंकली होती. हा संघ स्वतःला मैदानावर झोकून देतो आणि नवीन गोष्टी शिकण्याची इच्छाशक्ती व जिद्द त्यांच्याकडे आहे. त्यामुळे भविष्यकाळात नेपाळ संघ, अफगाणिस्तान किंवा बांगलादेश या दोन संघांसारखा पुढे आल्यास आश्चर्य वाटू नये.

# भारताची विजयी घोडदौड सुरुच





■ नेदरलॅण्ड्सवर १७ धावांनी विजय

■ सलग १२ वा सामना जिंकला

। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।

भारतविरुद्ध नेदरलँड सामन्यात नाणेफेक सूर्यकुमार यादवने जिंकले आणि प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारताने १९३ धावा केल्या. नेदरलँड्ससमोर १९४ धावांचे लक्ष्य होते. तर नेदरलँड्सच्या संघाला १७६ धावा करता आल्या आणि सामना भारताने १७ धावांनी जिंकला.

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात भारताने नेदरलँड्सचा पराभव केला. यासह, भारतीय संघाने त्यांचे चारही ग्रुप स्टेज सामने जिंकले आहेत. भारताने नेदरलँड्सचा १७ धावांनी पराभव केला. सामन्याच्या शेवटच्या षटकात जिथे नेदरलँड्सना २८ धावा करायच्या होत्या. भारताकडून शिवम दुबेने शेवटची षटक टाकली आणि ती धावसंख्या टिकवण्यात यश मिळवले. पाच झेल सोडल्यानंतर भारताय संघाने नेदरलँड्सविरुद्ध सामना जिंकला हे देखील उल्लेखनीय आहे.



भारताने नेदरलँड्ससमोर विजयासाठी १९४ धावांचे लक्ष्य ठेवले होते, ज्याचा पाठलाग करताना त्यांनी २० षटकात ७ गडी गमावून १७६ धावा केल्या. भारताकडून वरुण चक्रवर्ती आणि शिवम दुबे हे दोन सर्वात यशस्वी गोलंदाज होते. वरुण चक्रवर्तीने तीन विकेट घेतल्या, तर शिवम दुबेने दोन विकेट घेतल्या. शिवम दुबेने नेदरलँड्सविरुद्ध चेंडू टाकताना दाखवलेला पराक्रम स्पष्ट होता, पण त्याची स्फोटक फलंदाजीही दिसली. तो भारतीय संघाचा सर्वात यशस्वी फलंदाज होता. त्याच्या ६६ धावांमुळे भारतीय संघाने सामन्यात एकूण १९३ धावा केल्या. यात सहा षटकारांचा समावेश होता. जसप्रीत बुमराहला या सामन्यात केवळ एक विकेट घेता आली. हार्दिक पंड्यालाही या सामन्यात केवळ एक विकेट मिळाली. नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यापूर्वीच भारतीय संघ २०२६ च्या टी२० विश्वचषकाच्या सुपर ८ मध्ये पोहोचला होता. या विजयासह, ते आता त्यांच्या गटात अपराजित राहून सुपर ८ मध्ये पोहोचले आहेत. भारताचा पुढील सामना हा दक्षिण आफ्रिकेविरुद्ध रंगणार आहे. हा सामना रविवारी नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबादमध्ये रंगणार आहे. भारतीय संघ आता सुपर ८ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करण्यासाठी सज्ज झाले आहेत.

## दक्षिण आफ्रिकेचा विजयी 'चौकार'

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

टी-२० विश्वचषकातील ग्रुप-'डी' सामन्यात दक्षिण आफ्रिकेने आपले वर्चस्व कायम राखत युएईचा ६ विकेट्सने पराभव केला. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी आणि फलंदाजांनी एकतर्फी कामगिरी केली. या सामन्यात युएई संघ पूर्णपणे असहाय्य दिसत होता, दक्षिण आफ्रिकेच्या तुलनेत प्रत्येक बाबतीत निराशाजनक कामगिरी करत होता. नाणेफेक जिंकल्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडेन मार्करामचा प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय योग्य ठरला. संपूर्ण यूएई संघ २० षटकांत ६ बाद १२२ धावाच करु शकला, ज्यामुळं दक्षिण आफ्रिकेला माफक लक्ष्य मिळालं. १२३ धावांच्या माफक लक्ष्याचा पाठलाग करताना, दक्षिण आफ्रिकेने आक्रमक दृष्टिकोन स्वीकारला. रायन रिकेल्टन (३० धावा) आणि बेबी एबी म्हणून ओळखला जाणारा डेवाल्ड ब्रेव्हिस (३५) यांनी डाव सावरला. अखेर, ट्रिस्टन स्टब्सच्या मदतीने आफ्रिकेने १४ व्या षटकात लक्ष्य गाठले.

## जय मल्हार चषकात विक्रांत संघ विजयी



। माथेरान । प्रतिनिधी ।

जय मल्हार संघाने दि.१६ ते १८ दरम्यान येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रिडा संकुलावर भव्य टेनिस बॉल क्रिकेट सामने आयोजित केले होते. त्यास क्रीडा प्रेमींनी भरभरून प्रतिसाद दिला. या सामन्यात विक्रांत संघाला विजेतेपद प्राप्त झाले असून मुकदर क्रिकेट संघाला उप विजेतेपद मिळाले आहे.

प्रथम क्रमांकासाठी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या कडून रोख रक्कम रुपये ६१००० आणि आकर्षक चषक तसेच उप विजेत्या संघाला नगरसेविका प्रतिभा घावरे यांच्याकडून ३१००० रोख आणि आकर्षक चषक देण्यात आला. उत्कृष्ट गोलंदाज, फलंदाज, झेल, मॅन ऑफ दि मॅच असे अनेक पारितोषिक खेळाडूंना प्रदान करण्यात आली.

सलग तीन दिवस येथील क्रिडा संकुलावर प्रेक्षकांची मोठया प्रमाणावर गर्दी केली होती. विजेत्या विक्रांत संघाचे धनगर समाज अध्यक्ष राकेश कोकळे यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी सर्व संघांना शुभेच्छा दिल्या. या संपूर्ण नियोजनासाठी मंगेश गोरे, रामा आखाडे, सुरेश आखाडे, किरण आखाडे, दत्ता, रवी, तुषार, ओंकार, मनोज, रमेश यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेचे समालोचन मंगेश मोरे, सागर जोशी, मयुरेश कदम, अनिल नाईकडे यांनी केले होते.

## दिव्यांगाकरीता क्रिकेट स्पर्धा

। रसायनी । प्रतिनिधी ।

कुलाबा दिव्यांग सोशियल फाऊंडेशन इंडिया व कुलाबा दिव्यांग क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड, मुंबई, नवी मुंबई व ठाणे या दिव्यांग संघात शनिवार (दि. २१) फेब्रुवारी रोजी एन आयएसएम सेबी मैदानावर मोहोपाडा येथे दिव्यांग मैत्री चषक २०२६ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे आयोजन कुलाबा दिव्यांग सोशियल फाऊंडेशन इंडिया अध्यक्ष शशांक हिरवे, सुनील पाटील, अरुण घोडके, शिवाजी पाटील, कल्पेश तवले, मंगेश पार्टे, नागनाथ घोडके, रुपेश पवार, रवी भोईर, यशवंत शिंदे, रमाकांत मांडे, चंद्रकांत पवार, विनायक अहेर, कमलाकर लभडे व स्वामी फाऊंडेशन इंडिया यांनी केले आहे.

## टेनिस क्रिकेटमुळे नवोदितांना संधी

। विरार । प्रतिनिधी ।

गावागावात होणाऱ्या टेनिस क्रिकेट स्पर्धांमुळे नावाजलेले अष्टपैलू खेळाडू तयार झाले आहेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू घडविण्यासाठी टेनिस क्रिकेटचे महत्त्वाचे व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन कर्णधार आयुष म्हात्रे यांनी विरार येथे केले. विरार पूर्वेकडील खार्डी-कोशिंबे गावात उद्योजक प्रभाकर पाटील यांच्या पुढाकाराने कोसमाई चषक क्रिकेट स्पर्धांचा आरंभ आयुषाच्या हस्ते करण्यात आला.



या वेळी आयुषने टेनिस क्रिकेट खेळाडूंनी सरावाचे सातत्य ठेवून उत्तम खेळाकडे लक्ष केंद्रित करावे, असा कानमंत्र तरुणांना दिला. या वेळी क्रिकेट क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आईवडिलांबरोबर आजोबा, काका यांनी खूप मेहनत घेतली असल्याचे सांगितले. तसेच प्रभाकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खर्डी गावातील तरुणांनी तयार केलेल्या मैदानाचे कौतुक केले.

या वेळी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाचे तसेच आपल्या वसई तालुक्याचे नाव उज्ज्वल केल्याने कर्णधार आयुषाचा जाहीर सत्कार करण्यात आला.

## नांदगावमध्ये क्रीडा स्पर्धेचे आयोजन



। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायतीतर्फे रायगड जिल्हा परिषद आदर्श केंद्र शाळा नांदगाव नंबर १, जि.प शाळा नांदगांव २, जि.प शाळा नांदगांव नंबर ३, रा जि.प शाळा दांडे, शाळा नांदगाव उर्दू या शाळांच्या दोन दिवसीय वार्षिक क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. यावेळी तालुका पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी सुनील गवळी यांनी विद्यार्थ्यांना मैदानी खेळाचे महत्त्व सांगितले. सेजल घुमकर यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी तालुका पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी सुनील गवळी, दिनेश म्हात्रे, मेघा मापगावकर, रणदिवे, वृषाली जोशी, विशाल पाटील, अमिषा भोबू, नितेश रावजी, महेश मापगावकर, ज्योती किल्लेकर, व्यवस्थापन समिती नांदगाव नंबर तीनच्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

## भारत-पाक सामने इतरत्र खेळविणार

। मुंबई । प्रतिनिधी ।

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सततच्या राजकीय आणि स्पर्धा आयोजन व्यवस्थेवरील तणावामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद २०२९ चॅम्पियन्स ट्रॉफी आणि २०३१ पुरुष एकदिवसीय विश्वचषक स्पर्धांचे यजमानपद भारताऐवजी इतरत्र हलविण्याचा विचार करीत आहे. भारत अधिकृतपणे नियुक्त केलेले यजमान असले तरी, १७ फेब्रुवारीच्या अहवालांवरून असे दिसून येते की ऑस्ट्रेलिया या स्पर्धांसाठी एक प्राथमिक पर्यायी यजमान म्हणून पुढे आला आहे.

भारत आणि पाकिस्तान एकमेकांच्या देशांमध्ये प्रवास करण्यास सतत नकार देत असल्याने, संभाव्य बदल मुख्यत्वे अपेक्षित आहे. ज्यामुळे जागतिक स्पर्धांसाठी आयोजन व्यवस्थेचा मुद्दा अधिकाधिक कठीण होत चालला आहे.



### प्रस्तावित पर्यायी स्थळे

ऑस्ट्रेलिया: २०१५ च्या एकदिवसीय विश्वचषक आणि २०२२ च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्यामुळे अधिक पसंतीचा पर्याय म्हणून ओळखले जाते. न्यूझीलंडचा देखील ऑस्ट्रेलियासोबत संभाव्य सह-यजमान म्हणून उल्लेख केला जात आहे. दक्षिण आफ्रिका: उपखंडातील तणाव न सुटल्यास भविष्यातील प्रमुख ट्रॉफीसाठी संभाव्य गंतव्यस्थान म्हणून देखील ओळखले जात आहे.

सध्याच्या २०२६ टी-२० विश्वचषक दरम्यान सुरू असलेल्या तणावामुळे आयसीसीला भविष्यातील हे बदल करावेसे वाटत आहेत. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी कोलंबो येथे होणाऱ्या भारताविरुद्धच्या त्यांच्या सामन्यावर पाकिस्तानने बहिष्कार टाकण्याची धमकी दिली होती. ज्यामुळे आयसीसीने दीर्घकालीन यजमानपदासाठी अधिक स्थिर उपाय शोधण्यास सुरुवात केली आहे. पाकिस्तानने अलीकडेच सांगितले आहे की, ते भविष्यातील कार्यक्रमांसाठी भारतात जाणार नाहीत. भारतानेही पाकिस्तानमध्ये खेळण्यास दीर्घकाळ नकार दिल्यामुळे भविष्यकाळात कोणत्याही स्पर्धांसाठी या देशांमध्ये आयसीसीला अधिकाधिक समस्यांना सामोरे जावे लागू शकते.

भारत-पाकिस्तान सामन्याची किंमत अंदाजे २५० दशलक्ष डॉलर्स असावी असा अंदाज आहे. राजकीय बहिष्कारांमुळे अशा उच्च-मूल्याच्या सामन्यांचे रद्द होण्याचा धोका कमी करण्याचे आयसीसीचे उद्दिष्ट आहे.

## राष्ट्रीय कुस्तीसाठी साक्षीची निवड

**मुंबई :** मुंबई विद्यापीठातर्फे सोनूभाऊ बसवंत महाविद्यालय, शहापूर (ठाणे) येथे नुकत्याच पार पडलेल्या मुंबई विद्यापीठस्तरीय आंतरमहाविद्यालयीन कुस्ती (महिला) स्पर्धा २०२५-२६मध्ये उल्लेखनीय यश संपादन करण्यात आले. ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या पार्क साईट, विक्रोळी येथील इंदिरा गांधी महाविद्यालयची विद्यार्थिनी साक्षी संजय मोरे हिने ५७ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. तसेच अमृताकुमारी लक्ष्मण यादव हिने ५० किलो वजनी गटात कांस्यपदक मिळवले. सुवर्णपदक विजेती साक्षी मोरे हिची १७ ते २० मार्च २०२६ दरम्यान कुरुक्षेत्र विद्यापीठ, हरियाना येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती (महिला) स्पर्धा २०२५-२६ साठी निवड झाली आहे.

पश्चिम बंगालाचा केला पराभव | रणजी ट्रॉफीच्या अंतिम फेरीत धडक

# जम्मू-काश्मीरने रचला इतिहास

। कोलकाता । वृत्तसंस्था ।

भारतीय देशांतर्गत क्रिकेटमध्ये बुधवारी एका नव्या इतिहासाची नोंद झाली. 'डार्क हॉर्स' मानल्या जाणाऱ्या जम्मू-काश्मीरच्या संघाने रणजी ट्रॉफीत आपला स्वप्नवत प्रवास सुरू ठेवला आहे. उपांत्य सामन्यात बलाढ्य पश्चिम बंगाल संघाचा पराभव करत या संघाने प्रथमच रणजी करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. नाणेफेक जिंकत जम्मू-काश्मीरचा क्षेत्ररक्षणाचा निर्णयउपांत्य सामन्यात नाणेफेक जिंकून जम्मू-काश्मीरने प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला होता. बंगालने सुदीप कुमार घरामीच्या १४६ धावांच्या खेळीच्या जोरावर पहिल्या डावात ३२८ धावा उभारल्या.



प्रत्युत्तरात जम्मू-काश्मीरचा पहिला डाव ३०२ धावांवर आटोपला. भारताचा अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी करत ९० धावांत ८ बळी घेतले. जम्मू-काश्मीर २६ धावांनी पिछाडीवर होता.

दुसऱ्या डावात सामन्याचे चित्र पूर्णपणे पालटले. जम्मू-काश्मीरच्या वेगवान गोलंदाजांनी अचूक टप्प्यावर मारा करत बंगालच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. बंगालचा दुसरा डाव अवघ्या ९९ धावांत आटोपला. आकिब नबी (४/३६) आणि सुनील कुमार (४/२७) या जोडीने बंगालला स्वस्तात गुंडाळल्यामुळे जम्मू-काश्मीरसमोर विजयासाठी १२६ धावांचे सोपे लक्ष्य होते.

मधल्या फळीतील संयमपूर्ण फलंदाजी आणि ऐतिहासिक विजयाचा पाठलाग करताना चौथ्या दिवसाच्या खेळपट्टीवर जम्मू-काश्मीरची सुरुवात डळमळीत झाली होती. आकाश दीपच्या गोलंदाजीवर त्यांची अवस्था १२ धावांवर २ बाद अशी झाली होती. मात्र, मधल्या फळीने संयम राखला. वंशज शर्माने नाबाद ४३ धावांची चिवट खेळी केली, तर शुभम पुंडीर (२७) आणि कर्णधार पारस डोगरा यांनी मोलाची साथ दिली. जम्मू-काश्मीरने हा सामना ७ गडी राखून जिंकला. वेगवान त्रिकुटाचा भेदक मारा जम्मू-काश्मीरचा यंदाचा हंगाम जबरदस्त राहिला आहे. या संघाने साखळी फेरीत कर्नाटक आणि मुंबईसारख्या दिग्गज संघांना पराभूत केल्यामुळे संघाचा आत्मविश्वास उंचावला होता. आकिब नबी, सुनील कुमार आणि युद्धवीर सिंग चरक या वेगवान गोलंदाजांच्या त्रिकुटाने संपूर्ण हंगामात आपल्या कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

### फायनलकडे वेधले सर्वांचे लक्ष

जम्मू-काश्मीरमध्ये क्रिकेटमधील पायाभूत सुविधांचा अभाव आहे. अनेक आव्हानांना सामोरे जात खेळाडूंनी आपली क्षमता सिद्ध करत प्रथमच रणजी ट्रॉफीच्या अंतिम फेरीत धडक दिली आहे. ही खरोखरच जम्मू-काश्मीर क्रिकेटसाठी अभिमानास्पद कामगिरी ठरली आहे. आता उत्तराखंड आणि कर्नाटकमधील उपांत्य सामन्यातील विजेता संघाशी जम्मू-काश्मीर संघाचा सामना होणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)